CMYK

सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
आसमंतसह




दर्बी
क्लॉथ मार्केट
सुटींग । शर्टिंग । लिनन । सिल्क
१०६, गोल्डफिंच पेठ, (नवी पेठ) सोलापूर.
9130008644 | 9422459645

सोलापूर | रविवार, १२ ऑक्टोबर २०२५ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४१ वे अंक ३३३ | पाने १२+८ | किंमत रु. ६/- | RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



राष्ट्राची प्रगती व अवनती समाजातील गुण-दोषांमुळे होत असते. राष्ट्र वैभवसंपन्न करायचे असेल तर प्रगतीला बाधक असे दोष दूर करावे लागतील. अशी पद्धती समाजाची असली पाहिजे.

**सुरेशराव केतकर**
रा. स्व. संघाचे पूर्व सह सरकार्यवाह

## महत्त्वाचे

### अर्जित गर्ग सर्वात तरुण सेबी रिसर्च ॲनालिस्ट

**नवी दिल्ली** : वयाच्या अवघ्या २१ व्या वर्षी अर्जित राजीव गर्ग हे अधिकृतपणे सेबीचे नोंदणीकृत रिसर्च ॲनालिस्ट झाले आहेत. ते भारतातील सर्वात तरुण व्यावसायिकांपैकी एक आहेत.



ही उपलब्धी आर्थिक नियमनात्मक व्यवस्थेत अतिशय मोलाची मानली जाते. अर्जित यांनी ॲमिटी युनिव्हर्सिटी नोएडा येथून बीबीए केले असून, त्यांच्याकडे एनआयएसएम सीरिज एक्सव्ही प्रमाणपत्रही आहे. भांडवली बाजारातील व्यावसायिकांसाठी हे प्रमाणपत्र गरजेचे असते. किशोरावस्थेतच सुरू झालेला त्यांचा वित्तीय आवडीचा प्रवास आणि अखंड परिश्रमामुळे ते कमी वयात या पदाला पोहोचले आहेत.

### मायक्रोसॉफ्टमध्ये नोकरी करताहेत ऋषी सुनक

**लंडन** : ब्रिटनचे माजी पंतप्रधान आणि नारायण मूर्ती यांचे जावई ऋषी सुनक आता नोकरी करीत आहेत. ऋषी सुनक यांनी आता जागतिक स्तरावरील दोन मोठ्या कंपन्यांमध्ये वरिष्ठ सल्लागार म्हणून काम करण्यास सुरुवात केली आहे.



यात अमेरिकेची टेक दिग्गज कंपनी मायक्रोसॉफ्ट आणि कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातील आघाडीचे स्टार्टअप ॲंथ्रॉपिकचा समावेश आहे. स्वत: सुनक यांनी आपल्या लिंक्डइन पोस्टमध्ये ही माहिती दिली. अर्थात् या दोन्ही कंपन्यांकडून मिळणारे मानधन ते पत्नी अक्षता मूर्ती हिच्या 'द रिचमंड प्रोजेक्ट' या सेवाभावी संचस्थेला दान करणार आहेत. निवडणुकीत पराभूत झाल्यानंतर त्यांनी कंझर्व्हेटिव्ह पक्षाच्या नेतेपदाचा त्याग केला होता. मात्र, ते अजूनही ब्रिटिश संसदेचे सदस्य आहेत. यापूर्वीही त्यांना वॉल स्ट्रीट बँक आणि हेज फंड्समध्ये काम करण्याचा अनुभव आहे. यंदा जुलैमध्ये त्यांनी गोल्डमॅन सॅक्समध्येही सल्लागार म्हणून भूमिका स्वीकारली होती.

### गायक कुमार सानूची हायकोर्टात धाव

**नवी दिल्ली** : गायक कुमार सानू यांनी व्यक्तिमत्त्व आणि नावाचा गैरवापर रोखण्यासाठी दिल्ली उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. न्यायाधीश मनीत प्रीतम सिंग अरोरा यांच्या न्यायालयात यावर १३ ऑक्टोबरला सुनावणी होण्याची शक्यता आहे. कुमार सानू यांनी याचिकेत, व्यक्तिमत्त्व आणि नावाचा गैरवापर करण्यापासून संरक्षण मागितले आहे. यात आवाज, गायनशैली, तंत्र, सादरीकरण पद्धत, छायाचित्रे, कार्टून, प्रतिमा आणि स्वाक्षरीचा समावेश आहे. त्यांच्या नावाचा, आवाजाचा किंवा छायाचित्रांचा बेकायदेशीररीत्या वापर होत असल्यामुळे जनतेत गोंधळ आणि फसवणूक होऊ शकते. न्यायालयाने बंदी घालावी, अशी मागणी केली आहे.

### पाकिस्तानात अहमदी मुस्लिमांवर गोळीबार

**चिनाब** : पाकिस्तानात नमाज पढणाऱ्या अहमदी मुस्लिमांवर गोळीबार करण्यात आला. या हल्ल्यात सहाजण जखमी झाले असून, प्रत्युत्तरात केलेल्या गोळीबारात हल्लेखोरही ठार झाला. एका पाकिस्तानी बंदूकधाऱ्याने नमाज अदा करणाऱ्या लोकांवर हल्ला केला,

## राष्ट्रसंतांना मौन श्रद्धांजली



राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या ५७ व्या पुण्यतिथी महोत्सवानिमित्त राज्यातून आलेल्या लाखो गुरुदेव भाविकांनी शनिवारी दुपारी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांना श्रीक्षेत्र गुरुकुंज आश्रमात मौन श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्यासह अन्य मान्यवरांची उपस्थिती होती. सोबतच देश-विदेशांतील गुरुदेव विचार प्रणालीचे अभ्यासू नागरिक हजर होते.

# मोदींची शेतकऱ्यांना दिवाळीची बम्पर भेट

### ३५,४४० कोटी रुपयांच्या दोन महत्त्वाकांक्षी योजनांची घोषणा

◆ **नवी दिल्ली, ११ ऑक्टोबर**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी देशातील कोट्यवधी शेतकऱ्यांसाठी दिवाळीची भेट म्हणून ३५,४४० कोटी रुपयांचे दोन पॅकेज जाहीर केले. पंतप्रधान धन-धान्य कृषी योजना आणि राष्ट्रीय डाळ आत्मनिर्भर मिशन अशा दोन महत्त्वाकांक्षी योजनांची मोदी यांनी घोषणा केली.

भारतरत्न लोकनायक जयप्रकाश नारायण आणि भारतरत्न नानाजी देशमुख या दोन महापुरुषांच्या जयंतीचे औचित्य साधत मोदी यांनी आज भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या एका कार्यक्रमात देशातील शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावणाऱ्या या महत्त्वाकांक्षी कार्यक्रमांची घोषणा केली. हे दोन्ही सुपुत्र ग्रामीण भारताचा आवाज, देशातील लोकशाही क्रांतीचे प्रणेते होते. दोघांनीही आपले संपूर्ण जीवन शेतकरी आणि देशातील गोरगरीब नागरिकांच्या कल्याणासाठी समर्पित केले होते, असे मोदी यांनी म्हटले.

**कृषी धन-धान्य योजना २४ हजार कोटींची**

१०० जिल्ह्यांत राबवली जाणारी पंतप्रधान कृषी धनधान्य योजना २४ हजार कोटी रुपयांची आहे. यामुळे देशातील कृषी उत्पादनात वाढ होणार आहे. परिणामी, शेतकऱ्यांच्या उत्पन्नातही भर पडणार आहे. त्याबरोबर देशातील कृषी क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञान लागू होणार आहे, असे मोदी म्हणाले.

**राष्ट्रीय डाळ आत्मनिर्भर योजना सहा वर्षांसाठी**

राष्ट्रीय डाळी आत्मनिर्भर मिशन ही योजना देशात सहा वर्षांसाठी राबवली जाणार असून, देशातील शेतकऱ्यांना डाळ लागवडीसाठी प्रोत्साहित करीत डाळींचे उत्पादन वाढवत डाळींच्या आयातीपासून देशाची सुटका करणे हा योजनेचा उद्देश आहे, असे नरेंद्र मोदी म्हणाले.

**पशुपालनासाठी १,१६६ कोटींची योजना**

पशुपालन क्षेत्रासाठी ११६६ कोटी रुपयांची एक योजनाही मोदी यांनी जाहीर केली. देशातील दुग्धउत्पादन वाढावे, या योजनेमागचा उद्देश आहे. मत्स्यपालन क्षेत्रासाठी ६९३ कोटी रुपयांची एक योजनाही मोदी यांनी आज जाहीर केली. अन्न प्रक्रिया उद्योगाला प्रोत्साहन देण्यासाठी ८०० कोटी रुपयांची आणखी एका योजनेचीही मोदी यांनी आज घोषणा केली. (तभा वृत्तसेवा)



**धनधान्य कृषी योजनेची उद्दिष्ट्ये**

- कृषी उत्पादनात वाढ करणे
- शेतकऱ्यांना कमी व्याजदरात कर्ज उपलब्ध करणे
- सिंचनाच्या सुविधा वाढवणे
- पीकरचनेत विविधता आणणे

**३,६५० कोटींची कृषी आधारभूत निधी योजना**

शेतकऱ्यांच्या विविधांगी गरजा लक्षात घेत ३६५० कोटी रुपयांची कृषी आधारभूत निधी योजनाही मोदी यांनी आज जाहीर केली. यातून धान्याची साठवण करण्यासाठी गोदामांची, मालवाहतुकीची तसेच अन्न प्रक्रिया उद्योगांची सुविधा विकसित केली जाणार आहे.

### इंडिगो विमानाच्या कॉकपिटच्या काचेला तडा

**चेन्नई** : चेन्नई विमानतळावरून शुक्रवारी इंडिगोच्या विमानाने दिल्लीला जाण्यासाठी उड्डाण घेतल्यानंतर कॉकपिटच्या काचेला तडे गेल्याचे वैमानिकाच्या लक्षात आले. वैमानिकाने तत्काळ विमानतळाच्या आपत्कालीन कक्षाला माहिती दिली, त्यानंतर विमान माघारी परतले. वैमानिकाच्या तत्परतेमुळे ७६ प्रवाशांचे जीव वाचले. चेन्नई विमानतळाच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, इंडिगोच्या विमानाने शुक्रवारी रात्री ११.१२ वाजता दिल्लीला जाण्यासाठी उड्डाण केले होते.

# चीनच्या उत्पादनांवर अमेरिकेत शंभर टक्के शुल्क

### दुर्मिळ खनिजांची निर्यात रोखल्याने ट्रम्प संतप्त ● १ नोव्हेंबरपासून एकूण १३० टक्के शुल्क लागणार

◆ **वॉशिंग्टन, ११ ऑक्टोबर**

दुर्मिळ खनिजांची अमेरिकेला करण्यात येणारी निर्यात रोखल्याने राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी चीनच्या सरसकट उत्पादनांवर १०० टक्के व्यापार शुल्क लादण्याची घोषणा शनिवारी केली. १ नोव्हेंबरपासून अतिरिक्त १०० टक्के आणि पूर्वीचे ३० टक्के असे एकूण १३० टक्के शुल्क चीनच्या वस्तूंवर लागणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

चीनने शुक्रवारी अमेरिकेच्या मालवाहू जहाजांवर अतिरिक्त शुल्क लादण्याची घोषणा केल्याच्या काही तासांतच प्रत्युत्तर म्हणून ट्रम्प यांनी चीनला लक्ष्य करीत नव्याने शुल्क लादण्याची घोषणा केली. ट्रम्प यांनी समाज माध्यमावर केलेल्या पोस्टमध्ये म्हटले की, दुर्मिळ खनिजांची निर्यात रोखून चीन अधिकाधिक आक्रमक होत आहे. संगणक चिप्स, लेजर, जेट इंजिन आणि इतर तंत्रज्ञानात वापरल्या जाणाऱ्या धातू आणि चुंबकांवर ते निर्बंध घालत आहे. यामुळे व्यापार संघर्षाची परिस्थिती निर्माण झाली. अनेक देशांनी आमच्याशी संपर्क साधला आणि यावर उपाययोजना करण्याची विनंती केली. चीनच्या व्यापार धोरणाला प्रत्युत्तर म्हणून त्यांच्या उत्पादनांवर १ नोव्हेंबर २०२५ पासून अमेरिकेत शंभर टक्के अतिरिक्त आणि पूर्वीचे ३० टक्के असे एकूण १३० टक्के शुल्क आकारले जाणार आहे. आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या दृष्टीकोनातून हा निर्णय घेण्यात आला. (वृत्तसंस्था)



**अमेरिकेत उत्पादित चिनी मालावर बंधने**

ट्रम्प यांनी म्हटले की, अमेरिकेत येणाऱ्या चिनी वस्तूंशिवाय अमेरिकेत चिनी कंपन्यांकडून तयार करण्यात येणारे सॉफ्टवेअर आणि इतर वस्तूंवर कठोर नियंत्रणे आणण्याची योजना आहे. याशिवाय अमेरिकेत तयार होणाऱ्या आणि त्यांची निर्यात करण्यात येणाऱ्या चिनी वस्तूंवर बंधने लादणार येईल. चीनच्या अटी-शर्तींच्या व्यापार धोरणाने जागतिक बाजारपेठेत असमतोल निर्माण होत असल्याचा आरोप त्यांनी केला.

**जिनपिंग यांच्यासोबतची बैठक रद्द**

ट्रम्प यांनी पोस्टमध्ये म्हटले की, दक्षिण कोरिया येथे होणाऱ्या एपीईसी शिखर परिषदेत मी चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांची भेट घेणार होतो. पण आता असे करण्याचे कोणतेही कारण दिसत नाही. चीनच्या धोरणाला अमेरिका कठोरपणे प्रत्युत्तर देईल. त्यांनी दुर्मिळ खनिजांच्या निर्यातीवरील निर्बंध उठविल्यानंतर जिनपिंग यांच्याशी चर्चा केली जाईल.

# रिलायन्स पॉवरच्या 'सीएफओ'ला अटक

### बनावट बँक हमीप्रकरणी ईडीची कारवाई

◆ **नवी दिल्ली, ११ ऑक्टोबर**

उद्योजक अनिल अंबानी यांच्या समूहातील रिलायन्स पॉवर कंपनीच्या मुख्य वित्तीय अधिकाऱ्याला ६८ कोटी रुपयांची बनावट बँक हमी दिल्याच्या संबंधित मनी लॉण्ड्रिंग प्रकरणात अंमलबजावणी संचालनालय अर्थात् ईडीने अटक केली, अशी माहिती अधिकृत सूत्रांनी शनिवारी दिली.

तपास यंत्रणेने चौकशी केल्यानंतर अशोक पाल यांना शुक्रवारी रात्री बेकायदेशीर सावकारी प्रतिबंधक कायद्याच्या अंतर्गत अटक करण्यात आली. शनिवारी त्याला विशेष न्यायालयासमोर हजर करण्यात आले. त्याला दोन दिवस ईडीच्या कोठडीत ठेवण्याचा आदेश न्यायालयाने दिला. ईडीची कोठडी वाढवून घेण्यासाठी तपास यंत्रणा त्याला १३ ऑक्टोबर रोजी पुन्हा न्यायालयासमोर हजर करेल असे सूत्रांनी सांगितले.

हे प्रकरण रिलायन्स पॉवरची उपकंपनी असलेल्या रिलायन्स एनयू बेस लिमिटेडच्या वतीने सोलर एनर्जी कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. ला (एसईसीआय) सादर केलेल्या ६८.२ कोटी रुपयांच्या बँक हमीशी संबंधित आहे. ही बँक हमी बनावट असल्याचे आढळले. ही कंपनी औपचारिकपणे महाराष्ट्र एनर्जी जनरेशन लि. या नावाने ओळखली जाते.

व्यावसायिक गटांना बनावट बँक हमी देण्यासाठी चालवणाऱ्या आरोपी कंपनीची ओळख ईडीने ओडिशातील बिस्वाल ट्रेडलिंक म्हणून दिली आहे. ईडीने कंपनी आणि तिच्या संचालकांच्या विरोधात ऑगस्टमध्ये छापेमारी करीत त्याचा व्यवस्थापकीय संचालक पार्थसारथी बिस्वालला अटक केली होती. (वृत्तसंस्था)




नवी दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियमवर वेस्ट इंडीजविरुद्धच्या दुसऱ्या व शेवटच्या कसोटी सामन्याच्या दुसऱ्या दिवशी, शनिवारी भारतीय कर्णधार शुभमन गिलने जोरदार खेळ केला व आपले दहावे कसोटी शतक झळकावले. भारताने ५ बाद ५१८ धावांवर पहिला डाव घोषित केला (वृत्त क्रीडा पानावर)

# छत्तीसगडमधील आयईडी स्फोटात जवान हुतात्मा

◆ **चायबासा, ११ ऑक्टोबर**

झारखंडच्या पश्चिम सिंघभूम जिल्ह्यातील सारंडा जंगलात नक्षलवाद्यांनी घडवलेल्या दोन आयईडी स्फोटांत जखमी झालेल्या सीआरपीएफच्या हेड कॉन्स्टेबलचा शनिवारी मृत्यू झाला, असे पोलिसांनी सांगितले. या आयईडी स्फोटात जखमी झालेल्या निरीक्षक व एका सहायक उपनिरीक्षकावर उपचार सुरू आहेत.

आसामचे रहिवासी असलेले हेड कॉन्स्टेबल महेंद्र लस्कर यांचे ओडिशातील राऊरकेला येथील रुग्णालयात उपचारादरम्यान निधन झाले. ते सीआरपीएफच्या ६० व्या बटालियनमध्ये होते, असे झारखंड पोलिस मुख्यालयाने निवेदनात म्हटले आहे. निरीक्षक आणि सहाय्यक सहाय्यक रुग्णालयात उपचार सुरू आहेत, असे त्यात म्हटले आहे. शुक्रवारी सायंकाळी जराईकेला पोलिस ठाण्याच्या हद्दीतील सारंडा जंगलातील बाबुडीह येथील स्फोटात सीआरपीएफचे तीन जवान जखमी झाले.

# अमीर मुत्तकींनी रोखला महिला पत्रकारांना प्रवेश

### विरोधकांची टीका ● केंद्राने म्हटले, आमची कोणतीही भूमिका नाही

◆ **नवी दिल्ली, ११ ऑक्टोबर**

अफगाणिस्तानचे परराष्ट्र मंत्री अमीर खान मुत्तकी यांनी शुक्रवारी दिल्लीत झालेल्या पत्रकार परिषदेत सहभागी होण्यापासून महिला पत्रकारांना रोखल्याचा आरोप करीत कॉंग्रेसने केंद्र सरकारवर हल्लाबोल केला.

कॉंग्रेसच्या खा. प्रियांका वढेरा यांनी शनिवारी पंतप्रधान मोदींना प्रश्न विचारला की, महिला देशाचा कणा आणि अभिमान असताना भारतात आपल्या देशातील काही सर्वात सक्षम महिलांचा अनादर कसा होऊ दिला?

दरम्यान, या वादानंतर परराष्ट्र मंत्रालयाने स्पष्टीकरण दिले. मंत्रालयाने एक निवेदन जारी करून म्हटले की, अफगाणिस्तानच्या परराष्ट्र मंत्र्यांच्या पत्रकार परिषदेत त्यांची कोणतीही भूमिका नव्हती आणि त्यांच्या वतीने पत्रकारांना आमंत्रित केले नव्हते. मुंबईतील अफगाणिस्तानचे कौन्सिल जनरल अफगाणिस्तानच्या परराष्ट्र मंत्र्यांच्या भारत भेटीसाठी दिल्लीला गेले होते. त्यांनी निवडक पत्रकारांना आमंत्रणे पाठवली होती. अफगाण दूतावासाचे अधिकार क्षेत्र भारत सरकारच्या अधिकारक्षेत्रात येत नाही.

**फक्त पुरुष पत्रकारांशीच बोलले**

अफगाणिस्तानचे कार्यवाहक परराष्ट्र मंत्री अमीर मुत्ताकी यांनी दिल्लीतील अफगाण दूतावासात भारतीय पत्रकारांसोबत शुक्रवारी पत्रकार परिषद घेतली. मुत्ताकी यांनी भारत-अफगाणिस्तान संबंध, मानवतावादी मदत, व्यापार आणि सुरक्षा सहकार्य यासह विविध मुद्यांवर भाष्य केले. तथापि, पत्रकार परिषदेला फक्त निवडक पुरुष पत्रकार आणि अफगाण दूतावासाचे अधिकारी उपस्थित होते. (वृत्तसंस्था)

# आरशात पाहा, मग शेतकऱ्यांसोबत मोर्चे काढा

### देवेंद्र फडणवीसांचा उद्धव ठाकरेंवर घणाघात

◆ **औरंगाबाद, ११ ऑक्टोबर**

उद्धव ठाकरे यांनी आरशात स्वतः पाहावे आणि मगच शेतकऱ्यांसोबत मोर्चे काढावेत, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ठाकरेंवर जोरदार टीका केली. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पृष्ठभूमीवर आयोजित करण्यात आलेल्या भाजपाच्या विभागीय बैठकीसाठी फडणवीस औरंगाबाद दौऱ्यावर आले होते.

उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री असताना २० हजार कोटी रुपयांची कर्जमाफी जाहीर केली होती. पण, आम्ही त्यापूर्वीच २० हजार कोटींची कर्जमाफी केली होती. त्यामुळे त्यांनी काही वेगळे किंवा ऐतिहासिक केले नाही. याशिवाय त्यांनी चालू खात्याच्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपये देण्याची घोषणा केली होती, मात्र प्रत्यक्षात एक फुटकी कवडीही दिली नाही, असा घणाघात फडणवीस यांनी केला.

आमच्या सरकारने सध्या ३१ हजार कोटी रुपयांचे मदतपॅकेज जाहीर केले असून, त्यातील २१ हजार कोटी रुपये थेट शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होणार आहेत. आम्ही १६ लाख शेतकऱ्यांच्या खात्यात थेट पैसे दिले आहेत. याशिवाय ६ हजार रुपये राज्य सरकारचे आणि ६ हजार रुपये केंद्र सरकारचे असे १२ हजार रुपये देण्यात येत आहेत. पीकविम्याचेही पैसे देण्यात येत आहेत, अशी माहिती देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

ठाकरे सरकारच्या काळात झालेल्या नैसर्गिक आपत्ती आणि त्यानंतरच्या मदतीच्या तुलनेत आमच्या सरकारने अधिक प्रभावी आणि थेट मदत दिल्याचा दावा फडणवीसांनी केला. त्यांनी त्यांच्या कार्यकाळात किती मदत केली, याची तुलना केली, तर त्यांना मोर्चा काढण्याचा नैतिक अधिकारच नाही. मात्र ते मोर्चे काढतात, कारण त्यांना आपल्या पक्षाला जिवंत ठेवायचे आहे, अशी उपरोधिक टीका येथे पार पडलेल्या भाजपाच्या विभागीय बैठकीविषयी फडणवीसांनी केली. (वृत्तसंस्था)

# अमेरिकन कंपन्यांचा भारतातच गुंतवणुकीचा आग्रह

**नवी दिल्ली, ११ ऑक्टोबर**

भारत आणि अमेरिका यांच्यातील टॅरिफ वाद सुरू होऊन तीन महिन्यांहून अधिक काळ लोटला आहे. वाद सोडवण्यासाठी दोन्ही सरकारांमध्ये चर्चा सुरू आहे, परंतु अंतिम निर्णय झालेला नाही. महत्त्वाचे म्हणजे, अमेरिकन कंपन्या या अनिश्चिततेचा परिणाम भोगत नाहीत आणि भारतात त्यांच्या गुंतवणूक योजना सुरू ठेवत आहेत.

गुगल, मायक्रोसॉफ्ट, ॲमेझॉन आणि ॲपलसारख्या प्रमुख आयटी कंपन्यांपासून ते ऑर्डिनरी थिअरीसारख्या गुप्तचर हार्डवेअर कंपन्यांपर्यंत किंवा भारतीय शेअर बाजारात गुंतवणूक करणाऱ्या अमेरिकन वित्तीय निधींपर्यंत, भविष्यातील योजनांवर कोणताही परिणाम झालेला नाही. त्या सर्वांनी सांगितले की, त्यांना अद्याप अमेरिकन कॉर्पोरेट क्षेत्राकडून असे कोणतेही संकेत मिळालेले नाहीत की, टॅरिफ वाद भारतातील त्यांच्या भविष्यातील क्रियाकलापांवर परिणाम करेल. मायक्रोसॉफ्टचे सीईओ सत्या नाडेला यांनी जानेवारी २०२५ मध्ये भारत भेटीदरम्यान दोन वर्षांत तीन अब्ज डॉलर्सची गुंतवणूक करण्याची घोषणा केली होती.

सूत्रांचे म्हणणे आहे की, मायक्रोसॉफ्टच्या भारतीय टीमने जुलैमध्ये, टॅरिफ वादाच्या शिखरावर असताना ही गुंतवणूक योजना अंतिम टप्प्यात नेली.

# सोन्यापासून बनवला सर्वात महाग ड्रेस; गिनीजमध्ये नोंद

**दुबई, ११ ऑक्टोबर**



जगातील सर्वात मौल्यवान सोन्यापासून बनवलेल्या ड्रेसची सध्या चर्चा सुरू आहे. या खास ड्रेसने गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्समध्ये जगातील सर्वात महाग सोन्याचा ड्रेस म्हणून नवा विक्रम केला आहे.

हा ड्रेस सोन्यापासून तयार केला असल्याने तो खूप महाग आहे. सोन्यापासून तयार करण्यात आलेल्या ड्रेसची किंमत १०,८८,००० अमेरिकन डॉलर्स इतकी आहे. भारतीय चलनामध्ये त्याची किंमत ९ कोटी ६५ लाखांपेक्षा जास्त आहे. हा ड्रेस २१ कॅरेट सोन्याचा वापर करून बनवला गेला आहे. दुबईतील प्रसिद्ध ज्वेलरी ब्रॅण्ड असलेल्या अल रोमाईजानमध्ये हा ड्रेस तयार करण्यात आला आहे. हा ड्रेस फॅशन म्हणूनच नाही तर, कला आणि अमिरातीची पारंपरिक संस्कृतीचा संगम आहे. केवळ ड्रेसचे वजन १,२७०.५ ग्रॅम आहे. त्यासोबत एक मुकुट, पारंपरिक हेअरड्रेस आणि कानातले याचाही समावेश आहे.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्त्वाचे...



### बालाजी अमाईन्सला 'रोटरी इंडिया नॅशनल सीएसआर अवॉर्ड '

**सोलापूर, दि. ११ ऑक्टोबर-**

रोटरी इंडियाच्या वतीने देशभरातील उद्योगसमूहांच्या सामाजिक जबाबदारीतील (सीएसआर) उल्लेखनीय योगदानाची दखल घेत रोटरी इंडिया नॅशनल सीएसआर अवॉर्ड २०२५ जाहीर करण्यात आले. या प्रतिष्ठित पुरस्कारांमध्ये बालाजी अमाईन्स लिमिटेडने पश्चिम विभागातील मोठ्या उद्योगसमूह या गटात आरोग्य क्षेत्रासाठी सर्वोत्तम सीएसआर कार्याचा पुरस्कार पटकावला आहे. हा पुरस्कार कंपनीचे महाव्यवस्थापक (वित्त) अरुण मासाळ यांनी स्वीकारला. पुरस्कार वितरण समारंभ मोतिलाल ओसवाल टॉवर, प्रभादेवी, मुंबई येथे पार पडला. या कार्यक्रमाचे मुख्य अतिथी मोतिलाल ओसवाल तर विशेष अतिथी अभिनेता व समाजसेवक सोनू सूद होते. याप्रसंगी कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक डी. राम रेड्डी यांनी सांगितले की, कंपन्यांवर CSRची जबाबदारी लागू होण्यापूर्वीच, आमच्या व्यवस्थापनाने १९९० च्या दशकापासून बालाजी फाउंडेशनच्या माध्यमातून समाजसेवा सुरू केली होती. चेअरमन ए. प्रताप रेड्डी म्हणाले, आपण समाजाच्या ऋणात आहोत, ज्या समाजाने आपल्याला खूप काही दिले, ते परत द्यावे हीच खरी सामाजिक जबाबदारी आहे.



### प्रा. डॉ. गौस अहमद शेख यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार

**सोलापूर, दि. ११ ऑक्टोबर-**

सोलापूर शहरातील प्रसिद्ध वरिष्ठ महाविद्यालय एस.एस.ए. आर्टस अँड कॉमर्स महाविद्यालयातील उर्दू विभागाचे प्रा. डॉ. गौस अहमद शेख यांना २०१९ सालाकरिता राज्यस्तरीय आदर्श शिक्षक''पुरस्कार महाराष्ट्र सरकारच्या अल्पसंख्याक विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत ७ ऑक्टोबर रोजी मुंबई येथे हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. महाविद्यालये आणि विद्यापीठांमध्ये उर्दू भाषेत अध्यापन सेवा देणाऱ्यांना हा पुरस्कार देण्यात येतो. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. अखलाक अहमद वाडवान, बज्मे गालिब सोलापूरचे अध्यक्ष बशीर परवाज, प्राचार्य डॉ. इक्बाल तांबोळी, डॉ. शफी चोबदार, डॉ. आसिफ इक्बाल आदींनी त्यांचे अभिनंदन केले.



### मराठीचा समृद्ध ठेवा जपणे ही सर्वांची नैतिक जबाबदारी आहे : कुलकर्णी

**सोलापूर, दि. ११ ऑक्टोबर-**

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला ही गौरवाची बाब आहे. खूप दिवसांच्या संघर्षाला यश मिळून आज एक वर्ष होत आहे. मराठीचा ठेवा जपणे ही आपली जबाबदारी आहे. असे आवाहन सुप्रसिद्ध कवयित्री वंदना कुलकर्णी यांनी केले. वालचंद कला व शास्त्र महाविद्यालय (स्वायत्त), येथे आयोजित मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळून एक वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने अभिजात मराठी भाषा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रम प्रसंगी अध्यक्षीय समारोप उपप्राचार्य डॉ. शशिकांत हिप्परगी यांनी केला. या कार्यक्रमप्रसंगी डॉ. विजया महाजन, डॉ. दत्तात्रय कांबळे, डॉ. अमोल शिंदे, डॉ. मनीषा चवरे, डॉ. अंजना सोनवणे, डॉ. दिपाली पाटील प्रा. राधिका म्हेत्रे उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा. हनुमंत मते यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय डॉ. स्मिता ढावरे यांनी करून दिला. सूत्रसंचालन डॉ.पद्मावती पाटील यांनी केले तर आभार डॉ. राजू नवले यांनी मानले




### बूट फेकणाऱ्या विरोधात देशद्रोहाचा गुन्हा दाखल करा

**समविचारी सभेच्या निषेध आंदोलनावेळी मागणी**

**सोलापूर, दि. ११ ऑक्टोबर-**

सरन्यायाधीश भूषण गवळी यांच्यावर बूट फेकल्याप्रकरणी त्या वकीला विरोधात देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी समविचारी सभेच्या निषेध आंदोलनावेळी युवराज पवार यांनी केली. मनुवादी विचारांच्या व्यक्तिमत्वाने भारताचे सरन्यायाधीश भूषण गवळी यांच्यावर बूट भिरकावल्या प्रकरणी समविचारी सभेच्या वतीने डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौक येथे निषेध करण्यात आला. यावेळी मौलाना हारीश दस्तगीर शेख, समिउल्ला शेख, युवराज पवार, मतीन बागवान, सुबोध वाघमोडे, अरिफ शेख, हासिफ नदाफ, नदीम डोणगावकर, यशवंत फडतरे, मंगल जाधव, आदी उपस्थित होते.

# जैन मुनीकडून शांतिदूत जन पार्टीची स्थापना

## दादरमध्ये मृत कबुतरांसाठी प्रार्थनासभेत घोषणा; महापालिका निवडणुकीत उतरणार

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि.११ ऑक्टोबर-**

उच्च न्यायालयाने कबूतरखान्यावर घातलेल्या बंदीमुळे आक्रमक झालेल्या जैन समाजाने आता आणखी एक पुढचे पाऊल उचलले आहे. जैन मुनींनी शांतिदूत जन पार्टी पक्ष स्थापना करण्याचा निर्णय घेतला असून येत्या मुंबई महापालिका निवडणुकीत उमेदवार उभे करण्याची घोषणा करण्यात आली आहे.

कबुतरखाना बंद पडल्याने मृत पावलेल्या कबुतरांच्या आत्म्याला शांती वाहण्यासाठी शनिवारी दादर येथील योगी सभागृहात ही प्रार्थनासभा झाली. यावेळी या महत्वपूर्ण निर्णयाची घोषणा करण्यात आली. महावीर मिशन ट्रस्टने या विशेष प्रार्थनासभेचे आयोजन केले होते. यावेळी

एकाद दुसरा माणूस मेला तरी चालेल, मात्र कबूतरे जगली पाहिजेत, कबुतरावरील हल्ला हा भगवान शंकरावरील हल्ला आहे, असे वादग्रस्त विधानही जैन मुनिंकडून करण्यात आले. त्याचे राजकीय पडसाद उमटत आहेत.

**आमच्यामुळे फडणवीस मुख्यमंत्री : जैन मुनी**

या सभेमध्ये जैन मुनींनी अनेक वादग्रस्त वक्तव्य करतानाच निवडणुकीच्या काळात आम्ही घरी जाऊन प्रचार केला त्यामुळे देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री बनले असा दावाही करण्यात करण्यात आला. ते म्हणाले की सर्व एकजुटीने राहिले तरच आपली सत्ता येते अन्यथा ' बटेंगे तो कटेंगे ' बाजूला फेकले जातील याची जाणीव राज्यकर्त्यांनी ठेवावी.

सकल जैन समाज मुंबई आणि राजस्थानी छत्तीस कोम मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या सभेत सर्व आचार्य, साधू-साध्वी उपस्थित होते.

कबुतरखाना बंद केल्यामुळे शेकडो कबुतरांचा बळी गेल्याचा आरोप करण्यात आला. मुंबई पालिकेनं कबुतरखान्यांवर घातलेल्या बंदीविषयी तीव्र आक्षेप नोंदवत, आगामी पालिका निवडणुकीत आपली ताकद दाखवण्याचा इशारा जैन समाजानं या प्रार्थनासभेत दिला आहे.

**'कबूतर बचाओ - जीव दया अपनाओ'** : जैन धर्माच्या अहिंसेच्या तत्त्वानुसार, कबुतरांना अन्न आणि आश्रय देणं हे पवित्र कर्तव्य मानलं जाते. मात्र, मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार आरोग्याच्या कारणास्तव पालिकेनं दादरमधील कबुतरखाना बंद केला आहे. त्यामुळे ती रस्त्यावर भटकत आहेत आणि अपघातांमुळे त्यांचा मृत्यू होत आहे.

'मृत कबुतरांचे दृश्य पाहून आमच्या मनाला वेदना होतात. दादरचा कबुतरखाना बंद केला, पण मुंबईतील इतर ५० कबुतरखाने का बंद केले जात नाहीत?' असा सवाल जैन धर्मगुरू निलेश मुनी महाराज यांनी सभेत उपस्थित केला.

**'कबुतर बचाओ - जीव दया अपनाओ'** असा संदेश देत कबुतरखाने पुन्हा सुरू करण्याची मागणी प्रशासनाकडे करण्यात आली आहे.

दादर कबुतरखाना बंदीमागे बिल्डर लॉबी आणि राजकीय हितसंबंध असल्याचा गंभीर आरोप जैन समाजाकडून करण्यात आला आहे. कबुतरखान्यामुळे परिसरातील मालमत्तेचे भाव कमी होत असल्यानं ही जागा बिल्डरांना मिळवून देण्याचा डाव असल्याचा दावा माजी नगरसेवक पूरण दोशी यांनी केला. यावेळी आपले राजकीय अस्तित्व दाखविण्यासाठी शांतिदूत जन पार्टीच्या स्थापना करण्यात येत असल्याचे जैनमुनिंनी जाहीर केले. पक्षाचे चिन्ह कबूतर असणारा असून मुंबई महापालिका निवडणूक लढविली जाईल,असेही त्यांनी जाहीर केले

'कबुतरांमुळे कुणाचा मृत्यू झाल्याचा पुरावा नाही. धुळीमुळेही मृत्यू होतात, म्हणून मुंबईतील सर्व बांधकामे बंद करणार का? कोंबड्यांमुळे बर्ड फ्लू होतो, म्हणून त्यांची विक्री थांबवणार का?' असे प्रश्न त्यांनी पालिकेच्या निर्णयावर टीका करत उपस्थित केले.

**नेमका वाद काय? :** दादर कबुतरखान्याच्या परिसरातील रहिवाशांनी आरोग्याच्या तक्रारी नोंदवल्यानं मुंबई पालिकेनं कबुतरांना अन्न देण्यास मनाई केली. यामुळे ६ ऑगस्ट २०२५ रोजी जैन समाजाने आक्रमक पवित्रा घेत मोडतोड करून ताडपत्री काढून टाकली होती.त्यामुळे मुंबईत तणाव निर्माण झाला होता..

अखेर, १३ ऑगस्ट रोजी मुंबई उच्च न्यायालयानं तज्ज्ञ समिती स्थापन करण्याचे आदेश दिले. या समितीला कबुतरांच्या पिसे, विष्ठा आणि मानवी आरोग्यावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करून अहवाल सादर करण्याचं काम देण्यात आले आहे. नगर विकास विभागाने २२ ऑगस्ट रोजी याबाबत शासन निर्णय जारी केला.

# सोलापूर रेल्वे स्थानकावर 'अमृत संवाद' कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ११ ऑक्टोबर-**

मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागात चालू असलेल्या विशेष मोहीम ५.० चा भाग म्हणून रेल्वे स्थानकावर 'अमृत संवाद' कार्यक्रम आयोजित केला होता, ज्याचा उद्देश रेल्वे अधिकारी, प्रवासी आणि भागधारकांमध्ये थेट संवाद वाढवणे हा होता.

नागरिकांच्या सहभागासाठी आणि सतत सेवा सुधारण्यासाठी भारतीय रेल्वेच्या वचनबद्धतेशी सुसंगत, अमृत संवाद उपक्रम विभागातील विविध अमृत स्थानकांवर आयोजित केला जात आहे. सोलापूर येथील कार्यक्रमात प्रवाशांचा अनुभव आणि स्थानक सुविधा वाढवण्यासाठी अर्थपूर्ण संवाद साधण्यासाठी प्रवासी, चेंबर ऑफ कॉमर्सचे प्रतिनिधी आणि इतर भागधारकांना एकत्र आणले. यावेळी अमृत भारत स्टेशन योजनेअंतर्गत केलेल्या सुधारणांचे मूल्यांकन, चालू विकासात्मक उपक्रमांबद्दल नागरिकांकडून अभिप्राय, प्रवाशांच्या सोयीसाठी सुधारणा करण्याच्या पुढील क्षेत्रांची ओळख, भारतीय रेल्वेच्या विकास प्रवासात जनतेच्या सहभागाला प्रोत्साहन, स्वच्छता आणि स्थानक देखभालीतील प्रवाशांच्या भूमिकेबद्दल जागरूकता वाढवणे या विषयांवर संवाद साधण्यात आला.

डीआरएम सोलापूर आणि सिनिअर डीसीएम, सिनिअर डीईएन, सिनिअर डीईई आणि एडीईएन यांच्यासह इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या कार्यक्रमात सक्रिय सहभाग घेतला, भविष्यातील स्थानक सुधारणा प्रयत्नांना मार्गदर्शन करण्यासाठी मौल्यवान अंतर्दृष्टी गोळा केली.

अमृत संवाद, रेल्वे आणि त्याच्या वापरकर्त्यांमधील जोडणारा दुवाम्हणून काम करत होता, पारदर्शकता, समावेशकता आणि नागरिक-केंद्रित उपक्रमांसाठी भारतीय रेल्वेची वचनबद्धता बळकट करत होता. प्रवाशांच्या सुविधा, पायाभूत सुविधा आणि एकूण प्रवास अनुभव सुधारण्यासाठी सोलापूर विभागाची समर्पण देखील यातून दिसून येते.

# धरण क्षेत्रांतील पर्यटनस्थळी मद्यविक्री, सेवनाला मुभा

## जलसंपदा विभागाचा निर्णय

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ११ ऑक्टोबर -**

वाईन विक्री परवाने घाऊक पद्धतीने देण्याचा वादग्रस्त निर्णय स्थगित केल्यानंतर आता राज्य सरकारच्याच कृपेने राज्याच्या कानाकोपऱ्यांतील धरणक्षेत्रावर मद्यपार्टी रंगण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. जलसंपदा विभागाने गुरुवारी एक शासन निर्णय जारी करून धरण क्षेत्रांत मद्यविक्री आणि सेवन करण्याला मुभा दिली आहे.

राज्यात बहुतांश धरणे डोंगर-दऱ्यांमध्ये निसर्गरम्य ठिकाणी आहेत. महत्त्वाच्या १४६ ठिकाणी विभागाची विश्रामगृहे आहेत. त्यासह जलाशयांच्या जवळ पर्यटनक्षम विश्रांतीगृहे, निरीक्षण बंगले, निरीक्षण कुटी अथवा वसाहती आणि कर्मचाऱ्यांच्या वसाहती आहेत. जून २०१९ मध्ये विभागाने शासन निर्णय काढून धरणांच्या नजीकच्या अतिरिक्त जमिनी, विश्रामगृहे आणि वसाहती सार्वजनिक खासगी भागीदारी अथवा बांधा वापरा व हस्तांतरित करा या तत्त्वानुसार विकसित करण्याला मंजुरी दिली होती. मात्र धरणक्षेत्रावर मद्याची विक्री आणि सेवन करण्याला बंदी होती. शिवाय असे कृत्य झाल्यास करारनामा रद्द करण्याची अट होती. ती आता रद्द करण्यात आली आहे.

राज्यातील अनेक धरण क्षेत्र परिसरात टपऱ्या, झोपड्या उभारून अवैधरीत्या मद्यविक्री केली जाते आहे. त्यामुळे धरण सुरक्षा धोक्यात आली आहे. अवैध मद्यविक्रीला आळा घालून राज्यभरातील धरण क्षेत्रांचा विकास व्हावा, पर्यटनाला चालना मिळून स्थानिक पातळीवरील लोकांना रोजगार मिळावा या उद्देशाने पर्यटन क्षेत्रातील बहुराष्ट्रीय कंपन्यांची पंचतारांकित उपाहारगृहे धरण क्षेत्रावर उभी राहणे गरजेचे आहे. मद्यविक्री आणि सेवनाला परवानगी मिळणे ही पंचतारांकित उपाहारगृहांची पूर्व अट असते. त्यामुळे मद्यविक्री आणि सेवनाला परवानगी देण्यात आली आहे.

या निर्णयामुळे सर्व बाबी कायद्याच्या चौकटीत येतील. तसेच या सर्व प्रकारावर जलसंपदा विभागाचे नियंत्रण असेल. जलसंपदा विभागाच्या अखत्यारितील महामंडळाचे आर्थिक उत्पन्न वाढावे, सरकारला अधिकचा महसूल मिळावा, या उद्देशाने हा निर्णय घेतल्याचेही जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी सांगितले.



# बार्शी तालुका पोलीस ठाण्यामध्ये साई संजीवनी हॉस्पिटलच्यावतीने मोफत आरोग्य तपासणी शिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ११ ऑक्टोबर-**

बार्शी तालुका पोलीस ठाणे व साई संजीवनी हॉस्पिटलच्या संयुक्त विद्यमाने सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त बार्शी तालुक्यातील पोलीस बांधवांसाठी बार्शी तालुका पोलीस ठाणे येथे मोफत आरोग्य तपासणी व औषध वाटपचे शिबिराचे आयोजित करण्यात आले होते.

यावेळी बार्शी उपविभागीय पोलीस अधिकारी अशोक सायकर, तालुका पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दिलीप ढेरे, पोलीस उपनिरीक्षक सुधीरभाऊ गुळमे यांच्यासह ५५ पोलीस बांधवांची तपासणी करण्यात आली. यामध्ये रक्त, शुगर तपासणी, बी. पी., रक्तगट व ईसीजी आदी प्रकारच्या तपासण्या करचन आवश्यकतेनुसार मोफत औषधे देण्यात आली. याप्रसंगी सहाय्यक पोलीस निरीक्षक दिलीप ढेरे यांनी साई संजीवनी हॉस्पिटलच्या समाजकार्याचे व वैद्यकीय सेवेचे कौतुक करत आभार मानले.

याप्रसंगी साई संजीवनी हॉस्पिटलचे संचालक डॉ. राहुल मंजरे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. नयन बरबडे, डॉ. दस्तगीर शेख, डॉ. विजूदादा खुने, राकेश बाबर, निशाद सिस्टर, फैसल, संदीप ताकभाते, संदीप नागरगोजे आदींनी परिश्रम घेतले.

# रोटरीतर्फे अत्याधुनिक विज्ञान प्रयोगशाळेचे उद्‍घाटन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ११ ऑक्टोबर-**

रोटरी क्लब ऑफ सोलापूर प्रस्तुत आणि सायंटिफिक सेल्स अँड सर्व्हिसेस, लातूर यांच्या साहाय्याने साईबाबा शाळा, जुना कुंभारी रोड, न्यू विडी घरकुल परिसर येथे अत्याधुनिक सायन्स लॅबोरेटरीचे उद्‍घाटन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे उद्घाटक रोटरी डिस्ट्रिक ३१३२ चे नियुक्त प्रांतपाल रोटेरियन जयेश पटेल (डिस्ट्रिक्ट गव्हर्नर २०२६-२७) होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष रविकिरण संस्थेचे संस्थापक डॉ. श्रीपाद सुरवसे होते तर माजी प्रांतपाल रोटेरियन झुबिन अमारिया यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाच्या आयोजनासाठी साईबाबा शाळेचे मुख्याध्यापक तिप्पण्णा कोळी यांचे सहकार्य लाभले.



रोटरी क्लब ऑफ सोलापूर हे सदैव समाजविकासाच्या कार्यात अग्रणी राहिले आहे. त्यांचे शिक्षण क्षेत्रातील योगदान उल्लेखनीय असून आजची ही विज्ञान प्रयोगशाळा त्या परंपरेतलं आणखी एक तेजस्वी पाऊल आहे. असे प्रतिपादन रोटरी क्लबच्या अध्यक्षा रोटे धनश्री केळकर यांनी केले.

कार्यक्रमासाठी सचिव निलेश फोफलिया, लिटरसी प्रमुख शिवाजी उपरे, संदीप जव्हेरी, सुनील माहेश्वरी, ब्रिजकुमार गोयदानी, शांता येळमकर, आनंद गुंड्याल, संतोष कणेकर, आकाश बाहेती, केशव वळसे, श्रीकृष्ण व माधुरी गलगली उपस्थित होते.

# अपना नगरातील नवजीवन शाळेचे अतिक्रमित वर्ग, कार्यालय केले जमीनदोस्त

- पाडकामानंतर अखेर तो रस्ता झाला अतिक्रमणमुक्त !
- महापालिका बांधकाम, नगररचना व अतिक्रमण प्रतिबंधक विभागाची संयुक्त कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ ऑक्टोबर-**

मजरेवाडी येथील अपना नगर येथे असलेल्या नवजीवन इंग्लिश मीडियम स्कूलचे अतिक्रमित दोन वर्ग, एक पत्रा शेड रूम आणि शाळेचे कार्यालय अखेर आज जेसीबीने पाडकामाची कारवाई महापालिकेकडून करण्यात आली. मोठ्या पोलीस बंदोबस्तात जेसीबीच्या साह्याने महानगरपालिकेच्या बांधकाम, नगररचना व अतिक्रमण प्रतिबंधक विभागाकडून मोठ्या पोलीस बंदोबस्तात ही कारवाई करण्यात आली. या बांधकामानंतर अखेर तो रस्ता अतिक्रमणमुक्त झाला.



मजरेवाडी येथील आपना नगर परिसरात नवजीवन इंग्लिश मीडियम स्कूल आहे. या शाळेने मूळ बांधकाम आराखड्याच्या बाहेर जाऊन सुमारे २२ फूट रस्त्यावर दहा फूट अतिक्रमण केले होते. त्या रस्त्यावरच अनधिकृतपणे संरक्षक भिंत, पत्राशेड असलेले कार्यालय, वीट बांधकामाच्या भिंतीसह वर पत्रे टाकलेले दोन वर्ग, एक पत्रा शेडची खोली उभारली होती. हे अतिक्रमण काढून टाकण्याबाबत या शाळेला महापालिकेकडून यापूर्वी नोटीस देण्यात आली होती, मात्र शाळेने स्वतःहून अतिक्रमण काढून घेतले नाही. यामुळे मंगळवारी ७ ऑक्टोबर २०२५ रोजी महापालिकेच्यावतीने संरक्षक भिंत पाडण्याची कारवाई करण्यात आली होती. त्यावेळी संबंधितांकडून मोठा विरोधी झाला होता. दरम्यान, शाळेने केलेले इतर अतिक्रमण काढून टाकण्यास महापालिकेकडून शाळेला दोन दिवसांची मुदत देण्यात आली होती. या मुदतीत अतिक्रमण न काढल्यास महापालिकेकडून कारवाई करण्यात येईल, अशी सूचना देण्यात आली आहे. अखेर त्यानंतर आज शनिवारी महापालिकेच्या पथकाने पुन्हा कारवाई केली.

दरम्यान, आज शनिवारी महापालिकेच्या पथकाने मोठी कारवाई करत या शाळेचे दोन वर्ग जमीनदोस्त केले. एक पत्रा शेड रूम, पत्र्याचे कार्यालयही जेसीबीच्या साह्याने जागेवरच निष्काशीत केले. येथील कारवाई पूर्ण केली. सुमारे २२ फूट असलेल्या रस्त्यावर दहा फूट कब्जा करण्यात आला होता. हे सर्व अतिक्रमण काढून महापालिकेने अखेर हा रस्ता मोकळा केला, असे महापालिका अधिकाऱ्यांनी सांगितले.

या कारवाईवेळी एमआयडीसी पोलीस ठाणे तसेच अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे एकूण ५० पोलीस आणि सात अधिकारी तैनात होते. यावेळी कोणताही विरोध झाला नाही. संबंधितांनी सहकार्य केले असल्याचे महापालिका अधिकाऱ्यांनी सांगितले. कारवाई बघण्यासाठी लोकांनी मोठी गर्दी केली होती. महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार अतिक्रमण विरोधी मोहीम राबविण्यात येत आहे. महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे नियंत्रण अधिकारी तपण डंके, या विभागाचे अधीक्षक हेमंतकुमार डोंगरे आणि बांधकाम विभागाचे उपअभियंता नीलकंठ मठपती यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई पूर्ण करण्यात आली. यावेळी महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे प्रमुख हेमंतकुमार डोंगरे, कनिष्ठ अभियंता सुफियान पठाण , बांधकाम विभागाचे सहाय्यक अभियंता इर्शाद जरतार, कनिष्ठ अभियंता प्रमोद गोविंदवार, गणेश काकडे, सलमान शेख आदी उपस्थित होते होते.

# पाकिस्तानात अराजकता; लष्कराच्या गोळीबारात ११ ठार

### टीएलसीची हिंसक प्रदर्शने सुरूच ● लाहोर-इस्लामाबाद-पेशावर मार्ग बंद ● टीएलपी प्रमुखाच्या घरावर छापा



◆ **इस्लामाबाद, ११ ऑक्टोबर**

पंतप्रधान शाहबाज शरीफ आणि लष्करप्रमुख असीम मुनीर यांच्याविरोधात सुरू असलेल्या तहरीक-ए-लब्बैक पाकिस्तान अर्थात् टीएलपीच्या आंदोलनाला सामान्य नागरिकांचा पाठिंबा मिळाल्याने पाकिस्तानात सध्या अराजकतेची परिस्थिती निर्माण झाली. आंदोलन दडपण्यासाठी लष्कर तैनात करण्यात आले. आंदोलक आणि लष्करातील संघर्षात २४ तासांत १५ नागरिक ठार, तर ७० पेक्षा अधिक जखमी झाले आहेत. त्यात सैनिक आणि पोलिसांचा समावेश आहे.

हिंसक आंदोलनामुळे लाहोर-इस्लामाबाद-पेशावरकडे जाणारे मार्ग बंद करण्यात आले. पोलिसांनी टीएलसीच्या नेत्यांच्या घरावर छापेमारी केली. टीएलसीचा प्रमुख खादिम हुसैन रिझवी याच्या कुटुंबाला ताब्यात घेण्यात आले. रिझवीने दावा केला की, पोलिस आणि सैनिक निरपराध आणि निःशस्त्र नागरिकांवर गोळीबार करीत आहेत, जखमींना उपचारासाठीदेखील रुग्णालयात जाऊ दिले नाही. त्याने शाहबाज आणि मुनीर यांच्या राजीनाम्याची मागणी केली.

लाहोर, रावळपिंडी आणि इस्लामाबादमध्ये परिस्थिती अत्यंत तणावपूर्ण आहे. शहराच्या सीमा बंद करण्यात आल्या असून, हजारो टीएलपी समर्थक आणि सामान्य नागरिक इस्लामाबादकडे कूच करत आहेत. यामुळे संपूर्ण मार्गावर कडक सुरक्षा व्यवस्था तैनात आहे. सध्या इंटरनेट सेवा बंद करण्यात आल्या. अनेक भागांत पोलिस आणि निदर्शकांमध्ये संघर्ष सुरूच आहे. संचारबंदी लागू असूनही हजारो नागरिक रस्त्यावर उतरून शाहबाज सरकारविरोधात निदर्शने करीत आहे.

**स्वार्थासाठी संघटनेचा वापर**

मानवाधिकार कार्यकर्ते आरिफ आजकिया म्हणाले, लष्कर-ए-तोयबाप्रमाणेच टीएलसीचा वापर लष्कर स्वार्थासाठी करीत आहे.२०१५ मध्ये स्थापन झालेल्या या संघटनेने पाकिस्तानला वारंवार त्रास दिला. २०१७ मध्ये त्यांनी इस्लामाबादला २१ दिवस वेढा घातला होता. इम्रान खान सरकारने २०२१ मध्ये टीएलसीशी एक गुप्त करार केला. त्यानंतर रिझवी आणि दोन हजारांपेक्षा जास्त कार्यकर्त्यांना सोडण्यात आले. मात्र आताची परिस्थिती पाहता, लष्करालाच आव्हान दिले आहे. (वृत्तसंस्था)

### लष्करावर उलटली तहरीक-ए-लब्बैक

लंडनमधील पाकिस्तानी मानवाधिकार कार्यकर्ते आरिफ आजकिया यांनी वृत्तसंस्थेला सांगितले की, पाकिस्तानी लष्कराच्या पाठिंब्याने कट्टरपंथी संघटना तहरीक-ए-लब्बैकचा विस्तार झाला. मात्र, आता ही संघटना लष्करावरच उलटली आहे. ही संघटना मोठी करण्यामागे नागरी सरकारवर दडपण आणण्याचा हेतू लष्कराने ठेवला होता. भारताविरोधात गरळ ओकणे आणि पाकिस्तानी जनतेला भडकविण्यासाठी लष्कराने या संघटनेला वेळोवेळी आर्थिक मदत केली. ■

### असीम मुनीर विश्वासघातकी : रिझवी

टीएलसीचा प्रमुख खादिम हुसैन रिझवी यांनी निवेदनात म्हटले की, लष्करप्रमुख असीम मुनीर हा विश्वासघातकी आहे. त्याने पाकिस्तानच्या जनतेला मूर्ख बनविले आणि आमचा राजकारणासाठी उपयोग केला. त्याचा आम्ही लवकरच भंडाफोड करणार असून, पाकिस्तानी जनतेसमोर त्याला उघडे पाडू. ■

# टीटीपीचा पोलिस प्रशिक्षण केंद्रावर हल्ला

### सात पोलिस ठार, कारवाईत पाच हल्लेखोरही मृत्युमुखी

◆ **इस्लामाबाद, ११ ऑक्टोबर**

खैबर पख्तुनख्वा प्रांतातील डेरा इस्माईल खान जिल्ह्यात शुक्रवारी रात्री तहरिक-ए -तालिबान पाकिस्तान अर्थात् टीटीपीच्या दहशतवाद्यांनी पोलिस प्रशिक्षण केंद्रावर हल्ला केला. त्यानंतर झालेल्या चकमकीत सात पोलिस ठार झाले. प्रत्युत्तरात सुरक्षा दलाच्या कारवाईत पाच दहशतवाद्यांना ठार करण्यात आले. हा हल्ला पाकिस्तानच्या अंतर्गत सुरक्षेसाठी मोठा धक्का मानला जात आहे.

एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले की, रट्टा कुलाची परिसरातील पोलिस प्रशिक्षण केंद्राच्या मुख्य प्रवेशद्वारावर



स्फोटकांनी भरलेला ट्रक धडकला आणि स्फोट झाला. या स्फोटात केंद्राच्या भिंतीचा एक भाग कोसळला, ज्यामध्ये एक पोलिस जागीच ठार झाला. त्यानंतर ७-८ सशस्त्र दहशतवादी केंद्रात घुसले आणि त्यांनी अंदाधुंद गोळीबार केला. हल्लेखोरांनी ग्रेनेड आणि इतर शस्त्रांचा वापरही केला. सहा तास

चाललेल्या चकमकीत सुरक्षा दलांनी एका आत्मघातकी हल्लेखोरासह सर्व पाच जणांना ठार केले.

हल्लेखोरांकडून आत्मघातकी जॅकेट, स्फोटके आणि दारुगोळा जप्त करण्यात आला. केंद्रात उपस्थित असलेल्या २०० पेक्षा जास्त पोलिस कर्मचारी आणि प्रशिक्षण घेणाऱ्या नवनियुक्त पोलिसांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले.

या घटनेत १३ पोलिस कर्मचारी जखमी झाले आणि त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. मृतांमध्ये एक अधिकारी आणि इतर कॉन्स्टेबलचा समावेश आहे.

टीटीपीने हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली. हल्लेखोरांनी बॉडी कॅमेऱ्यांचा वापर करून हल्ल्याचे लाईव्ह स्ट्रिमिंगही केले. (वृत्तसंस्था)

# अमेरिकेत शासकीय कर्मचाऱ्यांची कपात

### शटडाऊनमुळे संकट

◆ **वॉशिंग्टन, ११ ऑक्टोबर**

अमेरिकेच्या सिनेटमध्ये वित्त विधेयक मंजूर करण्यात अपयशी ठरल्याने राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प अडचणीत आले असताना, आता आर्थिक संकटामुळे शासकीय कर्मचाऱ्यांच्या कपातीचा निर्णय घेण्यात आला.

अमेरिकेत सध्य शटडाऊन असून, बहुतांश कर्मचाऱ्यांना बिनपगारी सुटीवर पाठविण्यात आले. त्यात अमेरिकन अंतराळ संशोधन संस्था अर्थात नासाच्या १५ हजार कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.

कर्मचाऱ्यांच्या पगारासाठी पैसाच उपलब्ध नसल्याने संघीय कर्मचाऱ्यांना कामावरून काढून टाकण्यास सुरुवात केली आहे. अशातच विरोधी पक्ष डेमोक्रॅटिक आणि सत्ताधारी रिपब्लिकन पक्षाच्या अनेक सदस्यांनी या निर्णयाचा निषेध केला. अमेरिकेच्या ऑफिस ऑफ बजेट अँण्ड मॅनेजमेंटचे संचालक रस वॉट यांनी 'एक्स'वरील पोस्टमध्ये लिहिले की, शटडाऊनमुळे प्रशासनाकडे खर्च करण्यासाठी निधी उपलब्ध नाही. कर्मचाऱ्यांचे पगार थकित आहे. त्यामुळे संघीय सरकारांनी कर्मचारी कपात करण्यास सुरुवात केली आहे.

शिक्षण, अर्थ, गृह सुरक्षा आणि आरोग्य आणि मानव सेवा या विभागांत कर्मचाऱ्यांची कपात केली जात आहे. आतापर्यंत दोन हजार कर्मचाऱ्यांना नोकरीवरून काढण्यात आले आणि परिस्थिती अशीच राहल्यास ही संख्या वाढणार आहे.

**डेमोक्रॅट्समुळेच आर्थिक संकट : ट्रम्प**

प्रसार माध्यमांशी बोलताना ट्रम्प म्हणाले, अमेरिकेतील आर्थिक संकटासाठी डेमोक्रॅट्सचा हेकेखोरपणा जबाबदार आहे, त्यांनी वित्त विधेयक मंजूर करण्यास विरोध दर्शवल्यामुळे कर्मचाऱ्यांना नोकऱ्या गमावाव्या लागत आहे. (वृत्तसंस्था)

### अमेरिकेत कारखान्याला आग; १९ कामगार ठार

◆ **न्यू यॉर्क, ११ ऑक्टोबर**

अमेरिकेच्या टेनेसी राज्यातील लष्करी स्फोटकांच्या कारखान्यात शुक्रवारी स्फोट झाला. त्यानंतर लागलेल्या आगीत १९ कामगारांचा होरपळून मृत्यू झाला, तर १५ जण जखमी असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. टेनेसी राज्याचे गव्हर्नर ख्रिस डेव्हिस यांनी सांगितले, अमेरिकन लष्कराच्या ताब्यातील शस्त्रसामग्रीच्या कारखान्यात मोठा स्फोट झाला. त्यानंतर आग पसरली. घटनेची माहिती मिळताच बचाव पथकाने आगीवर नियंत्रण आणले आणि कामगारांना बाहेर काढले. (वृत्तसंस्था)

### मुस्लिम संघटनांचा मचाडोंना विरोध

# नोबेल परत घेण्याची मागणी

◆ **काराकस, ११ ऑक्टोबर**

व्हेनेझुएलाच्या विरोधी पक्षनेत्या मारिया कोरिना मचाडो यांना २०२५ चा नोबेल शांतता पुरस्कार विजेता म्हणून घोषित करण्यात आले तेव्हा, त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव झाला, तर दुसरीकडे अनेक संघटनांनी हा पुरस्कार मागे घेण्याची मागणी केली. एवढेच नाही तर त्यांच्या व्हेनेझुएलामध्येही त्यांना शांतता पुरस्कार मिळाल्याबद्दल टीका होत आहे.



देशात पुन्हा लोकशाही आणण्यासाठी अहिंसक संघर्ष केल्याबद्दल त्यांची या प्रतिष्ठित पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. डाव्या विचारसरणीचे विचारवंत आणि राजकीय विरोधक याचा विरोध करतात. विरोधकांचा असा दावा आहे की, मचाडो यांचे अमेरिकन उजव्या विचारसरणीशी जवळचे संबंध आहेत. व्हाईट हाऊसनेही त्यांच्या पुरस्कारावर टीका केली आणि म्हटले की, पुरस्कार प्रदान करताना समितीने राजकारणाला शांततेपेक्षा वर ठेवले. व्हेनेझुएलाचे लोक तिला नोबेल पुरस्कार मिळाल्याबद्दल आनंदी आहेत. कारण, त्यांचा असा विश्वास आहे की यामुळे तिला अमेरिकेत हद्दपार करण्याचा धोका कमी होईल. अनेकांचा असा युक्तिवाद आहे की, मचाडो व्हेनेझुएलाच्या सरकारविरुद्ध परदेशी निर्बंधांना समर्थन देतात आणि म्हणूनच तिला नोबेल पुरस्कार मिळू नये.

अमेरिकेतील मुस्लिम नागरी हक्क गट असलेल्या कौन्सिल ऑन अमेरिकन इस्लामिक रिलेशन्सनेही (सीएआयआर) या निर्णयावर टीका केली आणि म्हटले की नोबेल समितीने हा पुरस्कार रद्द करावा. व्हेनेझुएलाच्या सत्ताधारी पक्षाच्या एका खासदाराने नोबेल पुरस्कार हा एक लाजीरवाणा पुरस्कार असल्याचे म्हटले आहे. तिने विदेशी शक्तींच्या मदतीने देशात अस्थिरतेचे वातावरण निर्माण केले आहे. सीएआयआरने म्हटले की, मचाडो इस्रायलच्या मुस्लिमविरोधी अजेंड्याचे समर्थन करतात. मुस्लिमांवरील अत्याचारांना ती उघडपणे समर्थन देते. व्हेनेझुएलाचे माजी उपराष्ट्रपती पाब्लो इग्लेसियास म्हणाले की, मचाडो देशात सत्तापालट करण्याचा प्रयत्न करीत आहेत. ती ॲडॉल्फ हिटलरच्या विचारसरणीचे समर्थन करते. पुढील वर्षी पुतिन आणि झेलेन्स्की यांना नोबेल शांतता पुरस्कार मिळण्याची शक्यता आहे. (वृत्तसंस्था)



उत्तर कोरियातील सत्ताधारी वर्कर्स पार्टीच्या ८० व्या वर्धापन दिनानिमित्त प्योंगयोंग येथे आयोजित केलेल्या परेडमध्ये हुकूमशहा किंम जोंग उन यांनी व्हॉसाँग-२० हे आंतरखंडीय क्षेपणास्त्र जगासमोर आणले

# गुगल आंध्रप्रदेशात उभारणार सर्वांत मोठे माहिती केंद्र

◆ **विशाखापट्टणम्, ११ ऑक्टोबर**

गुगल भारताच्या डिजिटल क्षेत्रात आतापर्यंतची सर्वांत मोठी गुंतवणूक करणार आहे. आंध्रप्रदेशातील विशाखापट्टणम येथे आशिया खंडातील सर्वांत मोठे माहिती केंद्र उभारणार आहे. या प्रकल्पात कंपनी सुमारे १० अब्ज डॉलर्स म्हणजेच सुमारे ८,७३० कोटी रुपयांची गुंतवणूक करणार आहे.

गुगल विशाखापट्टणम्‌मध्ये एक गिगावॅट क्षमतेचा मेगा माहिती केंद्र क्लस्टर स्थापित करणार आहे. हा प्रकल्प केवळ भारतासाठीच नव्हे तर, संपूर्ण आशिया खंडातील सर्वांत मोठा माहिती हब ठरणार आहे. तीन वेगवेगळ्या परिसरामध्ये हे क्लस्टर उभारण्यात येणार आहे. विशाखापट्टणम् जिल्ह्यातील रामबिल्ली यांचा समावेश असेल. गुगलचा हा डेटा हब प्रकल्प जुलै २०२८ पर्यंत पूर्णपणे कार्यान्वित होणार आहे. गुगल या गुंतवणुकीतून उच्च क्षमतेच्या सबमरीन केबल्स, केबल लॅंडिंग स्टेशन, मेट्रो फायबर नेटवर्क आणि अत्याधुनिक दूरसंचार पायाभूत सुविधघंचे देखील बोधकाम करणार आहे. (वृत्तसंस्था)

# काँग्रेस नेत्याकडून राहुल गांधींना 'नोबेल' देण्याची मागणी

### भाजपाने म्हटले, ९९ वेळा निवडणुका हरल्याबद्दल पुरस्कार

◆ **नवी दिल्ली, ११ ऑक्टोबर**

नोबेल पुरस्कार जाहीर झाल्यानंतर काँग्रेसने व्हेनेझुएलाच्या मुख्य विरोधी पक्षनेत्या मारिया कोरिना मचाडो यांची तुलना लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्याशी केली. काँग्रेस प्रवक्त्यांनी असे सूचित केले की, ज्याप्रमाणे माचाडो यांना त्यांच्या देशातील लोकशाही हक्कांसाठीच्या संघर्षासाठी पुरस्कार मिळाला, त्याचप्रमाणे राहुल गांधी संविधान वाचवण्यासाठी लढत आहेत.



काँग्रेस प्रवक्ते सुरेंद्र राजपूत यांनी एका पोस्टमध्ये मारिया आणि राहुल गांधी यांच्यातील अनेक समानता नमूद केल्या. यामुद्यावर भाजपाचे राष्ट्रीय प्रवक्ते शहजाद पूनावाला यांनी प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले की, ९९ वेळा निवडणुका हरल्याबद्दल राहुल गांधींना नोबेल पुरस्कार मिळाला पाहिजे.


काँग्रेस प्रवक्त्यांनी 'एक्स'वर राहुल गांधी आणि मचाडो यांचा फोटो शेअर करीत लिहिले की, यावेळी संविधानाचे रक्षण केल्याबद्दल व्हेनेझुएलाच्या विरोधी पक्षनेत्याला नोबेल शांतता पुरस्कार देण्यात आला आहे. भारताचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी हे देशाच्या संविधानाचे रक्षण करण्यासाठी लढाईचे नेतृत्व करीत आहेत. दोघेही आपापल्या देशांमध्ये लोकशाही आदर्शांसाठी लढणारे विरोधी पक्षनेते आहेत. तथापि, पक्षाने यासाठी कोणतीही अधिकृत मागणी केलेली नाही.

**भाजपाने केले लक्ष्य**

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना नोबेल शांतता पुरस्कार देण्याची मागणी करणाऱ्या सुरेंद्र राजपूत यांच्या पोस्टवरून भाजपाने काँग्रेसवर निशाणा साधला आहे. त्यांनी इन्स्टाग्रामवरील पोस्टमध्ये राहुल गांधींची तुलना मारिया कोरिनाशी करणे विचित्र म्हटले आहे. शहजाद पूनावाला म्हणाले की, काँग्रेस राहुल बाबा यांना नोबेल पुरस्काराची मागणी करीत आहे, हे विचित्र आहे. त्यांना हा पुरस्कार ढोंगीपणा, खोटेपणा, ९९ वेळा निवडणुका हरणे आणि १९७५ आणि १९८४ मध्ये लोकशाही आणि संविधानाची हत्या केल्याबद्दल मिळायला हवा. जर या गोष्टींसाठी नोबेल पुरस्कार असता तर, त्यांना तो मिळाला असता. (वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### विराटचे शेजारी बनले अमिताभ




**मुंबई** : मेगास्टार अमिताभ बच्चन शनिवारी ८३ वर्षांचे झाले. या खास प्रसंगाचे औचित्य साधून बिग बी यांनी अलिबागमध्ये ६.५९ कोटी रुपयांच्या तीन मालमत्ता स्वतःला भेट दिल्या आहेत. यासोबतच ते आता अलिबागमध्ये क्रिकेट स्टार विराट कोहलीचे शेजारी बनले आहेत. मालमत्ता नोंदणी कागदपत्रांनुसार, अमिताभ बच्चन यांनी अलिबाग फेज-२ प्रकल्पांतर्गत हाऊस ऑफ अभिनंदन लोढाकडून भूखंड खरेदी केले. हा भूखंड एकूण ९,५५७ चौरस फूट आहे. ७ ऑक्टोबर रोजी ९०,००० नोंदणी शुल्क आणि ३९.५८ लाख मुद्रांक शुल्क भरण्यात आले. ■

### लग्नानंतर चार महिन्यांतच मयूरी झाली निराश



**मुंबई** : 'अस्मिता' मालिकेमुळे घराघरात पोहोचलेली मयूरी वाघ हिने या मालिकेतील सहकलाकार पीयूष रानडेसोबत लग्न केले आणि दोन वर्षांतच त्यांचा घटस्फोट झाला. याविषयी प्रथमच मयूरीने आपले मन मोकळे केले. ती म्हणाली, लग्नानंतर चार महिन्यांतच मला लक्षात आले की, माझी जोडीदाराविषयीची निवड चुकली आहे. त्याचे वागणे अतिशय संदिग्ध होते. त्याविषयी विचारणा केली असता, तो आक्रमक व्हायचा. मला शारीरिक आणि मानसिक त्रास प्रचंड झाला. तो माझ्याविषयी बोलायचा इथवर मी सहनही केले. पण, जेव्हा तो माझ्या वडिलांविषयी अद्वातद्वा बोलला तेव्हा माझा संयम सुटला. मी त्याच्यापासून वेगळे होण्याचा निर्णय घेतला. माझ्या आई-वडिलांनीही मला यातून बाहेर काढण्यात बरीच मदत केली. ■

### गौतम अदानींकडून कार्तिक आर्यनचा सन्मान



**मुंबई** : मुंबईतील व्हिसलिंग वुड्स इंटरनॅशनल येथे झालेल्या सेलिब्रेट सिनेमा-२०२५ च्या समारोप समारंभात उद्योगातील अनेक मोठी नावे एकाच मंचावर दिसली. यावेळी अदानी ग्रुपचे अध्यक्ष गौतम अदानी यांनी अभिनेता कार्तिक आर्यनचा 'चंदू चॅम्पियन' चित्रपटासाठी सन्मान केला. डॉ. प्रीती अदानी, सुभाष घई, राजकुमार हिरानी, जॅकी श्रॉफ आणि महावीर जैन हेदेखील व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी सुभाष घई म्हणाले की, चंदू चॅम्पियन चित्रपटातील कार्तिकचे काम आतापर्यंतचे सर्वोत्तम आहे. अदानी म्हणाले की, सिनेमा हा केवळ मनोरंजनाचा मार्ग नाही तर, देशाच्या ओळखीचे आणि आत्म्याचे प्रतीक आहे. एआयला घाबरण्याऐवजी आपण ते स्वीकारले पाहिजे, कारण ते चित्रपट निर्मितीचे भविष्य आहे. ■

# कुटुंबाला पाकिस्तान-यूएईमधून येताहेत् द्वेषपूर्ण संदेश

### समीर वानखेडे यांचा दावा

◆ **मुंबई, ११ ऑक्टोबर**

मादकपदार्थ नियंत्रण विभागाचे (एनसीबी) माजी विभागीय संचालक समीर वानखेडे यांनी शनिवारी दावा केला की, त्यांच्या कुटुंबाला पाकिस्तान, यूएई आणि बांगलादेशमधून द्वेषपूर्ण संदेश येत आहेत.

आर्यन खानच्या 'द बॅड्स ऑफ बॉलिवूड' या वेबसीरिजवर त्यांनी रेड चिलीज एंटरटेनमेंट आणि नेटफ्लिक्सविरुद्ध दिल्ली उच्च न्यायालयात मानहानीचा खटला दाखल केला, तेव्हा हे सर्व सुरू झाले. वानखेडे यांनी सांगितले की, हा मुद्दा माझ्या नोकरी किंवा व्यवसायाशी नाही तर, त्याच्या वैयक्तिक सन्मान आणि प्रतिष्ठेशी संबंधित आहे. हा खटला न्यायप्रविष्ट आहे, म्हणून यावर अधिक भाष्य करणार नाही.

समीर वानखेडे म्हणाले की, माझ्याविरुद्ध तयार केलेली व्यंग्यात्मक किंवा विडंबनात्मक सामग्री केवळ माझीच नाही तर, ड्रग्ज गैरवापराच्या विरोधात काम करणाऱ्यांचीही बदनामी करते. त्यांनी स्पष्ट केले की, व्यावसायिक कामाशी संबंधित नसलेली पत्नी, बहीण आणि कुटुंबातील इतर सदस्यांना धमक्या मिळत आहेत. माझ्यामुळे माझ्या कुटुंबाचा छळ मी सहन करणार नाही. या धमक्यांची माहिती पोलिसांना नियमितपणे देणार असल्याचे त्यांनी सांगितले.

**उच्च न्यायालयाने सात दिवसांत मागितले उत्तर**


समीर वानखेडे यांच्या मानहानीच्या प्रकरणात दिल्ली उच्च न्यायालयाने अभिनेता शाहरुख खान, रेड चिलीज एन्टरटेनमेंट आणि ओटीटी प्लॅटफॉर्म नेटफ्लिक्सला समन्स बजावला. वानखेडे यांनी 'द बॅड्स ऑफ बॉलिवूड' या वेबसीरिजद्वारे प्रतिष्ठा खराब केल्याचा आरोप केला आहे. त्यांना सात दिवसांत त्याचे उत्तर दाखल करण्यास सांगितले आहे. (वृत्तसंस्था)

# आता एसटीचाही कळणार ठावठिकाणा; आपली एसटी ॲप प्रवाशांच्या सेवेत

**सोलापूर, दि. ११ ऑक्टोबर -**

आता एसटीचाही ठावठिकाणा प्रवाशांना कळणार आहे. परिवहन विभागाने आपली एसटी हे नवीन ॲप प्रवाशांच्या सेवेत आणले आहे. यामुळे प्रवाशांना आता एसटी थांब्यावर ताटकळत उभे रहावे लागणार नाही.

बारा हजारपेक्षा जास्त बसेस आणि राज्यभरातील एक लाखपेक्षा जास्त मार्गाचे मॅपिंग करून हे ॲप विकसित करण्यात आले आहे. या ॲपमुळे प्रवाशांना आपल्या जवळच्या बसस्थानकाची माहिती मिळेल. प्रवासी माहिती केंद्राद्वारे बस कुठून सुटणार आणि ती बस थांब्यावर केव्हा पोहोचणार याची माहिती मिळेल.



ॲपमध्ये तिकीट आरक्षण सेवा देण्यात आली आहे. प्रवाशांच्या सुरक्षेच्या दृष्टीने ॲपमध्ये आपत्कालीन क्रमांकांची यादी उपलब्ध करण्यात आली आहे. कोणत्याही आपत्कालीन क्रमांकावर संपर्क साधणे शक्य होणार आहे. लवकरच एसटीच्या सध्या असलेल्या तिकीट आरक्षण ॲपमध्येही बसची थेट माहिती समाविष्ट करणार आहे. आगाऊ तिकीट आरक्षण करणाऱ्या प्रवाशांनाही मोठी सुविधा मिळणार आहे. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी या ॲपचे आपली एसटी असेनामकरण केले आहे. या ॲपमुळे सर्वसामान्य प्रवाशांचाप्रवास अधिक सुलभ, सोयीस्कर आणि पारदर्शक होईल असा विश्वास एसटी महामंडळाने व्यक्त केला आहे.

रोजमाल्टा ऑटोटेक लि. या कंपनीच्या साहाय्याने विकसित केले आहे. एसटी महामंडळातील १२ हजारपेक्षा जास्त बस व राज्यभरातील एक लाखापेक्षा जास्त मार्गाची माहिती ॲपमध्ये समाविष्ट करण्यात आली आहे. लाखो प्रवासी वापर करणार असल्यामुळे सुरुवातीच्या टप्प्यामध्ये काही तांत्रिक त्रुटी निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. प्रवाशांनी तांत्रिक त्रुटींबाबत सूचित करावे, असे एस टी महामंडळाकडून करण्यात आले आहे.



रोखठोक

दिनेश गुणे

# गोष्ट छोटी, डोंगराएवढी!

सामाजिक समतेच्या संवेदना ज्या समाजात जिवंत असतात तो समाज सुसंस्कृत आणि समंजस समजला जातो. त्या दृष्टीने महाराष्ट्र हे सुदैवी राज्य आहे. समतेच्या जाणिवा या राज्यात शतकांपासून जिवंत आहेत आणि या राज्याने संपूर्ण देशात या जाणिवा रुजविण्याचे कामदेखील व्रतस्थपणे केले आहे. सामाजिक सुधारणांचा पाया या राज्यात सर्वांत अगोदर घातला गेला आणि त्या विचारांचा मागोवा घेत देशात समाजसुधारणेचे वारे वाहू लागले. या परंपरेची वाटचाल कालपरवाची नाही. ती एक प्रदीर्घ वाटचाल आहे आणि त्यामध्ये अनेक सुधारक, विचारवंत, राजकीय नेते, समाजाच्या विविध वर्गांतील सामान्य माणसेही मनापासून सहभागी झाली आहेत. म्हणूनच, समतेच्या संवेदना जिवंत राहण्यासाठी जेव्हा साद घालू लागतात तेव्हा या विचारापासून भरकटण्याच्या भीतीने समाज सजग होतो आणि सामाजिक समतेच्या रस्त्यावरील वाटचाल पुन्हा सुरळीत सुरू होते. या वाटेवर अडथळे अजिबात नाहीत असे नाही. त्यावर हेतुत: काटे पसरविण्याचे उद्योग होत नाहीत असेही नाही. पण ते अगदी अनैसर्गिकही म्हणता येणार नाही. समाज हा विविध मानसिकतांचा, वेगवेगळ्या स्वभावांचा समूह असल्याने त्यामध्ये ज्याप्रमाणे निरपेक्ष कर्तव्यबुद्धी आढळते, तसेच क्षुद्र स्वार्थाचेही अस्तित्व दिसून येते. तसे नसते तर सामाजिक सुधारणा ही एका दीर्घ संघर्षाची वाटचाल राहिलीच नसती. तो एक सहज, सरळसोट रस्ता झाला असता आणि सारे समाजसमूह एकमेकांचे हात धरून सार्वत्रिक प्रगतीचे ध्येय गाठू शकले असते. कित्येक दशके सुरू असलेला हा संघर्ष अजूनही संपलेला नाही आणि नजीकच्या भविष्यात तो पुरता संपुष्टात येईल असेही छातीठोकपणे सांगता येत नाही. म्हणूनच, संवेदना जिवंत ठेवण्याचे काम सातत्याने करावे लागते. अनेक जण ते काम कृतीतून करत असतात, तर काही जण केवळ उक्तीतूनच समतेची स्तोत्रे गात राहतात. तसे पाहता, ऊठसूठ शाहू-फुले-आंबेडकरांचे केवळ उक्तीतून स्मरण करत राहणे हा सामाजिक सुधारणांच्या डोंगराएवढ्या आव्हानातला केवळ एक हिमनगाच्या वरच्या भागाचा किरकोळ कोपरा असतो, पण तो कोपरा कायम झगमगाटात राहील आणि त्यामुळे समाजाचे डोळे दिपलेले राहतील याची पुरेपूर काळजी घेतली जात असल्याने असे नामजप करणे म्हणजेच सामाजिक समतेचा पुरस्कार करणे असते असे वाटू लागते आणि समाज संभ्रमित होतो. त्यामुळे समानतेच्या मूळ जबाबदारीचा विसर पडू लागतो आणि केवळ समतेच्या परंपरांची स्तुती करणाऱ्या पोवाड्यांचे सूर सर्वत्र घुमत राहतात. अर्थात, समतेचा हुंकार सातत्याने उमटत राहणेदेखील समाजास जागरूक ठेवण्याच्या कामी महत्त्वाचेच असल्याने महाराष्ट्राने त्याचा कधीच अनादरही केलेला नाही, उलट सुधारकांच्या कामाची केवळ आठवण करून देत राहणाऱ्यांनाही सुधारकांच्या रांगेत बसवून त्यांचा सन्मानच केला गेला. म्हणूनच, महाराष्ट्राच्या सुधारक परंपरेची पताका कायम फडकत राहिली आहे, ही बाब अगदीच अमान्य करता येणार नाही. त्यामुळेच, कधी कधी अशा जाणिवा काहीशा विलंबाने जाग्या झाल्या, तरी त्या कायमच्या पुसल्या गेलेल्या नाहीत याची खात्री पटते आणि महाराष्ट्रासारख्या पुरोगामी, प्रगतिशील विचारांच्या राज्याला ते शोभादायक नाही याची खंत व्यक्त केली जाते. तशी प्रामाणिक कबुली देण्याचा मोठेपणा दाखविणे हादेखील एक सुसंस्कृत समाजाच्या लक्षणांचाच एक भाग असतो.



महाराष्ट्राच्या सरकारने अलिकडेच तशी एक कबुली देऊन आपल्या समंजसपणाची साक्ष समाजास दिली आहे. दोन दिवसांपूर्वी, ९ ऑक्टोबर रोजी, राज्याच्या ग्रमाविकास खात्याने एक शासन निर्णय जारी केला. राज्याच्या ग्रामीण भागात आजही अनेक रस्ते, वाड्या, वस्त्यांना जातिवाचक नावाने ओळखले जाते. अनेक दशकांपासून त्यांच्या ओळखीवर जातिवाचक उल्लेखाचा शिक्का कायमचा बसलेला आहे. सामाजिक सुधारणांचा विचार देशात पसरवून परिवर्तनाचे पर्व आणण्यासाठी पुढाकार घेणाऱ्या महाराष्ट्राला याची कधीपासूनच खंत वाटत होती. त्यामुळेच, राज्यामधील शहरांतील व ग्रामीण भागांतील अनेक गावांची, वस्त्यांची व रस्त्यांचीही वर्षानुवर्षांपासून असलेली जातिवाचक नावे कायमची पुसून त्याऐवजी अशा गावे, वस्त्या व रस्त्यांना लोकशाही मूल्यांशी जोडणारी किंवा आपल्या सामाजिक, राजकीय कर्तृत्वातून इतिहास निर्माण करणाऱ्या महापुरुषांची नावे देण्याचा हा विचार तसा अगदीच कालपरवाचा नाही. गेल्या अनेक वर्षांपासून महाराष्ट्रातील वेगवेगळ्या सरकारांना ही बाब बोचत होती. याआधीही सरकारने याची अनेकदा नोंदही घेतली होती आणि अशी नावे बदलण्याचे निर्णयही जारी केले होते. आता पुन्हा, अनेक वर्षांनंतर महाराष्ट्राचे सरकार यावर काही निश्चित निर्णय घेण्याच्या व ठोस कार्यवाहीच्या मानसिकतेत आले आहे, असे नव्या निर्णयावरून दिसते. आजवर हा विचार कृतीत आणण्यात काही तांत्रिक अडथळेदेखील आले होते. अर्थात, कोणत्याही सकारात्मक बाबीची अंमलबजावणी करताना असे अडथळे येतही असतात. सरकार ही तर नियमांच्या चौकटीमध्ये बांधली गेलेली व्यवस्था असते. मनात आले म्हणून लगेच ते अंमलात आणले असे सरकारला करता येत नाही. त्यासाठी सर्व नियमांनी आखून दिलेल्या प्रक्रिया पार पाडाव्या लागतात, आणि तसे झाल्याची खात्री झाल्यानंतरच अंमलबजावणीची कार्यवाही सुरू होते. कदाचित त्यालाही काही काळ द्यावा लागतो. कदाचित त्यामुळेच, वेळोवेळी घेतल्या जाणाऱ्या निर्णयांचे आदेश जारी होऊनही ते कार्यवाहीच्या टप्प्यापर्यंत पोहोचण्यास विलंब झाल्यामुळे अनेक महत्त्वाचे निर्णय रखडलेलेही दिसून येत असतात. रस्ते, गावे आणि वाड्या-वस्त्यांची जातिवाचक नावे बदलून त्याऐवजी महापुरुषांची किंवा लोकशाही मूल्यांची जपणूक करणारी नावे देण्याचा विचारही बहुधा याच प्रक्रियेत अंमलबजावणीची प्रतीक्षा करत दीर्घकाळ रखडला असावा, हे या नव्याने जारी करण्यात आलेल्या नव्या शासन निर्णयातील सरकारच्या प्रांजळ कबुलीतून स्पष्ट होते. नवा शासन निर्णय जारी झाला असला, तरी अशी नामांतरे करून जातिवाचक नावांऐवजी नवी नावे देण्याबाबतच्या कार्यवाहीचीदेखील एक प्रशासकीय पद्धती आहे. या निर्णयानुसार, असा नामबदल करण्याची कार्यवाही शहरी भागात नगरविकास विभागाने व ग्रामीण भागात ग्रामविकास विभागाने विहित कार्यपद्धतीनुसारच करावयाची असते. मात्र, गावाचे नाव बदलण्याची कार्यवाही सामान्य प्रशासन विभागाकडून करण्यात येते, ही बाब स्पष्ट झाल्यानंतर नव्या निर्णयाद्वारे काही खुलासे करण्यात आले. राज्याच्या ग्रामीण भागातील केवळ वस्त्यांची आणि रस्त्यांची नावे बदलून नवी नावे देण्याच्या कार्यवाहीचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांकडे देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. एखाद्या वस्तीचे किंवा रस्त्याचे असे नामांतर करावयाचे असल्यास संबंधित गावाने ग्रामसभेत तसा ठराव संमत करून त्याबाबतचा प्रस्ताव संबंधित गटविकास अधिकारी यांच्याकडे सादर करावा व गटविकास अधिकाऱ्यांनी तो तपासून संबंधित मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे पाठवावा. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी तो तपासून जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठवावा व आलेल्या संबंधित प्रस्तावास जिल्हाधिकाऱ्यांनी अंतिमत: मंजुरी द्यावी अशी त्रिस्तरीय व्यवस्था नव्या निर्णयाद्वारे करण्यात आली आहे. वरवर पाहता, शासकीय कार्यपद्धतीच्या तपासणीच्या चाळणीतून जाताना असे प्रस्ताव रखडण्याची भीती असली, तरी त्यापलीकडे जाऊन या नव्या कार्यपद्धतीचे एक वेगळेपण लक्षात घ्यावयास हवे. ते म्हणजे, असे निर्णय घेण्याची प्रक्रिया केवळ शासनाच्या स्तरावर पार पाडली जाणार नाही, तर गावकऱ्यांच्या सहभागातून यासंबंधीच्या कार्यवाहीची सुरुवात होईल अशी शासनाची भूमिका यामध्ये स्पष्टपणे उमटलेली दिसते. जातिवाचक नावांमधून दिसणारी सामाजिक विषमतेची मुळे उपटून काढण्याची मानसिकता नागरिकांत रुजावी आणि तेथून उगवलेल्या नव्या समतेच्या विचाराच्या रोपट्यास शासनाने बळ द्यावे हा या प्रक्रियेमागचा हेतू दिसतो. महाराष्ट्राच्या समानतेच्या चळवळीच्या प्रदीर्घ वाटचालीच्या वैचारिक बांधिलकीची जाणीव जागी करणाऱ्या या निर्णयाची अंमलबजावणी जेव्हा होईल, तो राज्याच्या सामाजिक समतेच्या क्रांतीचा पुढचा टप्पा ठरेल, यात शंका नाही.

याअगोदरही, राज्य सरकारने हाच निर्णय पाच वर्षांपूर्वी जारी केला होता. त्यानंतर एप्रिल २०२१ मध्ये त्यासंबंधीचे एक परिपत्रकही जारी केले गेले आणि तेव्हाही या निर्णयाची राज्यातील अनेक माध्यमांनी दखल घेतली होती. सामाजिक समतेच्या या नव्या प्रयत्नांचे तेव्हाही सार्वत्रिक स्वागतच झाले होते. आता पुढच्या चार वर्षांनंतर पुन्हा या प्रयत्नांना नवा वेग आला आहे, असे दिसते. तरीही या निर्णयाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी शासकीय यंत्रणांनीच घ्यायला हवी. अन्यथा, ग्रामसभेकडून प्रस्ताव आला नाही असे कारण देत यंत्रणा हातावर हात घेऊन स्वस्थ राहिल्या, तर तेदेखील शोभादायक ठरणार नाही. महाराष्ट्र हे प्रगतिशील, पुरोगामी विचारांचे राज्य आहे, असा निर्वाळा अनेक जण वारंवार देत असतात. मात्र, अनेकदा पुरोगामित्वाच्या या विचारांनीही शरमेने मान खाली घालावी अशा घटनादेखील या राज्यात घडतात. जेव्हा जेव्हा असे काही घडते, तेव्हा तेव्हा या वाक्याचा पुनरुच्चार होतो. आता पुरोगामी विचार केवळ उच्चारापुरते न ठेवता ठोस कृतीत आणण्याची वेळ आली आहे, हे या नव्या निर्णयावरून दिसते. कारण, राज्यात आजही जातिवाचक नावे असलेली गावे, वाड्या, वस्त्या आणि रस्तेदेखील अस्तित्वात असणे ही राज्याच्या सामाजिक चळवळींच्या इतिहासास आणि पुरोगामी विचारांच्या परंपरास लज्जास्पद बाब आहे, याची कबुली देत खुद्द राज्य सरकारनेच या निर्णयात खंत व्यक्त केली आहे. राज्यात जातीय सलोखा निर्माण होऊन सामाजिक सौहार्दाचे नवे पर्व सुरू व्हावे आणि राष्ट्रीय एकात्मता वृद्धिंगत होऊन लोकशाही सुदृढ व्हावी ही सरकारची इच्छा आहे. त्याला बळ देण्यासाठी समाजाने पुढाकार घ्यायला हवा आणि समाजाच्या भावनांचा सरकारने आदर करावयास हवा, अशा दुहेरी परिणामांच्या प्रक्रियेचा प्रारंभ झाला आहे.

आता ज्या गावांत, शहरांत, वाडी-वस्त्यांमध्ये आणि रस्त्यांवर अशी जातिवाचक नावे असतील तेथून ती पुसून काढण्याचे काम ग्रामसभांना करावे लागेल. म्हणजेच, गावाने आपल्या प्रगती व पुरोगामी विचारांच्या परंपरांचा सन्मान करावयाचा आहे. गेल्या अनेक दशकांपासून सुरू असलेल्या समाजसुधारणांच्या संस्कारांनी समंजस झालेल्या समाजास ही फारशी अवघड बाब नाहीच, उलट याआधीही असा निर्णय होऊनही त्याची अंमलबजावणी का झाली नाही याचा अंतर्मुखपणे विचार करावा लागेल. या निर्णयाचा आदेश राज्यातील सर्व विभागीय आयुक्त, सर्व जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचला आहे. तेथून तो गटविकास अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचेल, त्यांच्यामार्फत गावागावांना त्याची माहिती दिली जाईल आणि अशा, जातिवाचक नावे असलेल्या जागांच्या नव्या नामकरणाचे सोहळे सुरू होतील अशी अपेक्षा करावयास हरकत नाही. कारण सामाजिक सुधारणाच्या प्रक्रियेत अग्रेसर राहणे हा महाराष्ट्राच्या परंपरेचा पायंडाच आहे.

जातिभेद हे सामाजिक विषमतेचे मुख्य कारण आहे. म्हणजे, समतेच्या चळवळीतील तो सर्वांत मोठा अडथळा आहे. त्यामुळेच, महाराष्ट्राच्या समतेच्या चळवळीचा प्रारंभच जातिभेद मिटविण्याच्या संस्कारातून सुरू झाला होता. किंबहुना, महाराष्ट्राचा सामाजिक इतिहास हा समतेच्या शोधाचा इतिहास आहे, असेच म्हटले जाते. जातिभेद, अंधश्रद्धा आणि महिलांना उपेक्षित वागणूक देण्याच्या मानसिकतेविरुद्ध उभ्या राहिलेल्या सामाजिक चळवळींनी महाराष्ट्राला आणि देशाला नवी दिशा दिली. या चळवळीच्या केंद्रस्थानी महात्मा फुले हे नाव अधिक उजळपणे उमटले, कारण त्यांच्या समतेच्या विचारांचा वारसा घेऊनच पुढे अनेक सुधारकांनी या चळवळीस नवी दिशा देण्याचा प्रयत्न केला. समाजात शूद्र, अतिशूद्र वर्ग म्हणून गणल्या जाणाऱ्या वर्गाच्या श्रमांवर समाज प्रामुख्याने उभा असतानाही, १९ व्या शतकाच्या अखेरपर्यंत या वर्गास सामाजिक सन्मान नव्हता. त्या वर्गाची सर्व क्षेत्रांत उपेक्षाच होत होती, त्यामुळे समाजास सरसकटपणे होणाऱ्या अनेक लाभांपासून हा समाज वंचितही राहिला होता. याविरुद्ध पहिला आवाज महात्मा फुले यांनी उठविला. या वर्गावरील अन्यायाविरुद्ध उभे राहण्यासाठी शिक्षण, संघटना आणि वैचारिक संघर्षासाठी सज्ज होण्याची मानसिकता समाजात रुजविण्याचे काम अनेक सुधारकांनी केले. त्या अर्थाने महात्मा फुले हे भारताच्या सामाजिक धर्मनिरपेक्षतेच्या विचाराचे आरंभकर्ता ठरले आणि न्यायमूर्ती रानडे, गोपाळराव आगरकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदींनी त्यांचे कार्य पुढे नेले. महात्मा फुले यांनी माणसाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार दिला, ती जाणीव मनामनात रुजविली, असे डॉ. आंबेडकर म्हणत असत. केवळ धार्मिक किंवा नैतिक समता नव्हे, तर आर्थिक, सामाजिक व राजकीय समतेच्या चळवळीही त्यातूनच उभ्या राहिल्या. शिक्षण हे समतेचे सर्वांत सक्षम साधन आहे, ही जाणीव रुजविली गेली आणि शिक्षणप्रसाराची चळवळही त्यातूनच उभी राहिली. जातिवादी संस्कार, अंधश्रद्धा आणि लैंगिक विषमतांवर प्रहार केल्याखेरीज समतेची मानसिकता निर्माण होणार नाही, हा या चळवळींचा वैचारिक पाया राज्यात एव्हाना भक्कम झाला आहे. आता केवळ गावे, वाड्या, वस्त्या आणि रस्त्यांवर नावांच्या रूपाने उरलेले अवशेष नामशेष करावयाचे आहेत. सरकारला त्याची जाणीव झाली, हे चांगलेच झाले!

dineshgune@gmail.com

रविवारची पत्रे

## वाहनांच्या पांढऱ्या एलईडी दिव्यांचा त्रास

आजकाल कोणताही मनुष्य विनावाहन फिरू शकत नाही. मग ती सायकल असो किंवा चारचाकी वाहन असो. परंतु गत काही वर्षांत बहुतेक सर्वच वाहनांना पांढऱ्या रंगाचे एलईडी दिवे लावण्याचे प्रमाण वाढले आहे. हल्ली तर कंपनीतूनच असे दिवे लावले जातात. शहरी भागात रस्त्यांवर उत्तम स्ट्रीटलाईटची व्यवस्था असते. त्यामुळे शहरी रस्त्यांवर वाहने चालवताना वाहनाचे दिवे डिप्परवर ठेवून वाहने चालवायला हवी. परंतु बहुतांश लोक आपल्या वाहनांचे दिवे अप्परवर ठेवून वाहने चालवताना आढळतात. त्यामुळे डोळे दिपल्याने समोरून येणाऱ्या वाहनाच्या चालकाला काही वेळपर्यंत पुढचे काही दिसेनासे होते. पांढऱ्या एलईडी दिव्यांचा प्रकाश अतिशय प्रखर असतो. त्याच्या उजेडात तर काही क्षणांसाठी अक्षरशः अंधपणा आल्यासारखे होते. पुढचा रस्ता अजिबात दिसत नाही. त्यामुळे रात्रीच्या वेळी रस्त्यांवरील अपघातांमध्ये प्रचंड वाढ झाल्याचे दिसून येते. अशा प्रखर प्रकाशाचा त्रास केवळ समोरच्या वाहनचालकालाच होतो असे नाही, तर पायी चालणाऱ्यांनाही याचा त्रास होतो. एक तर शहरातील पदपथ दुकानदारांनी गिळंकृत केले आहेत. त्यामुळे पायी चालणाऱ्याला रस्त्यावरूनच चालणे भाग पडते. दुसरे म्हणजे कित्येक दुचाकी वाहनचालक चुकीच्या दिशेने वाहन चालवतात. त्यात प्रखर उजेडामुळे समोरचे काहीच दिसत नसल्याने पादचाऱ्यांना अपघाताला सामोरे जावे लागते. अशा अपघातांना केवळ मनुष्य प्राणीच जबाबदार आहे. मुळात सरकारने कायदा करून अशा एलईडी दिव्यांच्या उत्पादनावरच बंदी घालणे आवश्यक आहे. तसेच रात्री अनावश्यकपणे अप्पर स्थितीत वाहन चालवणाऱ्यांवर कडक कारवाई ताबडतोब करून अशा प्रकरांना आळा घालणेही आवश्यक आहे. संबंधित विभागांकडून तसेच वाहतूक मंत्रालयाकडून कारवाईची अपेक्षा आहे.

**चारुदत्त शेंडे**/९४२२३१५३१८

●● ●●

## लहान गोष्टींमधूनही देशसेवा घडते

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विजयादशमीच्या कार्यक्रमात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी भाषणात अनेक मुद्दे मांडलेत. त्यात ते म्हणालेत, मला माझा देश जसा हवा असेल तसे मी वागायला हवे. खरेच आहे, आपल्याला आपले घर जसे नीटनेटके, स्वच्छ हवे पण घराबाहेर सार्वजनिक ठिकाणी गेल्यावर मात्र आपण आपला देश ही भावना विसरून जातो. आपण नागरी कर्तव्याचे किती पालन करतो हा प्रश्न प्रत्येकाने स्वत:ला विचारायला हवा. काही समाजसेवी संस्था अथवा नागरिक अपवाद वगळता कुठेही रस्त्यावर रॅपर फेकणे, सार्वजनिक ठिकाणी थुंकणे, रेल्वेत बसल्याजागी कचरा करणे आणि खाली टाकून देणे, खिडकीतून प्लॅस्टिक कचरा आणि बाटल्या फेकणे आणि त्याची कसली खंत न बाळगणे ही कामे सुशिक्षित, अशिक्षित कोणत्याही प्रकारचे लोक भारतात करतात. परत आपल्या सर्व प्रकारच्या असुविधांबद्दल सरकार कसे दोषी आहे ही तक्रार करायला आपण मोकळे.

कुठलाही देश महाशक्ती होण्यासाठी देशाच्या सामान्य नागरिकांचा वाटा फार महत्त्वाचा असतो. प्रत्येकाने स्वत:पुरते जरी ठरवले की समुद्रकिनाऱ्यावर, रस्त्यावर, नदीकिनाऱ्यावर, गडकिल्ल्यांवर गेल्यावर मी स्वच्छता राखेन, भ्रष्टाचारमुक्त देश हवा असल्यास पैसे देणार, घेणार नाही. स्वदेशीचा वापर, वाहतुकीचे नियम, सेनेबद्दलचा अभिमान, देशाच्या न्यायव्यवस्थेवर विश्वास, परदेशात गेल्यावर माझ्या देशाचे नाव उंचावेल या सर्व गोष्टींसाठी मी जागरूक राहीन, या छोट्या छोट्या गोष्टी संपूर्ण देशाची प्रतिमा उंचावतील. आपल्याला प्रत्येकाला प्रत्यक्ष सीमेवर लढता येणे शक्य नाही परंतु सद्वर्तन करेन, कायदा पालन करेन, सरकारच्या चांगल्या योजनांना मोडता न घालता पाठिंबा देईन, मतदान करेन एवढे केल्यास तीही देशसेवाच ठरेल.

**स्नेहल प्रकाश खंडागळे**/नागपूर

## स्वदेशी वस्तूंची खरेदी आत्मनिर्भरतेच्या दिशेने पाऊल

दिवाळी म्हणजे आनंद, प्रकाश आणि नव्या सुरुवातीचा सण. प्रत्येक घरात या काळात नवीन खरेदी, सजावट, भेटवस्तू आणि मिठाईची रेलचेल असते. पण या वर्षीचा सण अधिक अर्थपूर्ण ठरू शकतो जर आपण स्वदेशी खरेदीचा संकल्प केला तर. भारतीय बाजारपेठेत आज परदेशी वस्तूंची भरपूर चलती आहे. मोठ्या ब्रॅण्ड्सच्या चमकदार जाहिराती आपल्याला आकर्षित करतात, पण या चमकोगिरीखाली लहान उद्योजक, कारागीर आणि स्थानिक व्यावसायिकांची मेहनत अनेकदा झाकोळली जाते. या दिवाळीत जर प्रत्येकाने आपल्या गावातील, जिल्ह्यातील किंवा राज्यातील लहान उत्पादकांकडून वस्तू खरेदी केल्या तर केवळ आर्थिक देवाणघेवाण नव्हे, तर रोजगार निर्मितीही घडेल.

स्वदेशी वस्तू खरेदीचे अनेक फायदे आहेत. लघुउद्योगांना बळकटी : स्थानिक उत्पादकांकडून खरेदी केल्याने त्यांचा व्यवसाय टिकून राहतो. आपल्या पैशातून आपल्या देशातील लोकांना काम मिळते. गुणवत्ता आणि संस्कृतीचे जतन, स्थानिक कारागिरांच्या हातून तयार झालेल्या वस्तूंमध्ये भारतीय परंपरेचा स्पर्श असतो. आयातीत वस्तूंऐवजी स्वदेशी खरेदीने देशाची अर्थव्यवस्था मजबूत होते. दिवाळीच्या या पवित्र सणात घर सजवताना, भेटवस्तू देताना आणि नव्या गोष्टी घेताना मेड इन इंडिया लेबल शोधा. हे केवळ उत्पादनाचे नाव नसून, आत्मनिर्भर भारताची ओळख आहे. या दिवाळीत प्रकाशाचा सण स्वदेशी खरेदीच्या दीपांनी उजळवूया. स्वदेशी वस्तू घ्या, स्वदेशी विचार जगा आणि आपल्या देशाच्या प्रगतीत हातभार लावा.

**मुनीश्वर मलेवार**/९४०५५१३३२४

●● ●●

## 'मनाचे श्लोक' नावाचा गैरवापर?

आगामी मराठी चित्रपट 'मनाचे श्लोक' या चित्रपटाचा ट्रेझर प्रदर्शित झाला आणि सर्वत्र संतापाची लाट पसरली. चित्रपटाचे नाव बदलावे अशी मागणी हिंदू जनजागृती समिती, सज्जनगड ट्रस्ट आणि विविध संघटना तसेच श्री समर्थ भक्तांकडून होऊ लागली. ते स्वाभाविकच आहे. कारण महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. त्यांच्या श्लोक, अभंगातून समाजाला दिशादर्शन होत असे. संत स्वत: कष्ट सहन करून जगाच्या कल्याणासाठी झटत असतात. ''जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती देह कष्टविती परोपकारे'' अशी महाराष्ट्राची संतपरंपरा. याच महाराष्ट्रात श्री समर्थ रामदास स्वामी यांनी मनाची चंचलता आणि त्याला स्थिरता आणण्यासाठी मनाच्या श्लोकातून सोप्या भाषेत प्रबोधन केलेले आहे. या पवित्र आणि मार्गदर्शक धार्मिक ग्रंथाच्या नावाचा वापर करून त्याच नावाने मराठी चित्रपटाची निर्मिती करणे, हा हिंदूंच्या श्रद्धेचा बाजार मांडण्यासारखा प्रकार आहे. उच्च नैतिक मूल्ये शिकवणाऱ्या या ग्रंथाचे नाव केवळ मनोरंजन, व्यावसायिक लाभ आणि सवंग प्रसिद्धी यासाठी वापरणे, हा कोट्यवधी श्रीरामभक्त आणि समर्थभक्तांच्या धार्मिक भावनांचा अवमान आहे. संतपरंपरेचा हा अवमान हिंदू समाज कदापि सहन करणार नाही. राज्य आणि केंद्र सरकाने भक्तांच्या भावनांचा विचार करून योग्य कारवाई करावी आणि चित्रपटाच्या निर्मात्यांनी जनभावनेचा आदर राखून शीर्षक बदलावे, अशी जनतेची रास्त अपेक्षा आहे.

**रमा देशमुख**/नागपूर

दखल

हर्षदा मशानकर

# कलेची भारतीय दृष्टी जागवणारा संस्कार भारती कलासाधक संगम

'मनुष्यप्राण्याला' मनुष्यत्व प्रदान करणाऱ्या साहित्य-संगीतादी ललित कलांचे संवर्धन व कलाकारांना प्रोत्साहन देणाऱ्या संस्कार भारतीच्या विदर्भ प्रांताचा कलासाधक संगम वर्धा नगरीत ४ व ५ ऑक्टोबर २०२५ रोजी आयोजित करण्यात आला होता. अनेकान्त स्वाध्याय मंदिरातील या कलासंगमात संगीतकार कौशल इनामदार, सुप्रसिद्ध चित्रकार पद्मश्री वासुदेव कामत यांच्यासह दिग्गज कलासाधकांच्या सादरीकरणाने रसिकांना सचैल स्नान घडले. कार्यक्रमाचे पूर्व व पूर्ण नियोजन, व्यवस्थापन, सत्ररचना, कामांची विभागणी, त्यासाठीच्या बैठकी सगळेच अनुकरणीय आणि वाखाणण्याजोगे होते.

कलासाधक संगमामध्ये पोर्ट्रेटसह विभिन्न प्रकारच्या रांगोळ्या, चित्रे, भारतीय वाद्ये, छायाचित्रे, पुरातन नाणी, टेराकोटा आणि सजावटीच्या वस्तूंच्या प्रदर्शनाचे आयोजन होते. विदर्भातील रांगोळी कलाकारांनी रात्री जागून रांगोळ्या पूर्ण केल्या. वर्धा जिल्ह्यातील गांधीजी, विनोबा, डॉ. धर्मपाल, दत्तोपंत, जमनालालजी इ. महनीय व्यक्तींची चित्रेही रांगोळीद्वारे रेखांकित करण्यात आली होती. कालियामर्दन, शिवराज्याभिषेक, श्रीरामकथाचित्रे, पिंपळाच्या पानाच्या जाळीवरील चित्रे, एकापेक्षा एक सरस! शिवाय कॅन्डिड छायाचित्रे आकर्षून घेत होती. तबला, बोंगो, कोंगो, मॅडोलिन, व्हायोलिन, गिटार, स्वरमंडल, सॅक्सोफोन इ. वाद्यांसह २५०० वर्षांपासूनचे शिक्के, नाणी लक्षवेधी ठरले. टेराकोटाच्या वस्तू, दागिने, घरसजावटीच्या वस्तू यांचाही समावेश होता.

दरम्यान, कलासाधक संगमचे औपचारिक उद्घाटन ४ ऑक्टोबर रोजी सुप्रसिद्ध संगीतकार कौशल इनामदार यांच्या हस्ते झाले. संस्कार भारतीचे अखिल भारतीय संघटनमंत्री अभिजित गोखले, अ. भा. मंत्रिद्वय रवींद्र बेडेकर व आशुतोष अडोणी, पश्चिम क्षेत्रप्रमुख चंद्रकांत घरोटे, प्रांताध्यक्ष कांचन गडकरी, प्रांत महामंत्री विवेक कवठेकर, स्वागताध्यक्ष हरिभाऊ वझूरकर, वर्धा जिल्हाध्यक्ष सतीश बावसे व ज्येष्ठ मार्गदर्शक डॉ. राम मोहन बेंदूर यावेळी प्रामुख्याने उपस्थित होते. दीप प्रज्वलन व नटराज पूजनाने हा देखणा सोहळा प्रारंभ झाला. स्वाती भालेराव यांच्या मार्गदर्शनात व सचिन डंभारे आणि सोनाली मंथनवार यांच्या नृत्य दिग्दर्शनात ध्येय गीतातील विविध कडवी कथक, भरतनाट्यम्, ओडिसी आणि मोहिनीअट्टम या प्रकारात बांधून नृत्यसंगम साधला.

वर्धा जिल्हाध्यक्ष सतीश बावसे यांच्या स्वागतपर संबोधनानंतर डॉ. राममोहन बैंदूर यांचा सन्मान करण्यात आला. प्रांताध्यक्ष कांचन गडकरी यांनी यावेळी आपल्या मनोगतात, कलेच्या माध्यमातून भारताला नवजीवन प्राप्त करून देण्यासाठी संस्कार भारती कार्यरत असल्याचे सांगितले.




संस्कार भारतीचे अखिल भारतीय संघटन मंत्री अभिजित गोखले यांनी आपल्या उद्‌बोधनात, भारतीय मातीतून आलेला व श्रेष्ठ तत्त्वचिंतकांनी मांडलेला 'स्व'चा विचार कलेच्या माध्यमातून सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य संस्कार भारती करीत असल्याचे सांगितले. या सोहळ्याचे संचालन स्मिता खनगई यांनी केले. 'बालगंधर्व' फेम संगीतकार कौशल इनामदार यांची आसावरी देशपांडे आणि पल्लवी पुरोहित यांनी घेतलेली प्रकट मुलाखत हा एक आनंदानुभव होता. लेखनासाठी कौशलजींनी १०० नाटके अभ्यासली, यातून हेच सिद्ध होते. ग्रेसांच्या कवितेचा अनुभव सांगताना ते म्हणाले, चाल लावण्याच्या प्रक्रियेतच कविता समजत जाते. सुरेश भटांचं 'लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी' हे मराठी अभिमान गीत साकारतानाची धडपड त्यांनी रंजकपणे मांडली. यामध्ये ११२ प्रस्थापित गायक, ३५६ कोरस कलाकार आणि वादक, तंत्रज्ञ अशा एकूण ५४३ कलाकारांच्या सहभाग त्यांनी घडवून आणला.

शेवटच्या सत्रात आशुतोष अडोणी लिखित व दीपाली घोंगे दिग्दर्शित 'भारते नवजीवनम्' ही लघुनाटिका प्रस्तुत केली. त्यात जीवनातील कलेचं महत्त्व अतिशय प्रभावीपणे मांडले. दुसऱ्या दिवसाचा प्रारंभ अतिशय सुरेल झाला. प्रांत कार्याध्यक्ष सुधाकर अंबुसकर यांच्या संयोजनात अहिरभैरवची बंदिश सतारीवर योगेश बोडे अमरावती, संवादिनीवर अमोल झाडे वर्धा, व्हायोलिनवर अथर्व भालेराव नागपूर तर तबल्यावर श्याम सरोदे वर्धा आणि गायिका डॉ. प्राजक्ता हसबनीस खामगाव यांनी सुरेख रंगवली.

प्रभात रागानंतर जागतिक दर्जाचे चित्रकार तथा संस्कार भारतीचे माजी राष्ट्रीय अध्यक्ष पद्मश्री वासुदेव कामत यांची 'मर्यादा पुरुषोत्तम राम' ही संकल्पना चित्रमालिका व त्यावरील निरूपण हा अप्रतिम कार्यक्रम झाला. यावेळी रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह भय्याजी जोशी उपस्थित होते. त्यांच्या हस्ते कामतांचा सत्कार करण्यात आला. 'स्वरनिनाद' या सत्रामध्ये विदर्भातील विविध कलासाधकांनी आपापले सादरीकरण केले. संचालन सहमहमंत्री गजानन रानडे यांनी केले. समारोपप्रसंगी मंगेश परसोडकर यांनी व्यवस्थेतील सर्वांचा परिचय करून दिला. उदय लाडसावंगीकर यांनी वैयक्तिक गीत म्हटले. अखिल भारतीय मंत्री आशुतोष अडोणी यांनी मार्गदर्शन केले. पसायदानाने सोहळ्याची सांगता झाली.

८२३७८२१४४९

## आठवी पूजनाचे महत्त्व



आश्विन महिन्यात साजरी केली जाणारी कालाष्टमी ही कराष्टमी म्हणूनही ओळखली जाते. विदर्भात आश्विन महिन्यात, दिवाळीच्या आठ दिवसाआधी विशेष कालाष्टमी साजरी केली जाते. या दिवशी केल्या जाणाऱ्या पूजेला विदर्भातील बोली भाषेत आठवी मातेची पूजा असेही म्हणतात. २०२५ म्हणजे यावर्षी १३ ऑक्टोबर या दिवशी विदर्भात आठवी आहे.

कालाष्टमीला घरोघरी आठवी पूजन केले जाते. यात सुगड्यांची पूजा होत असून प्रसाद म्हणून आंबिल तयार करतात. यादिवशी घरातील सर्व महिलांसह पुरुष देखील उपवास करतात. बाजारामधून ज्वारीचे धांडे आणून पूजेदरम्यान तिची झोपडी तयार केली जाते. पाटावर नवीन कापड टाकून, त्यावर आठ किंवा नऊ मातीचे सुगडे ठेवण्यात येतात. त्या सुगड्यांमध्ये लाह्या, शिंगाडे, सीताफळ इत्यादी पदार्थ टाकून त्यावर मातीचे झाकण ठेवले जाते. त्यानंतर देवीचे चित्र असलेला एक कागद ठेवून, त्यावर हळद-कुंकू व फुले वाहून पूजा केली जाते. यासह त्या सुगड्यांची देखील पूजा केली जाते. धूप-दीप लावून आरती केली जाते. या दिवशी ज्वारीच्या कण्यांपासून आंबिल तयार केली जाते आणि त्याचा नैवेद्य दाखविला जातो. तसेच चंद्र व सूर्य आकाराची साखर घालून पोळी केली जाते आणि त्याचा नैवेद्य दाखविला जातो. आठवी मातेचा उपवास केल्याने अनेक शारीरिक व्याधी नष्ट होतात, अशी मान्यता आहे. त्यामुळेच कुटुंबातील सगळेच सदस्य उपवास करतात आणि मिळून पूजा करतात. काही भाविक रात्रीच चंद्राची पूजा करून व नैवेद्य दाखवून उपवास सोडतात, तर काही भाविक दुसऱ्या दिवशी सूर्याला नैवेद्य दाखवून पूजा करतात आणि उपवास सोडतात. आठवी पूजेची प्रथा ही घरातील कुळाचारावर अवलंबून असते. या पूजेमुळे शारीरिक व्याधी दूर होतात आणि कुटुंब निरोगी राहते, अशी श्रद्धा आहे. ही पूजा दुर्गा देवीच्या महागौरी या आठव्या स्वरूपाशी संबंधित आहे, असेही मानले जाते.

**वर्षा आवदे**/नागपूर

●● ●●

आजचे संघगीत-१०

रविवार, १२ ऑक्टोबर २०२५

## भक्तिपुर्ण हे अवघे जीवन

भक्तिपुर्ण हे अवघे जीवन
मातृभुमिच्या पदमकमलाशी
तेवत तेवत मधुभावाने
एकरुप हो परमात्म्याशी ॥धृ॥

राष्ट्रसमर्पित जीवन जगणे
सद् धर्माचे तेज फुलविणे
या ध्येयास्तव अविरत श्रमणे
जीवनपूजा ही अविनाशी ॥१॥

जागृत होता समष्टि शंकर
दानवतेला मिळे न अवसर
मंगलतेने गाता सुस्वर
मीलन होइल चित्त तत्त्वाशी ॥२॥

साधना ही जीवनाची
देवत्वाला जगविण्याची
क्षणिकांतुनि त्या चिंतनाची
वाट पुसावी भगवंताशी ॥३॥

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### महापालिकेच्या वतीने बेघर निवारा केंद्रात विविध उपक्रम

**सोलापूर, दि. ११ ऑक्टोबर-**
महापालिका दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी अजीविका अभियान अंतर्गत जिल्हा क्रीडा संकुल मागे कुमठा नाका येथील आपुलकी बेघर निवारा केंद्रात जागतिक बेघर दिवस कार्यक्रम साजरा करण्यात आला. जागतिक बेघर दिनानिमित्त दि. १ ते १० ऑक्टोबर या कालावधीत दहा दिवसीय बेघर दिन सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. या सप्ताहामध्ये निवारावासीयांसाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. रांगोळी, संगीत खुर्ची, गायन, सांस्कृतिक कार्यक्रम पार पडले. या कार्यक्रमाचे आयोजन व्यवस्थापक अशोक वाघमारे यांनी केले होते. या प्रसंगी समुदाय संघटक वसीम शेख, बेघर निवारा केंद्रातील बेघर सदस्य धर्मा कांबळे, राघवेंद्र बोरगावकर, श्रेयस वाडणार, सुनिता मस्के, नीलम पटेल, साविता वाडेकर, संजय क्षीरसागर, सत्यनारायण मूर्ती, दिलसात शेख, फातिमा जमादार, राजू गदग, शक्ती जाधव, बाळू रगडे आदींची उपस्थिती होती.



### महानायक अमिताभ बच्चन यांच्या वाढदिवसानिमित्त लाडू वाटप

**सोलापूर, दि. ११ ऑक्टोबर-**
महानायक पद्मविभूषण अमिताभ बच्चन यांच्या ८३ व्या वाढदिवसानिमित्त आज जागृती शनि धाम कर्णिक नगर रोड सोलापूर येथे पद्मविभूषण महानायक डॉ अमिताभ बच्चन सेवाभावी संस्थेच्या वतीने अंबादास बत्तीन, मुकेश महिंद्रकर यांच्या हस्ते भक्तांना लाडू वाटप करण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष विजय इप्पाकायल, वसंत संदा, संजय भुतडा, श्रीनिवास कुडक्याल, अनिल बुरांडे प्रमुख उपस्थित होते. यावेळी सुपरस्टार अमिताभ बच्चनचा विजय असो, जय महानायक, तुम जियो हजारो साल अशा घोषणा देण्यात आल्या.



### गरबा स्पर्धेत तेजस्विनी फिटनेस सेंटर प्रथम

**सोलापूर, दि. ११ ऑक्टोबर-**
जुळे सोलापूरमधील संतोषनगर, शांतिनगर व शिवगंगानगर येथील ज्योती चव्हाण गोल्डन ग्रुप व तेजस्विनी फिटनेस सेंटरच्यावतीने आयोजित गरबा कार्यक्रमात तेजस्विनी फिटनेस सेंटरने प्रथम क्रमांकाचे एक ग्रॅम सोन्याचे गंठण पटकावले. जामगोंडी मंगल कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमात तब्बल एक हजार महिलांचा सहभाग होता. ए. जी. पाटील इन्स्टीट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे चेअरमन सिद्धेश्वर पाटील, माजी आमदार शिवशरण पाटील, उद्योजक रमेश पाटील, मंडळाच्या आधारस्तंभ मंगल शटकार पाटील, सुनंदा प्रचंडे, मेघा पाटील, सचिता पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत दीप प्रज्वलित करण्यात आले. यावेळी राजशेखर पाटील, अशोक भांजे, गंगाधर पाटील आदी उपस्थित होते. अन्य बक्षिसात पैठणी व चांदीच्या वस्तू देण्यात आल्या. कल्याणी इमिटेशन ज्वेलरीने बक्षिसांचे प्रायोजक होते. या स्पर्धेत महानंदा ईश्वर स्वामी, कुसुम गायकवाड, चंद्रकला मंगोळवेडकर, मनीषा नलावडे, सपना जाधव, रुक्मिणी नाईक, पद्मा जिरगे, विद्या महागावकर आदींनी सहभाग घेतला.



### निवृत्त विभाग प्रमुख प्रा. विद्यासागर आगसे यांचा पंच्याहत्तरीनिमित्त सत्कार

**सोलापूर, दि. ११ ऑक्टोबर-**
अक्कलकोट महाविद्यालयाचे वाणिज्य शाखेचे निवृत्त विभाग प्रमुख प्रा. विद्यासागर आगसे यांचा पंच्याहत्तरीनिमित्त निवृत्त प्राचार्य एम. ए. शेख यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. अक्कलकोट महाविद्यालयातील वाणिज्य विभागाचे माजी विद्यार्थी व आगसे परिवारातर्फे गोविंदश्री मंगल कार्यालयात प्रा. आगसे व पत्नी वीरश्री आगसे यांच्या सत्काराचे आयोजन करण्यात आले होते. प्रारंभी आर्य समाज पद्धतीने यज्ञ करण्यात आला. विनय आगसे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी प्राचार्य शेख, निवृत्त प्राचार्य एस. सी आडविटोट, ज्येष्ठ पत्रकार अभय दिवाणजी, निवृत्त सहायक पोलिस आयुक्त बी. बी. राठोड, सी. के. शेका, डॉ. चंद्रकांत जवळी यांची भाषणे झाली. स्नेहा उदनूर यांनी आभार मानले. प्रा. प्रकाश सुरवसे यांनी सूत्रसंचालन केले.

### राजूर येथे आज आनंदराव देवकते यांच्या पुण्यतिथी कार्यक्रमाचे आयोजन

**बंगकलगी, दि. ११ ऑक्टोबर-**
राजूर (ता. द सोलापूर) येथील आनंदाराव देवकते पुण्यतिथी सोहळा रविवार १२ ऑक्टोबर सकाळी ९ वाजता होणार असल्याचे जि.प.चे माजी सभापती अशोक देवकते यांनी कळविले आहे. यावेळी खासदार प्रणिती शिंदे, सुशीलकुमार शिंदे, दिलीप माने, सुभाष देशमुख, चेतन नरोटे, बाळासाहेब शेळके, धर्मराज काडादी, राजशेखर शिवदारे सुरेश हसापुरे, इंदुमती पाटील, भिमाशंकर जमादार, हरिष पाटील, नरेंद्र काळे, श्रीशैल रणखांबे, गायकवाड, राठोड, पवार किरण, सुर्वे पुजारी पाटील आदी उपस्थित राहणार आहेत.

# दैनंदिन जीवनात मराठीचा आग्रह धरा

## उपजिल्हाधिकारी अंजली मरोड; अभिजात मराठी भाषा सप्ताहाचा समारोप

**सोलापूर दि. ११ ऑक्टोबर-**
मराठीच्या उज्वल भविष्यासाठी केवळ भावनिक स्तरावर न थांबता दैनंदिन जीवनात मराठीचा आग्रह धरण्याचा महत्त्वपूर्ण उपदेश केला. आपली ओळख, आपला वारसा जिवंत ठेवण्यासाठी प्रत्येकाने मराठी भाषेचा वापर अभिमानाने केला पाहिजे. केवळ सप्ताहात नव्हे, तर रोजच्या व्यवहारात मराठीला स्थान द्या, असे आवाहन असे उपजिल्हाधिकारी व जिल्हा मराठी भाषा सचिव अंजली मरोड यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर, डी.बी.एफ. दयानंद कला व शास्त्र महाविद्यालय, सोलापूर, आणि महाराष्ट्र साहित्य परिषद सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अभिजात मराठी भाषा सप्ताह चा समारोप समारंभ दयानंद महाविद्यालयाच्या महर्षी स्वामी दयानंद सरस्वती सभागृहात उत्साहात पार पडला. त्यावेळी उपजिल्हाधिकारी अंजली मरोड बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दयानंद शिक्षण संस्था, सोलापूरचे प्रशासक प्रो. डॉ. विजयकुमार उबाळे होते.



कार्यक्रमाला मसापच्या अध्यक्षा प्रा. डॉ. श्रुती वडकबाळकर, जिल्हाधिकारी कार्यालय मराठी भाषा समितीचे सदस्य पद्माकर कुलकर्णी, प्राचार्य डॉ. एस. बी. क्षीरसागर, प्राचार्य डॉ. बी. एच. दामजी, प्राचार्य डॉ. एस. व्ही. शिंदे, प्राचार्य डॉ. अंजली गायकवाड, मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. देविदास गायकवाड, प्रा. डॉ. राजशेखर शिंदे, प्राचार्य डॉ मीना गायकवाड यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी कार्यक्रमाची सुरुवात महाविद्यालयापासून निघालेल्या ग्रंथदिंडीने झाली. या ग्रंथदिंडीचे पूजन व उद्घाटन उपजिल्हाधिकारी मरोड यांच्या हस्ते करण्यात आले. प्रास्ताविक दयानंद महाविद्यालयातले मराठी विभाग प्रमुख देविदास गायकवाड यांनी केले. सूत्रसंचालन प्रा आनंद मसलखांब यांनी केले तर आभार मसाप जुळे सोलापूर शाखेचे अध्यक्ष पद्माकर कुलकर्णी यांनी मानले. प्रा. सागर सुरवसे, प्रा. दिपाली कसबे- गुंडेली उपस्थित होते.

### भारतीय संविधानाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त आज सांस्कृतिक कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ ऑक्टोबर-**
भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त हुतात्मा स्मृती मंदिरात १२ आणि १३ ऑक्टोबर रोजी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्र शासन सांस्कृतिक कार्य विभाग सांस्कृतिक संचालनालय आयोजित हे दोन दिवसीय कार्यक्रम रविवारपासून सुरू होत आहेत. रविवार १२ ऑक्टोबर रोजी सायंकाळी साडेसहा ते रात्री दहा या वेळेत भारतीय संविधानावर आधारीत 'राष्ट्रग्रंथ -आधारस्तंभ लोकशाहीचा या दोन अंकी मराठी नाटकाचे सादरीकरण होणार आहे.

प्रसाद थोरवे आणि अभिराम भडकमकर हे या नाटकाचे लेखक असून कुमार सोहोनी दिग्दर्शक तर दर्शन हिना व जगदीश महाजन निर्माता आहेत. मुंबईची आर्टिस्टिक ह्युमन्स निर्मिती संस्था आहे. २० यशस्वी कलाकार हे नाटक सादर करणार आहेत.

सोमवार १३ ऑक्टोबर रोजी सायंकाळी गौरव गाथा संविधानाची हे नाटक सादर होईल. अभिजीत कोसंबी, प्रसन्नजीत कोसंबी, शाहीर सुभाष गोरे, निखिल भालेराव, सायली साठे, संदेश कांबळे, वैशाली आगलावे आणि सुहास सदाफुले हे कलाकार हे नाटक सादर करणार आहेत.

सांस्कृतिक कार्यक्रमास सोलापूरकरांनी उपस्थित रहावे, असे आवाहन, राज्याच्या सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी तसेच सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक बिभीषण चवरे यांनी केले आहे. हुतात्मा स्मृती मंदिरात होणाऱ्या या सांस्कृतिक कार्यक्रमास राज्याचे सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार, पालकमंत्री जयकुमार गोरे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर, खा. धैर्यशील मोहिते-पाटील, खा. प्रणिती शिंदे, आ. रणजितसिंह मोहिते-पाटील, अरुण लाड, जयंत आसगांवकर, सुभाष देशमुख, दिलीप सोपल, विजय देशमुख, नारायण पाटील, समाधान आवताडे, सचिन कल्याणशेट्टी, उत्तमराव जानकर, राजू खरे, अभिजीत पाटील, बाबासाहेब देशमुख आणि देवेंद्र कोठे यांची उपस्थिती राहणार आहे.

# पूरग्रस्त भागांमध्ये पेस्ट कंट्रोल अभियान

## पेस्ट कंट्रोल व्यवसायिक समूहाचा पुढाकार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ ऑक्टोबर-**
शहर जिल्ह्यात मोठ्या पूर परिस्थितीमुळे आरोग्यविषयक प्रश्न निर्माण झाले होते. त्या अनुषंगाने शहर व जिल्हा येथील पेस्ट कंट्रोल व्यवसायिक समूहाच्या पुढाकाराने हत्तुर, चंद्राळ, सिंदखेड, वडकबाळ, वांगी आणि मनगोळी या गावी पेस्ट कंट्रोल अभियान राबविण्याचा निर्णय घेतला गेला. या अभियानाचा उद्देश गावांमध्ये आरोग्यविषयक ताण कमी करणे आणि स्थानिक आरोग्य व्यवस्था सुरळीत चालू राहावी यासाठी होता.

जिल्ह्यात भीषण पूरस्थितीमुळे विशेषतः दक्षिण सोलापूर प्रांतातील अनेक गावे मोठ्या प्रमाणावर प्रभावित झाली आहेत. या गावी पूरग्रस्त परिस्थितीमुळे आरोग्यविषयक समस्या निर्माण होण्याची भीती होती. त्यामुळे प्रभावित गावी आरोग्यविभागाच्या कार्यक्षमतेत सुधारणा करणे आणि कीटकजन्य आजारांचा प्रसार रोखणे हा आव्हानात्मक उद्देश बनला होता.



अभियानासाठी मोठ्या प्रमाणावर कीटकनाशक रसायने आवश्यक होती. या दृष्टीने एछतण या नामांकित कंपनीने सर्व प्रकारची रसायने पुरवली. या कंपनीचे पश्चिम भारताचे प्रमुख, उमेश घरत यांनी केवळ रसायने पुरवली नाहीत, तर मार्गदर्शन व सहयोगही दिला, ज्यामुळे कार्य अधिक प्रभावी पद्धतीने पूर्ण होऊ शकले.

या सेवेत कीटकनाशक फवारणी, कीटकनाशक पावडर धुरळणी तसेच पाण्याच्या साठ्यामध्ये डासांची उत्पत्ती होऊ नये यासाठी लार्वी साइट्स पसरविण्यात आले.

# विद्यार्थ्यांची पॅट परीक्षा सुरू

## अनेक शाळांमध्ये प्रश्नपत्रिकांचा तुटवडा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ ऑक्टोबर-**
इयत्ता दुसरी ते आठवीतील विद्यार्थ्यांसाठी संकलित मूल्यमापन चाचणी परीक्षा (पॅट-१) परीक्षा शुक्रवार, दि. १० ऑक्टोबरपासून सुरू झाली आहे. १३ ऑक्टोबर पर्यंत राज्यभरात ही परीक्षा घेतली जाणार आहे. सोलापूर शहरासोबतच जिल्ह्याच्या विविध भागांत ही परीक्षा होणार आहे. केंद्रशाळेतील केंद्रीय मुख्याध्यापकांकडे परीक्षेची जबाबदारी देण्यात आली आहे. अनेक शाळांमध्ये प्रश्नपत्रिका कमी असल्याने झेरॉक्स काढून मुलांना देण्यात आले आहेत.

दरम्यान, प्रत्येक विद्यार्थ्याने इयत्तानिहाय अपेक्षित अध्ययन संपादणूक प्राप्त केली आहे किंवा नाही, याची पडताळणी होऊन अध्ययन अध्यापन प्रक्रिया सुलभ होण्यास या चाचणीमुळे शिक्षकांना मदत होणार आहे. या चाचण्या १० वी व १२ वी प्रमाणे कठीण नसल्याने विद्यार्थ्यांना याचा अतिरिक्त ताण देऊ नये. चाचण्यांचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांनी अध्ययन निष्पत्ती किती प्रमाणात प्राप्त केले आहेत हे शिक्षकांनी लक्षात घेऊन गरजेनुरूप अध्ययन अध्यापन प्रक्रियेत मूलभूत सुधारणा करणे व कृती कार्यक्रमाची अंमलबजावणी करणे असल्याचे शिक्षण विभागाकडून आले आहे. चाचणीतंर्गत प्रथम भाषा, गणित आणि तृतीय भाषा (इंग्रजी) या विषयांच्या इयत्ता दुसरी ते आठवीतील शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सर्व शाळा, खासगी अनुदानित शाळांमधील विद्यार्थ्यांची ही परीक्षा होणार आहे. दरम्यान, पॅट परीक्षा दहा माध्यमात होणार असल्याचे शिक्षण विभागाने सांगितले.

### शाळांमध्ये प्रश्नपत्रिकांची तुटवडा

शुक्रवार दि. १० ऑक्टोबरपासून शहर जिल्ह्यात पॅट परीक्षा सुरू आहेत. या परीक्षा शिक्षण विभागाकडून घेण्यात येत असल्याने अनेक शाळांमध्ये प्रश्नपत्रिका तुटवडा असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे अनेक शाळा प्रश्नपत्रिकांच्या झेरॉक्स काढून मुलांना प्रश्नपत्रिका पुरविण्यात येत आहे. त्यामुळे शिक्षक व पालकांमधून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

१० ते १३ ऑक्टोबर या कालावधीत मराठी व उर्दू माध्यमांच्या विद्यार्थ्यांची पॅट परीक्षा होणार आहे. त्यादृष्टीने शिक्षण मंडळाचे नियोजन केले आहे. प्रश्नपत्रिका वेळेवर देण्यासोबतच परीक्षाकाळात कोणतेही अडचण, समस्या येणार यासाठी प्रयत्न करीत आहे . पॅटच्या परीक्षा सुरळीत व पारदर्शक पद्धतीने होतील.
**- विठ्ठल ढेपे, प्रशासनाधिकारी**

# एकनाथ स्वाभिमानी शिक्षक सेना शिक्षक, पदवीधर निवडणूक लढविणार

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ११ ऑक्टोबर-**
शिक्षक सेनेच्या माध्यमातून राज्यांमधील सर्व शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघांमधील निवडणूक लढविणार असल्याचे एकनाथ स्वाभिमानी शिक्षक सेनेचे प्रदेशाध्यक्ष, प्रा. डॉ. बापूसाहेब आडसुळ यांनी जाहीर केले आहे.



राज्याचे संविधनशील उपमुख्यमंत्री शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे, संसदरत्न खासदार डॉ.श्रीकांत शिंदे, शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे,उपमुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्य मदत कक्षाचे राज्याचे प्रमुख आरोग्यदूत मंगेश चिवटे यांच्या मार्गदर्शनाखाली चालत असणारी शिक्षक सेना म्हणजे एकनाथ स्वाभिमानी शिक्षक सेना महाराष्ट्र राज्य आहे.

अनाथांचा नाथ एकनाथ यांनी नेहमी स्वाभिमाना बाणा उचलून कार्यकर्त्यांना स्वाभिमानी राहण्याचे कानमंत्र दिले आहेत, म्हणूनच एकनाथ स्वाभिमानी शिक्षक सेनेचा जन्म झाला या माध्यमातून राज्यांमध्ये शिक्षसेनेची मोठी ताकद आहे. वेळोवेळी एकनाथ शिंदे शिक्षक आणि पदवीधरांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले त्यामध्ये टप्पा वाढ योजना असो शिक्षकांना कॅशलेस योजना असो जुनी पेन्शन योजना असो अशा सर्व बाबींना एकनाथ शिंदे यांचे नेहमी एक पाऊल पुढे असते त्यामुळे सर्वांच्या आग्रहास्तव राज्यामधील सर्व शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघ लढविणार असल्याचे एकनाथ स्वाभिमानी शिक्षक सेनेचे प्रदेशाध्यक्ष, सदस्य पुणे बोर्ड सदस्य मंत्रालय समन्वय समिती मुंबई प्रा डॉ बापूसाहेब आडसूळ यांनी नुकतंच एका पत्रकार परिषदेत जाहीर केले आहे, त्यामुळे राज्यामधील सर्व पदवीधर आणि शिक्षकांमध्ये सर्वत्र आनंदाचे वातावरण होत आहे.

### अयोध्येचा राम मंदिर न्यासाच्या वित्त समिती सदस्यपदी सी ए राजगोपाल मिणियार

**सोलापूर, दि. ११ ऑक्टोबर-**
येथील नामवंत चार्टर्ड अकाउंटंट राजगोपाल मिणियार यांची श्री राम जन्मभूमी तीर्थक्षेत्र वयोध्या या ट्रस्टच्या बैठकीत वित्त समिती सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली. मणियार हे मागील जवळपास साडेचार वर्षांपासून न्यासाचे वित्तीय सल्लागार म्हणून सेवा देत आहेत. आता त्यांना या वित्त समितीचे सदस्य म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. स्वामी गोविंददेव गिरीजी यांच्या आशिर्वादामुळेच ही निवड झाल्याचे त्यांनी सांगितले.



# बाळे परिसरातील अतिवृष्टीबाधित कुटुंबाच्या खात्यावर अनुदान रक्कम जमा

## प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे, गणेश पुजारी यांच्या पाठपुराव्याला आले यश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ ऑक्टोबर-**
बाळे परिसरातील अतिवृष्टी व पूर परिस्थिती बाधित कुटुंबाच्या खात्यावर शासनाकडून दहा हजार रुपये अनुदान रक्कम जमा जमा झाली आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे, माजी नगरसेवक गणेश पुजारी यांच्या पाठपुराव्याला यश आले आहे. संबंधित कुटुंबीयांनी चंदनशिवे आणि पुजारी यांचे आभार मानले आहे.

सोलापूर शहर - जिल्ह्यामध्ये मागील काही महिन्यापासून मोठ्या प्रमाणात पाऊस व अतिवृष्टी झाल्यामुळे बऱ्याच भागामध्ये पर्जन्य परिस्थिती निर्माण झाली. त्यांतर परिसरातील ज्या नागरिकांचे घरे पाण्यामध्ये गेले, ज्यांचे नुकसान झाले आहे त्यांना शासनाकडून मदत मिळाल्यास अतिवृष्टी बाधित कुटुंबीयांना एक मोठा आधार होईल. या परिसरातील नागरिकांना शासनाकडून योग्य ती मदत करण्याची मागणी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे व माजी नगरसेवक गणेश पुजारी यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे केली होती.

बाळे परिसरातील राहुल नगर, पाटील नगर महेश्वरी नगर व संतोष नगर या परिसरातील नुकसानग्रस्त भागांचे ग्राम म हसूल अधिकारी , महसूल सेवक त्याचबरोबर सोलापूर महानगरपालिका विभागीय अधिकारी तसेच स्थानिक नगरसेवक यांच्या उपस्थितीत पंचनामे करून महापालिका प्रशासन तसेच जिल्हा प्रशासन यांच्याकडून राज्य शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला.

राज्य शासनाने मागील आठवड्यामध्ये दिवाळीपर्यंत सर्व नुकसान बाधित कुटुंब व शेतकरी यांना रक्कम त्यांच्या खात्यावर जमा करण्यात येईल असे आश्वासित केले होते. आज प्रत्यक्षात नुकसानग्रस्त कुटुंबाच्या खात्यावर पैसे जमा झाल्याने नुकसान ग्रस्त कुटुंबियाने माजी नगरसेवक आनंद चंदनशिवे, माजी नगरसेवक गणेश पुजारी यांनी महापालिका प्रशासन, जिल्हा प्रशासन तसेच राज्य शासनाचे आभार व्यक्त केले आहे. नुकसानग्रस्त भागातील कुटुंबांना मदत मिळण्याकरिता राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे नगरसेवक गणेश पुजारी, मंडल अधिकारी संतोष कांबळे, ग्राम महसूल अधिकारी सिद्धाराम कराळे, कृषी अधिकारी तृप्ती गुंड, महसूल सेवक राहुल तोडकरी,सोलापूर महानगरपालिकेचे विभागीय अधिकारी प्रकाश सावंत, अभियंता राघवेंद्र गायधनकर, सहाय्यक अभियंता गौरव सस्ते, विकास सर्वगोड, अग्निशामक दलाचे कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

# पशूविभागाकडून अंडीदिन साजरा

## एक हजार अंडी वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ ऑक्टोबर-**
पशुसंवर्धन विभागाच्या सघन कुकुट विकास गट च्यावतीने 'जागतिक अंडी दिन' म्हणून अंगणवाडी व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, नेहरू नगर तसेच वापूजी प्राथमिक शाळा, लष्कर व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, राज्य राखीव पोलीस दल, गट क्र.१० आणि सघन कुकुट विकास गट, नेहरू नगर येथील प्रशिक्षणार्थ्यांना उकडलेली अंडी वाटप करून साजरा करण्यात आला. पोल्ट्री सल्लागार डॉ. भोसले शिवाजी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

यावेळी सघन कुकुट विकास गटाचे प्रमुख पशुधन विकास अधिकारी डॉ. स्नेहा बोधनकर यांनी दैनंदिन जीवनातील आहाराम ध्ये अंड्याचा वापर जास्तीत जास्त प्रमाणात उपयोग करून शालेय विद्यार्थ्यांनी व नागरीकांनी आपले आरोग्य रक्षण करणे आवश्यक असल्याचे सांगितले.

यावेळी एक हजार उकडलेली अंडी वाटप करून जागतिक अंडी दिन साजरा करण्यात आला. यावेळी मुख्याध्यापक थोरवोले, मुख्याध्यापिका ज्ञानेश्री संगीतकर, पुंडलिक कलखांबकर उपस्थित होते. सघन कुकुट विकास गटचे सहाय्यक पशुधन विकास अधिकारी एस. पी. माने, परिचर दिनानाथ जमादार, संताजी देशमुख व प्रशांत निकंबे यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.



**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**ई-निविदा सूचना क्रमांक: 06-2025-जीएसयू-इलेक्ट-जी**
सीनियर. गति शक्ती, मध्य रेल्वे, सोलापूर भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने खालील कामासाठी नामांकित कंपन्या/ठेकेदारांकडून ई-निविदा मागवत आहे. **01. कामाचे नाव** इलेक्ट्रिकल जनरल कलबुर्गी स्टेशनवर नवीन पिट लाईनची तदृत सेवांचे कामाचा सेवा भाग. (पुनर्निमंत्रण), **02. अंदाजे कामाची किंमत:** रु. 1,76,96,884.34. **03. सर्वात कमी खर्च:** रु. 2,38,500.00. **04. काम पूर्ण करण्याचा कालावधी:** 12 (बारा) महिने. **05. देखभाल कालावधी** : स्थापना सुरू झाल्यापासून/ताब्यात घेतल्यापासून 12 (बारा) महिने. **06.** www.ireps.gov.in **वेबसाइटवर निविदा सादर करण्याची अंतिम तारीख आणि वेळ** : 03.11.2025 15.00 वाजेपर्यंत. **07.** www.ireps.gov.in **वर निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ** : 03.11.2025 15.30 वाजेनंतर. **08. वेबसाइट विशिष्ट माहिती:** www.ireps.gov.in, **09.** टीप : संभाव्य निविदाकारांना या निविदेसाठी जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धीपत्रक वेबसाइट www.ireps.gov.in नोंदणी बंद होण्याच्या तारखेपूर्वी वारंवार वेबसाइटला भेट देण्याचा सल्ला देण्यात येतो. ANJ-63
तिकिटांसाठी UTS ॲप डाउनलोड करा.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**विद्युत काम**
भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्या वतीने, मध्य रेल्वे, सोलापूर येथील वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता, जनरल, खालील कामांसाठी प्रतिष्ठित, अनुभवी आणि परवानाधारक विद्युत कंत्राटदारांकडून रेल्वे ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट **www.ireps.gov.in** वर ऑनलाइन ई-निविदा मागवत आहेत. **निविदा क्रमांक SUR/L/T/2025/19. कामाचे नाव:** दुस्ती आणि देखभाल वेळापत्रक A, B, C आणि D तपासणी ज्यामध्ये GREAVES च्या पॉवर कारचे एक्झॉस्ट समायोजन आहे. सोलापूर विभागातील LHB गाड्यांच्या पॉवर कारमध्ये एक वर्षासाठी DA सेट बसवा. **अंदाजे किंमत:** 2,38,36,132.28/-, **बोली सुरक्षा:** 2,69,200/-, **पूर्ण कालावधी:** 12 महिने, **ऑफरची वैधता:** 60 दिवस. **निविदा क्रमांक** SUR/L/T/2025/20. **कामाचे नाव:** दुरुस्ती आणि देखभाल वेळापत्रक अ, ब, क आणि ड चेक, कमिन्सच्या पॉवर कारच्या एक्झॉस्टिंगसह सोलापूर विभागातील एलएचबी गाड्यांच्या पॉवर कारमध्ये एक वर्षासाठी डीए सेट बसवा. **अंदाजे खर्च:** रु.2,69,12,365.91/-, **बोली सुरक्षा:** 2,84,600/-, **पूर्ण कालावधी:** 12 महिने, ऑफरची वैधता: 60 दिवस, **वेबसाइटवर निविदा बंद होण्याची तारीख आणि वेळ:** 03/11/2025 दुपारी 3.00 वाजता, बोली सुरक्षा कर्ज **www.ireps.gov.in** वेबसाइटवर ई-पेमेंटद्वारे भरावा लागेल. ANJ-64
तिकिटांसाठी UTS ॲप डाउनलोड करा.

# भारताची दुसऱ्या कसोटीतही मजबूत पकड

**शुभमन गिल नाबाद १२९ ● जयस्वालचे द्विशतक हुकले ● नितीश रेड्डीचे अर्धशतक हुकले ● भारत ५ बाद ५१८ डाव घोषित ● वेस्ट इंडीज ४ बाद १४०**

◆ **नवी दिल्ली, ११ ऑक्टोबर**

शनिवारी अरुण जेटली स्टेडियमवर वेस्ट इंडीजविरुद्धच्या दुसऱ्या व शेवटच्या कसोटी सामन्याच्या दुसऱ्या दिवशी भारताने १३४.२ षटकांत ५ बाद ५१८ धावांवर आपला पहिला डाव घोषित केला. कालचा नाबाद सलामीवीर यशस्वी जयस्वालचे द्विशतक थोडक्यात हुकले, तर कर्णधार शुभमन गिलने १२९ धावांवर नाबाद राहून कसोटी कारकिर्दीतील आपले यशस्वी वर्ष सुरू ठेवले. हे त्याचे कसोटी क्रिकेटमधील दहावे शतक आहे. प्रत्युत्तर देताना वेस्ट इंडीजने दिवस अखेर पहिल्या डावात ४३ षटकांत ४ गडी गमावित १४० धावा केल्या. वेस्ट इंडीज अजून ३७८ धावांनी पिछाडीवर आहे. एकंदरीत भारताने दुसऱ्या कसोटी सामन्यावरही आपली पकड मजबूत केली असून भारताला विंडीजविरुद्ध पुन्हा डावाने विजय नोंदविण्याची संधी आहे.


नितीश कुमार रेड्डी


ऐन मोक्याच्या क्षणी यशस्वी जयस्वाल धावबाद

कर्णधार शुभमन गिलने १९६ चेंडूंत १६ चौकार व २ षट्कारांसह नाबाद १२९ धावा केल्या. ही त्याची आता घरच्या कसोटी सामन्यातील सर्वोत्तच्च वैयक्तिक धावसंख्या आहे. त्याने मार्च २०२३ मध्ये अहमदाबाद येथे ऑस्ट्रेलियाविरुद्ध केलेल्या १२८ धावांच्या तुलनेत गिलने हा डाव जिंकला. कर्णधार म्हणून हे त्याचे पाचवे शतक आहे.

ध्रुव जुरेलला वेस्ट इंडीजचा कर्णधार रोस्टन चेसने ४४ धावांवर बाद केल्यानंतर लगेचच ही डाव घोषित करण्याचा निर्णय घेण्यात आला. गिल व यशस्वी जयस्वालच्या नेतृत्वाखालील प्रभावी फलंदाजीमुळे भारताला ५१८ धावांपर्यंत मजल मारता आली.

भारताने २ बाद ३१८ धावांवरून पुढे खेळण्यास सुरुवात केली व २०० धावा जोडल्या आणि ५ बाद ५१८ धावांवर आपला पहिला डाव घोषित केला. गिल आणि जयस्वालशिवाय ध्रुव जुरेल, बी. साई सुदर्शन (८७) व नितीश कुमार रेड्डी (४३) यांच्या योगदानामुळे भारताने आपल्या संपूर्ण फलंदाजी डावात गती कायम राखली. गिलचा डाव नियंत्रण आणि वेगवान वेळेने भरला आणि अर्धशतक गाठल्यानंतर त्याने वेगवान स्ट्रोकप्लेने नाबाद राहण्याचा वेग वाढवला.

भारताचे लक्ष आता आपल्या फिरकी त्रिकुटावर- रवींद्र जडेजा, कुलदीप यादव आणि वॉशिंग्टन सुंदर यांच्या कामगिरीवर केंद्रित असेल. ते बदलत्या उसळीच्या लक्षणांचा फायदा घेऊन काळ्या मातीच्या खेळपट्टीवर वळतील अशी अपेक्षा आहे.

अहमदाबादमधील गत कसोटीच्या दोन्ही डावात ५० षटके फलंदाजी करण्यात अपयशी ठरलेला वेस्ट इंडीज यावेळी अधिक लवचिकता दाखवण्याची आशा करेल, कारण खेळपट्टी अजूनही अहमदाबादपेक्षा फलंदाजीसाठी अधिक अनुकूल आहे.

**जयस्वालची इच्छा अपूर्ण**

दुसऱ्या दिवसाची सुरुवात भारतासाठी निराशाजनक झाली. यशस्वी जयस्वालची तिसरे कसोटी द्विशतक झळकवण्याची इच्छा दुसऱ्या षटकात एका विचित्र धावपळीत संपली. जयस्वालने चेंडू मिड-ऑफकडे फटकावल्यानंतर जलद एक धाव घेतली, परंतु गिलने त्या आवाहनाला नकार दिला. पण तोपर्यंत, टॅगेनरीन चंद्रपॉलने चेंडू यष्टिरक्षकाच्या टोकाला थेट मारला. जयस्वालने खेळपट्टीच्या अर्ध्याहून अधिक अंतरावर धावा घेतली असताना एक निराशाजनक वळण घेतले व यष्टिरक्षक तेव्हिन इमलाचने त्याला धावबाद केले. यशस्वी जयस्वालने २५८ चेंडूंत २२ चौकारांच्या मदतीने १७५ धावांची दिमाखदार खेळी केली.

पाचव्या क्रमांकावर खेळण्याची संधी मिळालेल्या नितीश कुमार रेड्डीला दुसऱ्या चेंडूवर जेडेन सील्सच्या गोलंदाजीवर एलबीडब्ल्यूचा धक्का बसला. नितीशने ५४ चेंडूंत ४ चौकार व २ षट्कारसह ४३ धावा केल्या. नितीशला आपले अर्धशतक पूर्ण करण्यासाठी सात धावा कमी पडल्या. नितीशने गिलसोबत चौथ्या गड्यासाठी ९१ धावांची भफागीदारी केली.

◀(वृत्तसंस्था)

# शतक झळकावित गिलने घडवला इतिहास

## रोहित शर्माचा विक्रम मोडला

◆ **नवी दिल्ली, ११ ऑक्टोबर**



भारतीय कसोटी संघाचा कर्णधार शुभमन गिल कसोटी क्रिकेटमध्ये उत्कृष्ट फॉर्म दाखवत आहे. शनिवारी त्याने वेस्ट इंडीजविरुद्ध दिल्ली कसोटीच्या दुसऱ्या दिवशी शतक झळकावले. भारताच्या पहिल्या डावाच्या १३० व्या षटकात खॅरी पियरेच्या पाचव्या चेंडूवर तीन धावा काढून शुभमनने आपले १० वे कसोटी शतक पूर्ण केले. शुभमनने १७६ चेंडूत १३ चौकार व एक षटकार मारत आपले शतक पूर्ण केले.

कर्णधार म्हणून १२ डावांमध्ये शुभमन गिलचे हे पाचवे कसोटी शतक आहे. शुभमनपेक्षा कमी डावांमध्ये कर्णधार म्हणून इतके शतके झळकावणारे केवळ ॲलिस्टर कुक (९ डाव) व सुनील गावस्कर (१० डाव) आहेत.

शुभमनने या वर्षी पाच कसोटी शतके झळकावली आहेत. एका कॅलेंडर वर्षात कर्णधार म्हणून पाच कसोटी शतके झळकावणारा तो दुसरा भारतीय आहे. शुभमनपूर्वी केवळ विराट कोहलीने दोनदा ही कामगिरी केली होती. शुभमन गिल आता जागतिक कसोटी अजिंक्यपद (डब्ल्यूटीसी) स्पर्धेमध्ये सर्वाधिक शतके करणारा भारतीय फलंदाज झाला आहे. त्याने रोहित शर्माचा विक्रम मोडला. रोहितने डब्ल्यूटीसीमध्ये ९ शतके केली होती. गिलने आतापर्यंत ७१ डावांमध्ये १० शतकांसह ४३.४७ च्या सरासरीने २,८२६ धावा केल्या आहेत. तो डब्ल्यूटीसीमध्ये सर्वाधिक धावा करणारा भारतीय फलंदाजही झाला आहे, त्याने रोहित शर्माला मागे टाकले आहे. रोहितने २,७१६ धावा केल्या होत्या.

**एका कॅलेंडर वर्षात पाच कसोटी शतके (भारतीय कर्णधार)**

**२०१७ - विराट कोहली**
**२०१८ - विराट कोहली**
**२०२५ - शुभमन गिल**

◀(वृत्तसंस्था)



## अहिल्याबाई कनिष्ठ महाविद्यालय तृतीय

**सोलापूर, दि. ११ ऑक्टोबर-**

शालेय शहर खो-खो स्पर्धेत अहिल्याबाई कनिष्ठ महाविद्यालयाने १९ वर्षाखालील मुलांच्या गटात तृतीय क्रमांक संपादला. वसुंधरा कॉलेज जुळे सोलापूर येथे झालेल्या स्पर्धेत त्यांनी ही कामगिरी केली. संघास क्रीडाशिक्षक रमेश हेगडे, प्रा.धनाजी धेंडे, यांचे मार्गदर्शन लाभले. खेळाडूं व प्रशिक्षकांचे संस्थेचे सचिव हाजी बंदेनवाज शेख, प्राचार्य इस्माईल शेख यांनी अभिनंदन केले. **संघ :** सोहेल गौर (कर्णधार), फरमान शेख, अनिश गुजले, नेल्सन पीटर, कैलास वाघमारे, फरान शेख, फुरकान शेख, अबुबुकार शेख, सोहेल बागवान, ओंकार सूर्यवंशी, विशाल गायकवाड, व्यंकटेश खेवजी,समर्थ कळमंडे.



## आसावा व सुयश विद्यालयास विजेतेपद

**शालेय हँडबॉल स्पर्धा**

**सोलापूर, दि. ११ ऑक्टोबर-**

शालेय शहर हँडबॉल स्पर्धेत १७ वर्षाखालील मुलांच्या गटात द. का. आसावा व मुलींच्या गटात सुयश विद्यालयाने विजेतेपद पटकाविले. या स्पर्धेचे उद्घाटन शारीरिक शिक्षण शिक्षक महासंघाचे जिल्हाध्यक्ष दशरथ गुरव यांच्या हस्ते झाले. यावेळी हँडबॉल असोसिएशनचे सचिव सुदेश मालप, डॉ.आनंद चव्हाण, प्रा.शरणबसवेश्वर वांगी, क्रीडाशिक्षक प्रमोद कुणगुलवार, प्रबुद्ध चिंचोलकर आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.राहुल हजारे यांनी केले.

## 'फॅबटेक'च्या प्राजक्ता जाधवची राष्ट्रीय तिरंदाजी स्पर्धेसाठी निवड

**सांगोला, दि. ११ ऑक्टोबर-**



लोणेरे (जि. रायगड) येथे तिरंदाज चाचणी स्पर्धेतून फॅबटेक टेक्निकल कॅम्पस कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च, सांगोला येथील प्राजक्ता जाधव हिची२४ ते ३१ ऑक्टोबर दरम्यान पंजाब येथील गुरूकाशी विद्यापीठ भंटिडा येथे होणा-या आंतर विद्यापीठ तिरंदाजी स्पर्धे साठी निवड झाली आहे. तिला क्रीडा शिक्षक बिरा वगरे, मोहन वाघमारे यांचे प्राजक्ता जाधव हिला मार्गदर्शन लाभले. त्यांचे फॅबटेक टेक्निकल एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षा नीलवर्णा रूपनर, उपाध्यक्ष भाऊसाहेब रूपनर, सचिव डॉ.अमित रूपनर, कार्यकारी संचालक दिनेश रूपनर, इस्टेट डायरेक्टर डॉ.संजय आदाटे, व्यवस्थापक प्रतिनिधी प्रा.प्राजक्ता रूपनर, प्राचार्य रविंद्र शेडगे, उपप्राचार्या डॉ.विद्याराणी क्षीरसागर, डॉ.ज्योती शिंदे आंदीनी तिचे अभिनंदन केले.

## पुरुष व महिला जिल्हा बास्केटबॉल निवड चाचणी उदया

**सोलापूर, दि. ११ ऑक्टोबर -**

सीएम चषक ७५वी सीनिअर २६ ते ३१ ऑक्टोबर दरम्यान स्टेट बास्केटबॉल चॅम्पियनशिप पुरुष व महिला दरम्यान नागपूर येथे होणार आहे. या स्पर्धेमध्ये सोलापूर जिल्ह्याच्या महिला व पुरुष बास्केटबॉल संघ सहभागी होणार आहे. तरी या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या इच्छुक खेळाडूंनी सोमवारी १३ ऑक्टोबर रोजी संध्याकाळी ५ वाजता सेलिब्रेशन स्पोर्ट अकॅडमी सिंधू विहार विजापूर रोड येथे होणार आहे. तरी इच्छुक खेळाडूंनी उपस्थित रहावे. नोंदणीसाठी अधिक माहितीसाठी दिनेश सारंगी (मो.नं. ९३५९४४४८५६) अथवा नविद मुन्शी (९२२६९३४८८०) यांच्याशी संपर्क साधावा, असे जिल्हा बास्केटबॉल असोसिएशनचे सचिव साकिब शेख यांनी कळिवले आहे.

## क्रिकेट संघात पंढरपूरच्या नागेश साळुंखे अकॅडमीच्या तिघींची निवड

**पंढरपूर, दि.११ ऑक्टोंबर -**

जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या वतीने झालेल्या पंधरा वर्षे वयोगटात नागेश साळुंखे क्रिकेट ॲकॅडमीच्या दोघींची निवड झाली. मुग्धा रणजीत पाटील, श्रावणी कैलास बाबर हे निवड झालेले जिल्हा संघातील खेळाडू आहेत. तर वीरा विजय नॉर्टन हिची पुण्यातील आर्यन्स क्रिकेट ॲकॅडमी मध्ये निवड झाली आहे. महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन यांच्यामार्फत घेण्यात येणाऱ्या आंतरजिल्हा स्पर्धेत ते भाग घेतील. त्यांना अकॅडमीचे प्रशिक्षक नागेश साळुंखे यांचे मार्गदर्शन लाभले. यापूर्वीही एन.एस.अकॅडमीच्या मयुरी थोरात भक्ती पवार व स्नेहा शिंदे यांची निवड झाली असून सोलापूर संघात खेळत असून मयुरी थोरात महाराष्ट्राच्या संघात खेळत आहे.




# श्री मल्लिकार्जुन हायस्कूलला कबड्डी स्पर्धेत दुहेरी मुकुट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ ऑक्टोबर-**

शालेय शहर कबड्डी स्पर्धेत श्री मल्लिकार्जुन हायस्कूलने १४ वर्षाखालील मुलींच्या गटात विजेतेपद पटकाविले. या कामगिरीवर संघाची पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली.

राजीव गांधी इंडोर स्टेडियमवर झालेल्या स्पर्धेत त्यांनी १७ वर्षाखालील मुलींच्या गटात तृतीय क्रमांक संपादला. संघास क्रीडाशिक्षक गंगाराम घोडके, परमेश्वर चांदोडे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे संस्थापक आप्पासाहेब हत्तुरे, संस्थेचे अध्यक्ष सिद्धप्पा वरनाळ, माजी प्राचार्य वैजिनाथ हत्तुरे, धरेप्पा हत्तुरे, प्र. मुख्याध्यापक रमेश दिंडोरे यांनी अभिनंदन केले.

# जुळे सोलापूरच्या स्वामी विवेकानंद प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयास दुहेरी मुकुट

**शालेय शहर खो खो स्पर्धा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ ऑक्टोबर-**

शालेय शहर खो खो स्पर्धेत शाहू शिक्षण संस्था पंढरपूर संचलित स्वामी विवेकानंद प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय जुळे सोलापूरने १९ वर्षाखालील मुले व मुलींच्या गटात विजेतेपद पटकावित दुहेरी मुकुट संपादला.



या स्पर्धेचे उद्घाटन माजी राज्य क्रीडा मार्गदर्शक सत्येन जाधव यांच्या हस्ते झाले. यावेळी स्वामी विवेकानंद प्रशालेचे प्राचार्य अंबादास पांढरे, सहशिक्षक यशोदिप आठवले, वसुंधरा कला महाविद्यालय जुळे सोलापूरचे प्राचार्य प्रा.डॉ. तानाजी देशमुख, फिजिकल डायरेक्टर डॉ. प्रा. अशोक पाटील, सोलापूर ॲम्युचर खो खो असोसिएशनचे सचिव उमाकांत गायकवाड, सहसचिव मोहन रजपूत, संतोष कदम, पंच मंडळाचे सचिव गोकुळ कांबळे, सदस्य अजित शिंदे, रवींद्र चव्हाण, आनंद जगताप आदी उपस्थित होते.विजेत्या संघास मार्गदर्शक सदानंद गुजले यांचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा.डॉ.लक्ष्मणराव ढोबळे सर,अध्यक्ष अब्राहम आवळे, सचिव ॲड.अभिजित ढोबळे, प्रशासन अधिकारी क्रांती आवळे यांनी शुभेच्छा दिल्या.

**स्पर्धेतील अंतिम तीन संघ : मुले :** स्वामी विवेकानंद जुळे सोलापूर, संगमेश्वर कनिष्ठ महाविद्यालय, अहिल्याबाई कनिष्ठ महाविद्यालय.

**मुली :** स्वामी विवेकानंद जुळे सोलापूर, माध्यमिक आश्रम शाळा देगाव, सेवासदन कनिष्ठ महाविद्यालय.

# इप्पाकायल, सिद्धेश्वर कन्या, अहिल्याबाई प्रशालेचे वर्चस्व

**शालेय शहर कराटे स्पर्धा**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ११ ऑक्टोबर-**

शालेय शहर कराटे स्पर्धेत इप्पाकायल, सिद्धेश्वर कन्या व अहिल्याबाई प्रशालेने विविध वयोगटात वर्चस्व मिळविले.

येथील राजीव गांधी इनडोअर स्टेडियमवर या स्पर्धेचे उद्घाटन जिल्हा शारीरिक क्रीडा शिक्षक संघटनेचे अध्यक्ष दशरथ गुरव यांच्या हस्ते झाले. यावेळी माजी क्रीडाधिकारी सत्येन जाधव, सिद्धाराम पाटील, भीमराव बाळगे, इक्बाल शेख, अनुराधा थोरात, गौतम वाघमारे,मिहीर जाधव, शिवशरण वाणीपरीट,राजेंद्र हक्के, संभाजी मस्के,मनोज जिंदम, सुनील वाघमारे यांची प्रमुख उपस्थिती होती. विविध वयोगटातून प्रथम क्रमांक प्राप्त करणाऱ्या मुला मुलींची पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी मनोज बाळगे, धनंजय धेंडे, सुरेश सोनवणे, अमोल घोडके, प्राची जोगदंडे, पोर्णिमा पुजारी, साक्षी मस्तुद, श्रावणी वाघमारे यांनी परिश्रम घेतले.





**अंतिम प्रथम तीन, कंसात शाळेचे नावः**

**१४ वर्षाखालील मुले :** २० किलो : राज हुंडेकरी (सिद्धेश्वर स्कूल), ऋषिकेश क्षीरसागर (इप्पाकायल), तन्मय बिराजदार (सिद्धेश्वर मॉन्टेसरी). २५ किलो : कदीर मसलीकर (मल्लिकार्जुन), नक्ष चौधरी, शरद कुमार गंधाल (इप्पाकायल). ३० किलो : अथर्व कळसे (सिद्धेश्वर बालक), अनुज पवार (एस.एम. पी.), राज स्वरूप (इप्पाकायल), ३५ किलो : बद्रीनाथ मुंडेरी (के.एल.ई.), संग्राम मस्के (इप्पाकायल), ओंकार पेटी (आसावा). ४० किलो : श्रेयश चीत्याल (राज स्कूल), क्षितिज जाधव (बी.एफ. दमाणी), ओम कंदीकटला (डी.आर.श्रीराम), ४५ किलो : शिवम डोईजोडे (बी.एफ.दमाणी), पारस अतीम (आय.एम. एस.), अथर्व गव्हाणे (सिद्धेश्वर मॉन्टेसरी), ५० किलो : कौस्तुभ आडम (एल.एफ.सी.), हजम चितापुरे (आय.एम.एस.). ५५ किलो : दत्तराज दासरी (सिद्धेश्वर बालक मंदिर), सार्थक पवार (एस.आर.चांडक), अथर्व मच्छ (एच.सी.सी.), ६० किलो : सच्चिदानंद एलदि. ६० किलोवरील : पवनकुमार चकोले (सिद्धेश्वर स्कूल), देवेंद्र सिंगराल (असावा) संतोष चिंचोळकर (सिद्धेश्वर हायस्कूल).

**मुली :** २२ किलो : अनुष्का दीक्षित, अनुष्का फुलारी (सिद्धेश्वर कन्या), २४ किलो : अंजली हिरेमठ (सिद्धेश्वर मॉन्टेसरी), संचेतना हिरेमठ (सिद्धेश्वर कन्या), २६ किलो : प्रणिती सांगलीकर (ठोकळ), आकांक्षा दीक्षित, भूमी मोरे (सिद्धेश्वर कन्या), ३० किलो : खुशी भिसे (ठोकळ), प्रसिद्धी स्वामी (सिद्धेश्वर कन्या), शुभ्रा गुमरे (महेश स्कूल) ३४ किलो : प्रणाली गुजर (एस.व्ही.सी.एस), दिशा गायकवाड (कुमठे प्रशाला), तेजल जोशी (ठोकळ), ३८ किलो : काव्या वनारोटे (सिद्धेश्वर मॉन्टेसरी), अनर्वि शंकर (बी.एफ. दमाणी, शांभवी जेऊरे (सिद्धेश्वर कन्या), ४२ किलो : अक्षरा पदिला (विद्यानिकेतन), ऋतुजा भोरे, आकांक्षा काटकर (बी. एफ दमाणी), ४६ किलो : महेविष शेख, (एल.एफ.सी.), साक्षी वटकर (एस.व्ही.सी.एस), स्वरा ताकभाते (बी. एफ दमाणी), ५० किलो : वेदिका परदेशी, श्रेया वाघमारे (एल.एफ.सी.), आरोही केसकर (एस. आर. गर्ल्स), ५० किलोवरील : तेजश्री फुलारी (आय.एम.एस.), त्रिशा होटकर (एल.एफ. सी.), समृद्धी भंडारी (दयानंद असावा).

**१७ वर्षाखालील मुले :** ३५ किलो : नयन विभुते (मल्लिकार्जुन), सम्राट वाघमारे (गांधी नाथा रंगजी), इनामदार एस. एस. (सोशल उर्दू), ४० किलो : श्रीयश वाघमोडे (चंडक बाळे), क्षणमुख चिखले, सुहास सुरवसे (एस.एम.पी), ४५ किलो : तेजस तुरेराव (गांधी नाथा रंगजी), वीर भोसले (चंडक बाळे), शिवराज कलादगी (हरीभाई देवकरण), ५० किलो : करण कलशेट्टी, नागेश पंगडूवाले (जैन गुरुकुल), प्रथमेश काळे (शिवाजी), ५४ किलो : सिद्धराज कुलकर्णी (संगमेश्वर), प्रज्वल माने (जैन गुरुकुल) ऋतुराज मढीअप्पा (एल.एफ. सी). ५८ किलो : तन्मय बहिरवाडे (सिद्धेश्वर). अवतार भोसले (डी.आर.श्रीराम), नितीन मनवानी (के.एल.ई.), ६२ किलो : श्रेयश कविटकर (मॉर्डन). तेजस कलागते (सिद्धेश्वर स्कूल), पार्थ झाडमुके (सिद्धेश्वर बालक), ६६ किलो : कौशल तापडिया (चंडक), ओम कारंडे (एस.व्ही.सीएस.) ७० किलो : ऋतुराज साठे (दमाणी), जयवर्धन गवळी (सिद्धेश्वर), अण्णासाहेब चोरमले (एच.सी.सी), ७४ किलो : प्रथमेश सुतार (जैन गुरुकुल), ८२ किलोवरील : सागर शेरखाने (स्वामी विवेकानंद). **मुली :** ३२ किलो : मानसी टंगसाळी, समृद्धी अचलेरे (सिद्धेश्वर कन्या), गौशिय चितापुरे (अहिल्या प्रशाला), ३६ किलो : श्रद्धा फलमारी (एस.व्ही. सी.एस), समीक्षा आमने (निर्मलाताई ठोकळ), भार्गवी सोनवणे (सिद्धेश्वर कन्या), ४० किलो : प्रतिभा पाटील (नेताजी सुभाषचंद्र), चैतन्य सामलेटी (बी.एफ. दमाणी), समीक्षा कामूर्ती, (सिद्धेश्वर कन्या), ४४ किलो : भारती चिंता, श्रेया तांबे ( सिद्धेश्वर स्कूल), प्राची ताकभाते (बी.एफ. दमाणी), ४८ किलो : वंशिका माळी, अक्षरा पाटणकर (सिद्धेश्वर स्कूल), जुनेश खान (सेंट जोसेफ), ५२ किलो : स्नेहा बोकडे (आय.एम.एस.), वैदेही नवले (एस. आर. गर्ल्स), शिवप्रिया एलदि (एल.एफ.सी), ५६ किलो : रिया तांबोळी, अक्षता कुलकर्णी (मॉर्डन हायस्कूल), श्रावणी लांबजने (सिद्धेश्वर कन्या), ६० किलो : गायत्री भैरगोंडे (नेताजी सुभाषचंद्र), श्रावणी डांगे (सिद्धेश्वर कन्या), सलोनी फटफटवाले (सिद्धेश्वर कन्या) ,६४ किलो : प्रांजली शंकुर (बी.एफ. दमाणी), आर्या मोठे (सिद्धेश्वर कन्या), सोनाक्षी कन्नोरे (सिद्धेश्वर बालक मंदिर), ६८ किलो : लेहर सज्जन (आय. एम.एस.), भाग्यश्री गंजली (सिद्धेश्वर कन्या), संचिता वाघमोडे (ठोकळ). ६८ किलोवरील : सोनाली मस्के (सिद्धेश्वर कन्या), प्रीती सज्जन (ए.डी. जोशी), जीकरा शेख, (सिद्धेश्वर कन्या).

**१९ वर्षाखालील मुले :** ३५ किलो : अभिषेक लंगडेवाले, आदर्श गुजले (अहिल्याबाई), ५० किलो : श्रावण वालीकर (संगमेश्वर) कॉलेज, अमीर शेख (ठोकळ), ५४ किलो : नैतिक खुर्द (संगमेश्वर), हैदर शेख (ठोकळ), ५८ किलो : सर्वेश फोफलिया (सोनी), मोहन होनकोरे (ठोकळ), ६२ किलो : अंश सोळसकर (यशोधरा), आयान शेख (ठोकळ), संगमेश्वर शिरोळकर (संगमेश्वर), ६६ किलो : साई कृष्ण गुडूर (एस.व्ही.सी.एस.), विश्वजीत महावरकर (संगमेश्वर), कोंपली श्रीनिवास, (हिराचंद नेमचंद), ७० किलो : गणेश चिंचोळे (मल्लिकार्जुन), युवराज वाघमारे (हरिभाई देवकरण), संस्कार कदम,(यशोधरा), ७४ किलो : सोहेल गोरे, यश बनसोडे (अहिल्याबाई), ७८ किलो : सुरज बलसुरे (सुमिताबाई स्कूल), कैलास वाघमारे, ओंकार धनके (अहिल्याबाई), ८२ किलो : फरान शेख, समर्थ काळमंडे (अहिल्याबाई), ८२ किलोवरील : सुमित बोकडे (हिराचंद नेमचंद), आर्यन गायकवाड (ठोकळ). **मुली :** ३२ किलो : कोमल पाटोळे (अहिल्याबाई), सुरेश शिंदे (संगमेश्वर), माहेश्वरी चौधरी (अहिल्याबाई), ३६ किलो : नक्षत्र भोसले (संगमेश्वर), महालक्ष्मी पसनूर (वालचंद), वैष्णवी ठाकूर (अहिल्याबाई), ४० किलो : लावण्या मेरगु (एस.व्ही.सी.एस.), आनंदी सारंगमठ, समृद्धी ननवरे (ठोकळ), ४४ किलो : सानवी वाळवेकर (उमाबाई श्राविका), धनलक्ष्मी बिराजदार (संगमेश्वर), राणी श्रीमंडी (अहिल्याबाई), ४८ किलो : संस्कृती अंजीखाणे (संगमेश्वर), अमृता देशपांडे (गांधी नाथा), प्रतिज्ञा गोरंदवाले (अहिल्याबाई), ५२ किलो : आर्या यादव (संगमेश्वर), भक्ती मोरे (हरिभाई देवकरण), समयरा शेख, ठोकळ प्रशांती, ५६ किलो : राधिका उडचण (संगमेश्वर), संजना वाले (अहिल्याबाई), काजल मिरजगावकर (सोनी), ६० किलो : पवित्र चांदोडे (संगमेश्वर), गायत्री गुडदिनी (संगमेश्वर), ६४ किलो : कौसर पठाण (अहिल्याबाई), दक्षतनया पुकाळे (दयानंद कॉलेज), तनिष्का पवार (संगमेश्वर कॉलेज), ६८ किलो : मोहिनी अडकी (संगमेश्वर), साक्षी राऊत, प्रतीक्षा अलंकारी (अहिल्याबाई).

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



# करकंबच्या जुगार अड्ड्यावर धाड; सव्वासहा लाखांचा मुद्देमाल जप्त

**• सहाय्यक पोलीस अधिक्षक प्रशांत डगळे यांची कारवाई**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.११ ऑक्टोंबर -**

करकंब ता. पंढरपूर येथील जुगार अड्ड्यावर उपविभागीय पोलिस अधिकारी प्रशांत डगळे यांच्या पथकाने धडक कारवाई करीत एकुण ६ लाख २३ हजार ६२२ रुपये असा मुद्देमाल हस्तगत केला. यावेळी दुचाकी वाहने, मोबाईल, रोख रक्कम, ५२ पानी पत्याचे डाव, या बरोबरच रोख रक्कम ४१ हजार ४३० रुपये, १४ मोबाईल फोन १ लाख २० हजार रुपये, ७ मोटारसायकल ३ लाख ९० हजार आणि देशी दारु ७२ हजार १९२ रुपये असा एकुण ६ लाख २३ हजार ६२२ रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

या कारवाई संदर्भातील सविस्तर माहिती अशी की, करकंब येथील सोमवार पेठ, रोजा गल्ली येथे सिमेंट पत्राचे शेडमध्ये शहाजी वसंत शिंदे (रा. करकंब ता.पंढरपूर) व विजय बाबुराव वंजारी (रा. करकंब ता. पंढरपूर) हे अवैधरीत्या जुगार अडडा चालवत असताना तसेच विजय बाबुराव बंजारी (रा. करकंब ता. पंढरपूर) हा पत्राशेडच्या जवळच्या खोलीत त्याचे ताब्यात बेकायदेशीररीत्या देशी दारु बाळगलेल्या परिस्थितीत असलेबाबत दिनांक ११ ऑक्टोंबर २०२५ रोजी गोपनीय माहिती मिळालेने सदर



ठिकाणी पोलीस पथक यांनी जावून छापा कारवाई केली असता शहाजी वसंत शिंदे हा १४ इसमा सोबत ५२ पानी पत्याच्या जुगारावर पैसे लावून खेळत असताना मिळून आलेले आहेत. या बरोबरच विजय बाबुराव वंजारी हा पत्राशेडच्या जवळच्या खोलीत त्याचे ताब्यात बेकायदेशीर देशी दारु हि जवळ बाळगलेल्या स्थितीत मिळून आलेले आहे. दरम्यान करकंब पोलीस ठाणेत वरील १५ इसमांवर महाराष्ट्र जुगार कायदा कलम ४ व ५ प्रमाणे व विजय बाबुराव वंजारी याचेवर महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५(ई) प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. ही कामगिरी पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधिक्षक प्रितम यावलकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक निलेश गायकवाड आणि त्यांच्या सहकारी कर्मचाऱ्यांच्या पथकाने पार पाडली.



## महत्वाचे...

### माळशिरसमध्ये पुढाऱ्यांचे लक्ष फक्त आरक्षणाकडे

**पिलीव, दि. ११ आक्टोबर-**

माळशिरस तालुक्यात यंदा नव्यानेच गट व गण रचना झाली आहे. यामध्ये अनेक जिल्हा परिषद तसेच पंचायत समिती गणात नव्यानेच गावांचा समावेश झाला आहे. यंदा जिल्हा परिषदचे ९ गट तर पंचायत समितीचे १८ गण झाले आहेत. जिल्हा परिषदेचे तीन गट कमी झालेत तर पंचायत समितीचे ४ गण कमी झालेत. यामुळेच खरेतर अनेक इच्छुकांच्या अपेक्षेवर पाणी फेरले आहे. या नव्यानेच झालेल्या गट व गण रचनेत लोकसंख्येचा विचार करता आरक्षण काय पडणार हे अद्यापही गुलदस्त्यातच आहे. तालुक्यातील अनेक पुढाऱ्यांना सध्या मी जिल्हा परिषद व पंचायत समितीचे सदस्य झाल्यासारखे वाटत आहे. ते सध्या त्या तोऱ्यात वावरताना दिसत आहेत. मात्र आरक्षण जाहीर झाल्यावर अनेकांचा हिरमोड होणार हे नक्की आहे. माळशिरस तालुक्यातील अनेक पुढाऱ्यांची सध्या उतावळा नवरा गुडघ्याला बाशिंग अशीच अवस्था आहे.

### सिंहगड मध्ये GTE परीक्षेसंदर्भात मार्गदर्शन

**पंढरपूर, ११ ऑक्टोबर -**

सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळाच्या एस.के.एन. सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कोर्टी (पंढरपूर) येथील स्थापत्य अभियांत्रिकी विभागाच्या वतीने GTE (Graduate ptitude Test in Engineering) परीक्षेविषयी मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले. या सत्राचे प्रमुख वक्ते प्रा.सिद्धेश पवार होते. GTE परीक्षेत तीन वेळा यश मिळवलेले आणि स्वतःचा अनुभव असलेले प्रा. पवार यांनी विद्यार्थ्यांना परीक्षेचे शैक्षणिक व व्यावसायिक महत्त्व, यशस्वी तयारीसाठी योग्य अभ्यासक्रम रचना, वेळेचे नियोजन, आणि उपयुक्त अभ्याससामग्री यावर मोलाचे मार्गदर्शन केले. त्यांनी GTE परीक्षेद्वारे मिळू शकणाऱ्या IITs, NITs, IISc यांसारख्या नामांकित संस्थांमधील प्रवेशसंधी, तसेच PSU (Public Sector Undertakings) मध्ये थेट नोकरीच्या संधी यांचे विस्तृत विवेचन केले. त्यांनी स्पष्ट केले की ही परीक्षा फक्त पदव्युत्तर शिक्षणासाठीच नव्हे, तर करिअरमध्ये उत्तुंग यशासाठी एक सुवर्णसंधी आहे. या मार्गदर्शन सत्रात द्वितीय वर्ष स्थापत्य अभियांत्रिकी विभागातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. उपक्रमाचे आयोजन विभाग प्रमुख डॉ.श्रीगणेश कदम यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनात विभागातील सर्व प्राध्यापकवृंद व विद्यार्थ्यांचे मोलाचे योगदान लाभले.




### कोल्हापुर-कलबुर्गी स्पेशल एक्सप्रेस वेळेत व कलबुर्गीहून रात्री सोडण्याची मागणी

**सांगोला, दि. ११ आक्टोबर-**

नुकतीच सकाळच्या सत्रामध्ये कोल्हापूर-मिरज-कलबुर्गी स्पेशल एक्सप्रेस सुरू करण्यात आली आहे. यामुळे येणाऱ्या दिवाळी निमित्त देवदर्शन यात्रा करणाऱ्या भाविकांची उत्तम सोय झालेली आहे. या रेल्वेचा स्पेशल दर्जा असल्याने दर ही वाढीव आहेत. तरीही प्रवासी व भाविकांची या रेल्वेला पसंती आहे. परंतु या रेल्वेचे वेळापत्रक पाहिले असता या गाडीसाठी लुज टाइमिंग भरपूर प्रमाणात देण्यात आलेला आहे. ही रेल्वे आज तागायत सुमारे तीन ते साडेतीन तास उशिराने धावते. प्रवासात ही रेल्वे मध्येच एखाद्या स्थानकावर तासनतास थांबवुन ठेवली जाते. यामुळे प्रवाशांनी व भाविकांनी केलेले नियोजन विस्कळते व नाहक त्रास सहन करावा लागतो. यामुळे प्रवासी वर्गातून नाराजी व्यक्त होत आहे. तरी या रेल्वेचे लूज टाइमिंग कमी करून सकाळच्या सत्रातील कोल्हापूर-कलबुर्गी स्पेशल एक्सप्रेस वेळेवर पोहोचवण्यात यावी व परतीच्या प्रवासासाठी कलबुर्गी येथून रात्री उशिरा नऊ वाजता सोडण्यात यावी अशी मागणी शहीद अशोक कामटे बहुउद्देशीय सामाजिक संघटना, सांगोला यांच्यावतीने करण्यात आली आहे.

# विवेक विचार मंचद्वारे सर्वांसाठी एक स्मशान प्रभावी मोहीम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ ऑक्टोबर-**

हिंदू संस्कृतीमध्ये ज्या समाजघटकांच्या मध्ये प्रेत पुरण्याची प्रथा आहे त्यांच्यासाठी तसेच अन्य समाज घटकांसाठी सुद्धा सुविधायुक्त स्मशानभूमी असावी. कोणाच्याही मानवी हक्कांचे हनन होऊ नये व संविधानाला अपेक्षित सामाजिक समता व बंधुतेच्या प्रयत्नांना आणखी गती मिळावी, या उद्देशाने विवेक विचार मंचद्वारे 'स्मशानभूमी' विषयात शासनाकडे सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. राज्यस्तरीय सामाजिक न्याय परिषदेत 'सर्वांसाठी एक स्मशान' असा ठराव मंचाद्वारे पारित केलेला आहे.

या अभ्यास समितिद्वारे स्मशानभूमीच्या समस्यांचा सखोल अभ्यास करून शासनाने प्रभावी धोरण व उपाय योजना राबवाव्या ही अपेक्षा, विवेक विचार मंचचे संयोजक सागर शिंदे यांनी व्यक्त केली. स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा होत असतानाही समाजातील काही घटकांना स्मशानभूमीसाठी, आप्तजनांच्या अंत्यसंस्कारासाठी संघर्ष करावा लागणे, अनेक अडचणींना तोंड द्यावे लागणे हे अत्यंत दुर्दैवी असून हे थांबले पाहिजे. अनेक गावात स्मशानभूमीच्या जागेवरून वाद सुरु असल्याने मृत बांधवाचे अंत्यसंस्कार कुठे करायचे हा प्रश्न निर्माण होतो.

अनेकदा भांडणे, वाद होतात. ग्राम पंचायत समोर अंत्यसंस्कार केल्याच्या घटना घडल्या आहेत. स्मशानभूमी नसल्याने वाटेच्या कडेला, ओढ्याच्या कडेला अंत्यसंस्कार उरकावे लागतात. पावसाळ्यात खूप जास्त अडचण निर्माण होते. काही गावात स्मशानासाठी जागा, शेड असते पण जाण्यासाठी वाट नसते, स्वच्छता, वीज नसते त्यामुळे अनंत अडचणींना तोड द्यावे लागते. अनेक गावांमध्ये जातीनुसार अनेक स्मशानभूमी झालेल्या निदर्शनास येतात त्यासाठी ग्रामपंचायत तसेच लोकप्रतिनिधींचा निधी वापरला जातो. यामुळे खूप जास्त जागा अडकली जाते तसेच या स्मशानभूमिंना आवश्यक सोयीसुविधा नसल्यामुळे अडचणी निर्माण होतात. प्रत्येक गावात शासकीय व सोयी सुविधायुक्त (शेड, रस्ता, वीज, पाणी, स्वच्छता, आवश्यक वस्तू) अशी सार्वजनिक स्मशानभूमी असावी. जे समाज अग्निसंस्कार करतात अशा सर्व जाती-जमातीमधील नागरिकांना ही स्मशानभूमी खुली असेल. जातीच्या कारणाने कोणी मज्जाव केल्यास त्यावर कायदेशीर गुन्हे दाखल होईल असे नियम तिथे प्रदर्शित केले जावे.

# जिल्ह्याला कायमस्वरूपी दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी द्या

**यशवंत डोंबाळी यांची मागणी**

**पंढरपूर, दि.११ ऑक्टोंबर-**

सोलापूर जिल्ह्याला तात्काळ कायमस्वरूपी जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी व कर्मचारी वर्ग देण्यात यावा अशी मागणी येथील सामाजिक कार्यकर्ते यशवंत डोंबाळी यांनी केली आहे.

या संदर्भात माहिती देताना डोंबाळी यांनी सांगितले की, सोलापूर जिल्हा परिषदेत जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण कार्यालय असून सर्व कारभार प्रभारी अधिकारयांवर चालवला जातोय त्यामुळे सर्व कामे ठप्प झालीत. त्यामुळे याची गांभीर्याने दखल घेत दिव्यांग कल्याण व सक्षमीकरण खात्याचे सचिव तुकाराम मुंडे यांनी त्वरीत याबाबतीत लक्ष घालुन सोलापूर जिल्ह्याला तात्काळ कायमस्वरूपी जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी व कर्मचारी वर्ग द्यावा असे देखील डोंबाळी यांनी सांगितले. या बरोबरच तालुका पातळीवरही प्रत्येक पंचायत समि त्यांमध्ये तात्काळ कार्यालये सुरू करावीत अशीही मागणी यावेळी डोंबाळी यांनी केली आहे.

# तत्कालिन ग्रामविकास अधिकारी वंगे गुन्ह्यातून निर्दोष मुक्त

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट,दि.११ ऑक्टोबर-**

तत्कालीन ग्रामविकास अधिकारी एस. जी. वंगे यांच्या वरील जिल्हा परिषदेने दाखल केलेल्या गुन्ह्यातून न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली.

ग्रा. प. वळसंग व अतिरिक्त कर्देहळळी ग्रामपंचायतीच्या पदभार कालावधीच्या कामकाजासंदर्भात श्री.वंगे यांच्यावर तत्कालीन उपमुख्य कार्यकारी अधिकारी भारत शेंडगे यांनी तक्रारीची तपासणी करून अहवाल सादर केला होता. या अहवालनुसार तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी रमेश देवकर यांनी गुन्हा दाखल करण्याच्या आदेशावरून रमेश गायकवाड यांनी सरपंच दिपक सावंत, ग्रा. प. सदस्य विजयकुमार शिंदे व ग्रामसेवक वंगे यांच्याविरुद्ध वळसंग पोलीस स्टेशन येथे सप्टेंबर २००३ मध्ये दोन लाखांच्या गैरव्यवहारा गुन्हा दाखल केला होता. सरपंच, ग्रा. पं. सदस्यांना जिल्हाधिकाऱ्यांनी पदावरून काढून टाकले होते. वंगे यांना निलंबित केले होते. ३१ मार्च २००४ मध्ये सेवेतून बडतर्फ करण्यात आले होते. या पार्श्वभूमीवर, सोलापूर न्यायालयात आरोपपत्र ठेवण्यात येऊन सुनावणी होऊन गुन्हा अक्कलकोट न्यायालयाकडे वर्ग झाला होता. सुनावणी कालावधीत आरोपी सरपंच दिपक सावंत आणी विजय कुमार शिंदे हे मयत पावले. सरकार पक्षाकडून ५ साक्षीदार तपासण्यात आले.

अखेर वंगे यांना न्यायमूर्ती एन. एल. ए. शेख यांनी सर्व आरोपातून निर्दोष मुक्त केले. सरकार पक्षातर्फे ॲड. गिरीष सरवदे, ॲड. सौ. मोरे यांनी काम पाहिले. वंगे यांच्यातर्फे ॲड. मंगला चिंचोळकर (जोशी), सहाय्यक वकील म्हणून शशिकांत वंगे यांनी काम पाहिले.



# 'सह्याद्री'ची जागतिक औषधनिर्माता दिन रॅली

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ११ ऑक्टोबर-**

जागतिक औषधनिर्माता दिनानिमित्त मेथवडे (ता.सांगोला) येथील सह्याद्री कॉलेज ऑफ फार्मसीतर्फे सांगोला शहरात विविध घोषणा व फलकाद्वारे संदेश देत विद्यार्थ्यांनी जनजागृती रॅली काढली.

रॅलीची सुरुवात बाळासाहेब आसबे, नवनाथ पवार, रमेश जाधव, संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ.दिलीपकुमार इंगवले, सचिवा अनिता इंगवले, प्राचार्य डॉ.मनोजकुमार पाटील यांच्या हस्ते समाजसुधारक महात्मा फुले यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून झाली. यावेळी श्रीकांत घोंगडे, सुभाष गावडे, अरविंद केदार, बापू भाकरे, चंदन होनराव, बापू ठोकळे,बापूसाहेब ठोकळे, किशोर बनसोडे,सागर पाटील, धनंजय शिंदे उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर करून अंधश्रद्धा व भोंदूगिरीमुळे नागरिकांचे आर्थिक व आरोग्याचे कसे नुकसान होते हे अतिशय मार्मिकपणाने सांगितले. फार्मासिस्टचे राष्ट्रीय आरोग्य अभियान व सामाजिक कार्यामधील स्थान, भूमिका व योगदान अतिशय प्रभावीपणे पथनाट्याद्वारे विशद केले. पथनाट्याचे उपस्थित सर्व नागरिकांनी कौतुक केले. तसेच यावेळी विद्यार्थ्यांनी व उपस्थित नागरिकांनी नशामुक्तीची शपथ घेतली.

# प्राचार्य डॉ. विश्वनाथ पाटील यांचे निधन

**अकलूज, दि.११ ऑक्टोबर-**

येथील शिक्षण प्रसारक मंडळ संचलित महात्मा फुले शिक्षण शास्त्र महाविद्यालयाचे माजी प्राध्यापक व सध्या कोडोली (जि. कोल्हापूर) येथील सुप्रसिद्ध बी.एड. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वनाथ पाटील उर्फ डॉ.व्ही.आर. पाटील यांचे काल शुक्रवार दि १० ऑक्टोबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले.



अकलूज मध्ये असताना अध्यापनाचे कामाबरोबरच ते पत्रकारिताही करत असत. डॉ. पाटील यांनी अनेक दिवाळी अंकातून वैचारिक लिखाण केले आहे. त्यांच्या अकस्मिक निधनाबद्दल शिक्षण प्रसारक मंडळ अकलूजचे संस्थाचालक, संचालक, शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी तसेच देशमुख परिवार आणि महाराष्ट्र राज्य प्राचार्य महासंघाने दुःख व्यक्त केले आहे.




# 'स्वेरी'च्या मेकॅनिकल विभागात एएसएचआरए विद्यार्थी शाखेची स्थापना

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.११ ऑक्टोंबर -**

येथील स्वेरी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या मेकॅनिकल विभागात अमेरिकन सोसायटी ऑफ हिटिंग रेफ्रिजरेशन ॲड एअर कंडिशनींग (ए.एस.एच.आर.ए.) विद्यार्थी शाखेची स्थापना करण्यात आली.

प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली, कॅम्पस इन्चार्ज डॉ.एम.एम.पवार यांच्या सहकार्याने व उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार यांच्या नेतृत्वाखाली हा कार्यक्रम झाला. यावेळी पुणे चॅप्टरचे स्टुडंट ॲक्टिव्हिटीज को-चेअर प्रा.दीपक भोग प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना विविध उपक्रमात सहभाग घेण्याचे व विद्यार्थी शाखा प्रभावी करण्याचे आवाहन केले. विद्यार्थी प्रतिनिधी मंडळात अध्यक्षा नुपूर अचलारे, उपाध्यक्षा मानसी कंदी, खजिनदारपदी गौरी महाजन तर सचिवपदी कुणाल सूर्यवंशी यांची निवड झाली. निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांनी शपथ घेऊन एचव्हीएसी ज्ञानाचा प्रसार, स्टेम उपक्रम आणि शाश्वत अभियांत्रिकी तत्त्वांचा प्रचार करण्याबाबतची बांधिलकी व्यक्त केली. एचव्हीएसी अभियंता, गणेश गुंड, एचव्हीएसी कन्सल्टिंग इंजिनिअर्स आर.एस.कुलकर्णी यांनी महत्वपूर्ण व्याख्यान दिले.

संवादात्मक सत्रात विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. विद्यार्थी शाखेचे सल्लागार डॉ. दिग्विजय रोंगे यांनी आभार मानले.

# टेंभुर्णीत राज्यस्तरीय व्हॉलिबॉल स्पर्धेचे खा.मोहिते-पाटील यांच्या हस्ते उदघाटन

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि.११ ऑक्टोबर-**

येथील शिवशक्ती शिक्षण प्रसारक मंडळ संचालित संत रोहिदास आश्रम शाळेतील ४४ व्या महाराष्ट्र राज्य ज्युनिअर मुले व मुली शुटिंग व्हॉलिबॉल अजिंक्यपद व निवड चाचणी स्पर्धेचे उद्घाटन खा. धैर्यशीलसिंह मोहिते-पाटील यांच्या हस्ते झाले.



या राज्यस्तरीय स्पर्धेत विविध जिल्ह्यांतून २५ मुला-मुलींच्या संघांनी सहभाग नोंदविला असून स्पर्धा उत्साहात सुरू आहे. उद्घाटनप्रसंगी खा. मोहिते-पाटील यांनी सर्व खेळाडूंना शुभेच्छा देत, खेळातून संघभावना, शिस्त व जिद्द वाढीस लागते. विजयापेक्षा सहभाग महत्त्वाचा असल्याचे प्रतिपादन केले. संस्थेचे संस्थापक कैलास सातपुते यांनी प्रास्ताविक केले. अध्यक्षस्थानी धाराशिव शुगरचे कार्यकारी संचालक अमर पाटील होते. यावेळी शिवसेना शिंदे गटाचे संपर्कप्रमुख संजय कोकाटे, तालुकाप्रमुख मधुकर देशमुख, नेते प्रमोद कुटे, उपसरपंच सतीश नवसे, जिल्हाध्यक्ष सुरज देशमुख, माजी सरपंच परमेश्वर खरात, युवा नेते यशपाल लोंढे, विठ्ठल होणमोरे, नागनाथ बंगाळे, प्रशांत साळे, रणजित काळे, पंडित पाटील, तुकाराम डोके, सोमनाथ ताबे, सचिन होदाडे, शैलेश ओहोळ, गौतम कांबळे, विजय कोकाटे, बाळासाहेब ढगे, केशव गायकवाड, रामकृष्ण काळे, गणेश शिंदे, विजय पवार, रामचंद्र टकले, भास्कर सोनवणे, भारत माने यांसह मान्यवर उपस्थित होते. उद्घाटनानंतर खेळाडूंनी रोमांचक सामन्यांना सुरुवात केली.

# गौडगावमध्ये ४१ जणांचे रक्तदान; लोहोकरे गुरुजी जयंतीनिमित्त आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ११ ऑक्टोबर-**

तालुक्यातील गौडगाव येथील श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेचे संस्थापक लोहोकरे गुरुजी यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त आयोजीत शिबिरात ४१ जणांनी रक्तदान केले.



लोहोकरे गुरुजी यांच्या पुतळ्यास सचिव पंडितराव लोहोकरे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. विनायक गरड अध्यक्षपदी होते.ह.भ.प. माऊली महाराज, खजिनदार मदनलाल खटोड, सहसचिव अरुण भड, अनिल गरड, वसंत काकडे, डॉ. संतोष भड, महेश पाटील, विलास लोहोकरे, अरविंद चव्हाण, प्राचार्य सुरज काकडे, पांडुरंग काळे, प्रवीण गरड, प्रियंका गरड, सोनवणे व ग्रामस्थ उपस्थित होते. श्रीपतपिंपरी विद्यालयाचे दांडिया नृत्य, चिखर्डे हायस्कूलचे लेझीम, इंग्लिश मेडियमचे वारकरी वेशभूषांनी लक्ष वेधले. हभप प्रतीक महाराज पाटील मेडसिंगा यांच्या काल्याच्या किर्तनाने सांगता झाली. प्रदीप महाराज, मुंडे, नागनाथ गरड, भास्कर काकडे, अरुण कुलकर्णी, अभिमान भड, सुदर्शन गरड, शिवराज गरड व वस्तीगृहाचे विद्यार्थी आदींनी परिश्रम घेतले.

# डीएनएस बँकेचे अधिकृत यूपीआय हँडल लाँच

**सहकारी बँकिंगच्या डिजिटायझेशन मधील एक महत्वाचा टप्पा**

**तभा वृत्तसेवा,**
**डोंबिवली, दि. ११ ऑक्टोबर-**

डीएनएस बँकेने आपल्या डिजिटल परिवर्तनाच्या प्रवासात आणखी एक महत्त्वपूर्ण पाऊल टाकले आहे. बँकेने आपला अधिकृत UPI हँडल @okdnsbank लाँच केला आहे. या उपक्रमामुळे डीएनएस बँक भारतातील काही निवडक सहकारी बँकांच्या समूहात सामील झाली आहे,

ज्यांनी स्वतःचे युनिफाईड पेमेंट्स इंटरफेस सेवा सुरू केल्या आहेत Vega - T>he Payment Sw>itch या Geteay द्वारे विकसित केलेल्या प्रणालीच्या साहाय्याने ही घोषणा ग्लोबल फिनटेक फेस्टिव्हलमध्ये डीएनएस बँकेच्या संचालक मंडळातील




सदस्य, पदाधिकारी आणि Geteayचे वरिष्ठ अधिकारी यांच्या उपस्थितीत करण्यात आली. याप्रसंगी डीएनएस बँकेचे माननीय संचालक मिलिंद अरोलकर म्हणाले, हा क्षण केवळ डीएनएस बँकेसाठीच नव्हे तर संपूर्ण सहकारी बँकिंग क्षेत्रासाठी परिवर्तन घडवणारा आहे. आमचे उद्दिष्ट सुरक्षित, आधुनिक आणि सर्वसमावेशक डिजिटल बँकिंग सेवा प्रत्येक समाजघटकापर्यंत पोहोचवणे आणि इतर सहकारी बँकांना या वाटेवर प्रेरित करणे आहे. Geteay चे संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण शर्मा म्हणाले, डीएनएस बँकेसोबत Vega-The Payment Sitchद्वारे भागीदारी करताना आम्हाला अभिमान वाटतो. या माध्यमातून आम्ही सहकारी आणि प्रादेशिक बँकांना भविष्यासाठी तयार आणि विस्तारक्षम पेमेंट इन्फ्रास्ट्रक्चर प्रदान करत आहोत. या महत्त्वपूर्ण टप्प्यामुळे डीएनएस बँकेने सुरक्षित डिजिटल सुविधा, ग्राहकसुलभता आणि आर्थिक सर्वसमावेशकतेच्या दिशेने आपली वचनबद्धता अधिक दृढ केली आहे आणि सहकारी बँकिंग क्षेत्रासाठी एक नवा आदर्श प्रस्थापित केला आहे. डीएनएस बँकेतर्फे सर्व सहकारी बँकांना आवाहन करण्यात येत आहे की, त्यांनी डीएनएस बँकेसोबत भागीदारी करून आपल्या ग्राहकांसाठी QR आधारित पेमेंट सेवा सुरू कराव्यात. @okdnsbank या अधिकृत UPI हँडलद्वारे DNS बँकेच्या टठ सेवांमध्ये सहभागी व्हावे, सहकाराच्या माध्यमातून ग्राहकांपर्यंत सुरक्षित डिजिटल सेवा पुरविण्यासाठी डोंबिवली नागरी सहकारी बँक कटीबद्ध आहे.

# अवंती नगर अपार्टमेंटमध्ये शस्त्राचा धाक दाखवून चोरी

- दोन घरातून सव्वा लाखांचा मुद्देमाल चोरला
- शनिवारी पहाटेची घटना



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ११ ऑक्टोबर -**

शहरातील जुना पूना नाका परिसरातील अवंती नगर हौसींग सोसायटी अपार्टमेंटमध्ये चोरट्यांनी फ्लॅटचे दरवाजे तोडून घरातील लोकांना शस्त्राचा धाक दाखवून चौघां चोरट्यांनी दोन घरांमधून १ लाख १४ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जबरदस्तीने चोरून नेला. ही घटना शनिवारी पहाटे २ ते ३ च्या दरम्यान घडली असून यामुळे शहरात खळबळ उडाली. या घटनेवरून पोलिसांच्या रात्रगस्तीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

घटनेची माहिति मिळताच वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांसह फौजदार चावडी, शहर गुन्हे शाखा, श्वान पथक, फॉरेन्सिक पथकाने घटनास्थळी धाव घेऊन पाहणी करून तपासात सुरुवात केली आहे. याबाबत सागर प्रदीप अन्नदाते (वय ४०, रा. बिल्डींग नं. डी-०९, फ्लॅट नं. बी -५, तिसरा मजला, अवंती नगर हौसींग सोसायटी, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन फौजदार चावडी पोलिस ठाण्यात अज्ञात चार चोरट्यांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शुक्रवारी रात्री अवंती नगर येथील अपार्टमेंटमधील तिसऱ्या मजल्यावर राहणारे सागर अन्नदाते हे पत्नी व मुलासम वेत व दुसऱ्या मजल्यावर राहणाऱ्या सरिता राजुसिंग गौर हे त्यांच्या त्यांच्या घरामध्ये दरवाजांना आतून कडी लावून झोपी गेलेले होते. शनिवारी पहाटे दोनच्या सुमारास अनोळखी चार चोरट्यांनी अन्नदाते यांच्या घराचा मुख्य दरवाजा तोडून घरात घुसले. चोरट्यांच्या हातात धारदार चाकू, लोखंडी रॉड, लोखंडी कटावणी अशी हत्यारे होती. शस्त्रधारी चोरट्यांनी अन्नदाते व त्यांच्या कुटुंबियांना चाकूचा धाक दाखवत कपाटातील रोख ४ हजार रुपये, पत्नीच्या गळ्यातील सोन्याचे मणी-मंगळसूत्र असा २४ हजार रुपयांचा मुद्देमाल जबरदस्तीने चोरून नेला. त्यानंतर चोरट्यांनी अन्नदाते यांच्या बिल्डींगमधील दुसऱ्या मजल्यावर राहणाऱ्या सरिता गौर यांच्या घराचा दरवाजादेखील तोडून त्यांनादेखील चाकूचा धाक दाखवून घरातील लोखंडी कपाट तोडून कपाटातील रोख ५ हजार रुपये, सोन्याचे मणी मंगळसूत्र, दोन जोड कनातील सोन्याचे झुबे, एक सोन्याची लेडीज अंगठी, एक लहान मुलाची सोन्याची अंगठी असा ९० हजार रुपयांचा मुद्देमाल जबरदस्तीने चोरून नेला.

शनिवारी सकाळी या घटनेची माहिती पोलिसांना मिळताच पोलिस उपायुक्त विजय कबाडे, डॉ. अश्विनी पाटील, सहायक आयुक्त राजन माने यांच्यासह फौजदार चावडी व शहर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पाहणी केली. यावेळी श्वान पथक व फॉरेन्सीक पथकालाही बोलाविण्यात आले होते.

फौजदार चावडी व शहर गुन्हे शाखेच्या पोलिस पथकाकडून चोरट्यांचा शोध घेण्याचे काम सुरु असून या परिसरातील सीसीटीव्ही चित्रीकरण तपासण्याचे काम सुरु आहे. जबरी चोरी झालेल्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे किंवा वॉचमनदेखील नसल्याचे पोलिस तपासात निष्पन्न झाले आहे.

### पोलिसांच्या रात्रगस्तीवर प्रश्नचिन्ह...

रात्रीच्यावेळी शहर पोलिसांकडून शहरात गस्त करण्यात येते. ही रात्रगस्त विविध स्तरावरील अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून करण्यात येत असते. रात्रगस्तीसाठी तैनात असणारे पोलिस कर्मचारी हे गस्तीसाठी येतात की नाही हे तपासण्यासाठी गेल्या काही महिन्यापासून महत्वाच्या ठिकाणी क्यूआर कोड लावण्यात आलेले आहेत. गस्तीवर असलेले कर्मचारी हे त्याठिकाणी गेल्यानंतर क्यूआर कोड स्कॅन करतात. त्यावरून ते तिथे आले होते, हे निश्चित होते. त्यामुळे जबरी चोरी झालेल्या ठिकाणी क्यू आर कोड कुठे लावला आहे, त्याठिकाणी गस्तीचा कर्मचारी गेला होता का, कर्मचारी गेला असेल तर त्यास काही संशयास्पद हालचाली दिसून आल्या नाहीत का असे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत.



# 'ऑर्किड'च्या शिक्षकांसाठी सीबीएसई शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ ऑक्टोबर-**

शहरातील नामांकित अशी सीबीएसई स्कुल म्हणून नावलौलिक प्राप्त झालेल्या नागेश करजगी ऑर्किड स्कुल मध्ये शिक्षक वर्गासाठी सीबीएसई कडुन 'ज्ञानाचे सिद्धांत' या विषयावर प्रशिक्षण शिबीर आयोजित करण्यात आले होते.

या प्रशिक्षण शिबिराचे उदघाटन संगमेश्वर पब्लिक स्कुलच्या प्राचार्या प्रियांका समुद्रे यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी स्कुलच्या प्राचार्या रुपाली हजारे,अक्षता रायकर उपस्थित होते. प्रशिक्षण शिबिरात स्कुलमधील ६० शिक्षकांनी सहभाग नोंदविला.यामध्ये प्रमुख मार्गदर्शिका प्रियांका समुद्रे व अक्षता रायकर यांनी ज्ञान व शिक्षण या दोन्ही मधील आधुनिक बदल याविषयी शिक्षकांना इत्थंभूत अशी माहिती दिली. संस्थेचे अध्यक्ष डॉ.कुमार करजगी, संस्थेच्या सचिवा वर्षा विभुते, स्कुलचे व्यवस्थापक अक्षय चिडगुंपी, स्कुलच्या मार्गदर्शिका मीना पारखे यांनी या प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करून शिक्षकांचे ज्ञान अद्ययावत ठेवण्यासाठी मदत केली. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन श्रीदेवी कनके यांनी केले. सदर प्रशिक्षण यशस्वी करण्यासाठी शाळेचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले



सोलापूर : प्रकाशाचा उत्सव दिपावली हा सण अवघ्या आठ दिवसांवर आल्यामुळे सोलापुरातील नवीन कुंभारवाड्यात कुंभार परिवार पणत्या बनवण्यात व्यस्त आहेत.



सोलापूर : गणेश पेठेतील श्री हिंगुलांबिका देवी देवस्थानच्या वर्धापन दिनानिमित्त शनिवारी सकाळी दर्शनासाठी भाविकांनी गर्दी केली होती. यावेळी मंदिरात विद्युत रोषणाई व फुलाची सजावट करण्यात आली. (छायाचित्रे : केवल तिवारी)



शहर गुन्हे शाखेकडून भोंदू बाबास कर्नाटकातून अटक

# गुप्तधनाचा हंडा काढून देणाऱ्या भोंदूबाबास सोमवारपर्यंत कोठडी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ ऑक्टोबर-**

जमिनीतून गुप्त धनाचा हंडा काढून देतो असे सांगून ऑनलाईन सेवा केंद्रचालकाची १ कोटी ८७ हजार रुपयांची फसवणुक करणाऱ्या भोंदूबाबास शहर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी कर्नाटकातील विजापूर येथून अटक केली असून न्यायालयाने त्यास सोमवारपर्यंत पोलिस कोठडीत ठेवण्याचा आदेश दिला आहे.

मोहम्मद कादरसाब शेख (रा. आदिलशाही नगर, जर्मन बेकरीजवळ, विजापूर, कर्नाटक) असे पोलिस कोठडी मिळालेल्या भोंदूबाबाचे नाव आहे. याबाबत गोविंद मल्लिकार्जुन वंगारी (वय ४२, रा. प्लॉट नं. २९, रा. कोंडा नगर, अक्कलकोट रोड, सोलापूर) यांनी दिलेल्या फसवणुक व महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ठ व अघोरी प्रथा व जादूटोणा यांना प्रतिबंध घालण्याबाबत व त्यांचे समूळ उच्चाटन करण्याबाबत अधिनियम २०१३ नुसार जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गोविंद वंगारी यांच्या कोंडा नगर येथील घरात गुप्तधानाचा हंडा असल्याचे आमिष दाखवून मोहम्मद शेख याने वंगारी यांना वेळोवेळी मंत्र-तंत्राचा वापर करून वंगारी व त्यांच्या कुटुंबातील लोकांना कोणतेतरी द्रव्य पिण्यास देऊन जादूटोणा करून गुप्तधन दाखवून ते काढण्यासाठी वंगारी यांच्याकडून ७ जून २०२३ ते ३० नाव्हेंबर २०२३ या कालावधीत १ कोटी ८७ लाख ३१ हजार ३०० रुपये घेतले. ही रक्कम घेऊन मोहम्मद शेख याने वंगारी यांच्या घरात येऊन मंत्र-तंत्र करून जादूटोणा करून वंगारी यांना तीन हांडे काढून कापडामध्ये गुंडाळून ठेवण्यास सांगितले. फेब्रुवारी २०२४ मध्ये शेख याने काढून ठेवलेले दोन हांडे वंगारी यांनी उघडून पाहिले असता त्यामध्ये फक्त माती असल्याचे दिसून आले. घरातील जमिनीमध्ये शेख याने दाखविलेले हांडे काढून पाहिले असता तिथे फक्त पितळ धातूची झाकणे मिळून आली. ॲल्युमिनियमची पेटी काढून पाहिली असता त्यामध्येही काहीही मिळून आले नाही. त्यावेळी वंगारी यांना आपली फसवणुक झाल्याचे समजले. त्यामुळे वंगारी यांनी पोलिस आयुक्तांकडे याबाबत तक्रारी अर्ज केला होता. त्यावरुन जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात येऊन शहर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी भोंदू बाबाचा शोध घेऊन त्यास अटक केली.

ही कारवाई पोलिस आयुक्त एम राजकुमार, उपायुक्त अश्विनी पाटील, सहायक आयुक्त राजन माने यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक अरविंद माने, सहायक पोलिस निरीक्षक दत्तात्रय काळे यांच्या पथकाने केली.





## सद्गुरु विठोबा महाराज चातुर्मासे गुरुभक्त परिवार, पंढरपूर यांच्याकडून

# श्री विठ्ठल चरणी सुवर्ण तुळस हार अर्पण

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.११ ऑक्टोबर-**

श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समिती, श्री क्षेत्र पंढरपूर येथे सद्गुरु विठोबा महाराज चातुर्मासे गुरुभक्त परिवार, पंढरपूर यांच्या वतीने श्री विठ्ठल चरणी सुवर्ण तुळस हार (१०८ पाने) अर्पण करण्यात आला. सुवर्ण तुळस हाराचे वजन ११.१७० मिली ग्रॅम असून त्याची किंमत १,२२,०००/- इतकी आहे. या दानाचे औचित्य साधून गुरुभक्त परिवाराच्या वतीने मंदिर समितीला हार समर्पित करण्यात आला. याप्रसंगी श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समितीचे सदस्य ज्ञानेश्वर महाराज जळगावकर यांच्या हस्ते हार स्वीकारण्यात आला तसेच गुरुभक्त परिवाराचा सत्कार करण्यात आला.

# हेल्मेट सक्तीसह प्रखर एलईडी दिव्यांना प्रतिबंध

- वाढत्या अपघातातील मृत्यूंच्या विषयावर सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ ऑक्टोबर -**





देशातील वाढलेले रस्ते अपघात आणि त्यांतील मृत आणि जखमींची संख्या याची गंभीर दखल घेत सर्वोच्च न्यायालयाने सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेश तसेच राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाला (एनएचएआय) रस्त्यांवरील सुरक्षात्मक उपाययोजनांची अंमलबजावणी करण्याचे आदेश दिले.

त्यामध्ये हेल्मेट सक्ती करण्याबरोबरच वाहनांना लावण्यात येणारे प्रखर एलईडी दिवे, लाल-निळे दिवे (फ्लॅशर) आणि भोंगे (सायरन) आदींचा बेकायदा वापर, विक्री आणि गैरप्रकार रोखण्यासाठी कठोर पावले उचलण्याच्या सूचना न्यायालयाने केल्या. देशातील वाढते अपघात आणि त्यातील मृत्यू चिंतेचा विषय ठरत आहे. यावर नियंत्रणासाठी सुरक्षा उपाययोजनांची कठोर अंमलबजावणी करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने '२०२३ मधील देशातील रस्ते अपघात' मधून आकडेवारी प्रसिद्ध केली. त्यात रस्ते अपघातांत देशामध्ये १,७२,८९० जणांचा मृत्यू झाला असून, हा आकडा वाढतच असल्याचे अधोरेखित केले होते. कोइम्बतूरचे अस्थिरोगतज्ज्ञ डॉ. एस. राजशीकरण यांनी २०१२ मध्ये रस्ते सुरक्षेबाबत याचिका दाखल केली होती. त्यावरून न्या. जे. बी. पारडीवाला आणि न्या. के. व्ही. विश्वनाथन यांच्या खंडपीठाने या उपाययोजनांचे निर्देश दिले. सुनावणीवेळी न्यायालयाने हेल्मेटची सक्ती करताना, चुकीच्या मार्गिकेवरून वाहने चालवणे, असुरक्षित 'ओव्हरटेकिंग' आदी मुद्द्यांवरही न्यायालयाने बोट ठेवले. ठिकाणी सार्वजनिक मोटारविरहीत वाहने आणि पादचाऱ्यांच्या रहदारीचे नियमन करून सहा महिन्यांच्या आत रस्ते सुरक्षा नियम तयार करण्याचे आदेशही न्यायालयाने सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांना दिले.

### न्यायालयाच्या आदेशात काय?

- दुचाकीचालक आणि सहप्रवाशाने हेल्मेट वापरावा यासाठी कायद्यातील तरतुदींची काटेकोर अंमलबजावणी करावी.
- रस्ते, महामार्गावर विविध ठिकाणी बसवलेल्या कॅमेऱ्यांचा साह्याने नियम न पाळणाऱ्यांवर अंकुश ठेवावा.
- रस्ते मार्गिकांची (लेन) शिस्त पाळण्यासाठी उपाययोजना कराव्यात. त्यासाठी मार्गिका निश्चिती, रंगीत पट्टे आदींचा वापर करावा
- प्रखर एलईडी दिवे, लाल-निळे दिवे आणि बेकायदा भोंगे आदींवर निर्बंध घाला.

# पनाशचा बिल्डर अमित थेपडेविरुध्द आणखी २२ तक्रारी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ ऑक्टोबर-**



एकाचा फ्लॅट दुसऱ्यालाच विकून फसवणुक व जातीवाचक शिवीगाळ केल्याप्रकरणी सोलापूर शहर गुन्हे शाखेच्या अटकेत असलेला पनाशचा बिल्डर अमित थेपडेविरुध्द पोलिसांकडे आणखी २० ते २२ जणांनी तक्रारी अर्ज दिलेला आहे. या तक्रारींची पोलिसांकडून चौकशी सुरु आहे. यातील काही तक्रारी अर्जामध्ये थेपडे याच्यासोबत त्याच्याशी संबंधित असलेले राजकीय पक्षाच्या लोकांचाही समावेश असल्याचे समजते.



अमित थेपडे

राहुल मारूती सर्वगोड (वय ४४, रा. मोदी हुडको, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अमित अशोक थेपडे (वय ५१, रा. सर्वे नं. १३४, भोसले नगर, गॅलक्सी जय पारिजात, पुणे) याच्याविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात १४ जानेवारी २०२४ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पनाशचा बिल्डर अमित थेपडे व त्याचा मॅनेजर जावेद शेख यांनी सर्वगोड यांच्याकडून पैसे घेऊनदेखील त्यांनी पसंद केलेला फ्लॅट हा विशाल विजयकुमार जाधव ललिता विजयकुमार जाधव यांना साठेखत करून विकला. त्यामुळे सर्वगोड यांनी थेपडे यांची भेट घेऊन पैसे परत देण्यास सांगितले. त्यावेळी थेपडे याने सर्वगोड यांना जातीवाचक शिवीगाळ करून पैसे देण्यास नकार देऊन शिवीगाळ करून कार्यालयातून बाहेर हाकलून दिले. म्हणून सदर बझार पोलिस ठाण्यात थेपडे व जावेश शेख विरुध्द फसवणुक व ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा दाखल झाल्यापासून थेपडे हा फरार होता. दरम्यान, केंद्र सरकारच्या सक्तवसुली व अंमलबजावणी संचालनायाने अमित थेपडे यास मनी लॉड्रींगप्रकरणी अटक केली आहे. शहर गुन्हे शाखेकडून न्यायालयाच्या परवानगीने थेपडे याचा ताबा घेण्यात येऊन त्यास गुन्ह्यात अटक करण्यात आली. या गुन्ह्याचा तपास सहायक पोलिस आयुक्त माने यांच्याकडे आहे.




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## चौंधरी फाऊंडेशनच्या वतीने मंगळवारी 'गीत रामायण'

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ ऑक्टोबर-**

चौधरी फौंडेशनच्या वतीने मंगळवार दि. १४ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६ वाजता जुळे सोलापुरातील विलासचंद्र मेहता शाळेच्या प्रांगणात 'गीत रामायण' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे, अशी माहिती फौंडेशनचे संस्थापक चेतन चौधरी यांनी पत्रकार परिषदेत दिली.



गेल्या अनेक वर्षापासून चौधरी फौडेशनच्या वतीने अनेक सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रम आयोजित करण्यात येतात.

निरुपणकार विवेक घळसासी हे कथेच्या माध्यमातून निरूपण करणार आहेत. स्वरध्यास संगीत विद्यालय सोलापूरच्या रसिका कुलकर्णी व सानिका कुलकर्णी यांचा विशेष सहभाग असणार आहे. कार्यक्रम सर्वांसाठी खुला आहे. सोलापूरकरांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन चौधरी फौंडेशनचे संस्थापक चेतन चौधरी यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेस रसिका कुलकर्णी, जतीन कुलकर्णी, श्याम कांबळे, अनिकेत लांबतुरे आदी उपस्थित होते.

दसरा, दिवाळीनिमित्त
यल्लम्मा हॅण्डलूम 20% पर्यंत सूट
विविध कॉटन साड्या व ड्रेस मटेरियलचे एकमेव परिपूर्ण दालन
शाखा नं.१ : मार्कंडेय सहकारी रुग्णालय रोड, सोलापूर. मो.9371289887
शाखा नं.२ : अंत्रोळीकर शॉपिंग सेंटर, दत्त चौक, सोलापूर. मो.९३७२३५१८६०







# सांगोला बंदला उत्स्फूर्त पाठिंबा; शेकापचा निषेध मोर्चा

### माजी आ. स्व. गणपतराव देशमुख यांच्या घरावरील हल्ला प्रकरण

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ११ ऑक्टोबर-**

शेतकरी कामगार पक्षाचे माजी आ. स्व. गणपतराव देशमुख यांच्या घरावर शुक्रवार दि.१० ऑक्टोबर रोजी दुपारी भ्याड करण्यात आला. याप्रकरणी शेतकरी कामगार पक्षाकडून शनिवार दि.११ ऑक्टोबर रोजी सांगोला बंदची हाक देण्यात आली होती. त्यानुसार सांगोला शहरासह तालुका बंद ठेवून निषेध मोर्चा काढण्यात आला. निषेध मोर्चाची सुरुवात महात्मा फुले चौक येथून करण्यात आली.

यावेळी शहरातील सर्व महापुरुषांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करण्यात आला. निषेध मोर्चामध्ये विविध पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. सांगोला तहसील कार्यालय समोर झालेल्या भाषणात बाबुराव गायकवाड, बापूसाहेब ठोकळे, महादेव घोंगडे, शिवाजी बनकर, कल्पना शिंगाडे, अरविंद केदार, नवनाथ पवार, अतुल पवार, नंदकुमार शिंदे, मच्छिंद्र काळे, संदीप काळे, प्रभाकर कसबे, तुषार इंगळे, दत्ताभाऊ चव्हाण, अजितसिंह पाटील, सरगर मॅडम, नागेश जोशी यांनी घडलेल्या घटनेचा निषेध करीत प्रशासनाने या घटनेतील हल्लेखोर कोण आहे त्याचा तातडीने शोध घेतला पाहिजे. अशा हल्लेखोरावर कठोर कारवाई करावी व यापुढे असे प्रकार घटना घडणार नाहीत याची प्रशासनाने दक्षता घ्यावी असे मनोगत व्यक्त केले. राज्यात अतिवृष्टीमुळे अजूनही दुष्काळाचे सावट आहे. समोर काही दिवसावर दिवाळीचा सण आहे. असे असताना या घटनेच्या निषेधार्थ सांगोला बंद ठेवणे उचित नव्हते. परंतु सांगोला तालुक्यातील शेतकरी कामगार पक्षाने व विविध पक्षातील नेते मंडळी, कार्यकर्ते यांनी सांगोला बंदसाठी व निषेध मोर्चा व रॅलीसाठी साथ दिली, पाठिंबा दर्शवला त्याबद्दल सर्वांचे आभार व्यक्त करत आ.डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी असे निंदनीय कृत्य करणाऱ्या व्यक्तीला व ते कृत्य करायला लावणाऱ्या व्यक्तीला पोलीस प्रशासनाने तात्काळ शोधून समज द्यावी व त्याचे नाव आमच्या शिवाय इतर कोणालाही सांगू नये असे मनोगत केले. सांगोला तालुक्यातील सर्व राजकीय पक्षाला विचार करायला लावणारी सदर घटना आहे. स्व.आबासाहेबांनी सुसंस्कृत राजकारणाची दिशा दिली. भविष्यात आम्ही जनतेला विसरणार नाही. राजकारण करायचेच असेल तर समोरासमोर येऊन करा. तालुक्याचे राजकारण व समाजकारण सुसंस्कृत ठेऊया. माझ्या जीवात जीव असेपर्यंत मी पदाधिकारी, कार्यकर्ते व जनतेला वाऱ्यावर सोडणार नाही असे अभिवचन डॉ.अनिकेत देशमुख यांनी यावेळी दिले. दि.१० ऑक्टोबर रोजी सांगोला शहरात निघालेल्या रॅलीदरम्यान स्व. आमदार गणपतरावजी देशमुख यांच्या घरावर अज्ञात इसमांनी भ्याड हल्ला केलेला आहे. या हल्लयामुळे सांगोला तालुक्यातील नागरिकांच्या भावना दुखावल्या असून, हा प्रकार अत्यंत निंदनीय व लोकशाहीविरोधी आहे.

या घटनेचा आम्ही सर्वपक्षीय पातळीवर तीव्र निषेध व्यक्त करतो. सांगोला तालुक्यातील सर्व जनतेत संतापाची भावना निर्माण झालेली असून, या अज्ञात इसमांवर कठोरात कठोर कारवाई करण्यात यावी, अशी निवेदनाद्वारे शासन व प्रशासनाकडे मागणी करीत आहोत. लोकशाही मूल्यांचे रक्षण करणे व सामाजिक सलोखा अबाधित ठेवणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. त्यामुळे या प्रकरणाची तात्काळ चौकशी करून दोषींना कठोर शिक्षा करण्यात यावी, अशी सर्वपक्षीय मागणी आहे, असे निवेदन तहसीलदार संतोष कणसे व पोलीस निरीक्षक विनोद घुगे यांना देण्यात आले.

## ▶▶ महत्वाचे...

### रिक्षाला कट मारल्याने एकास मारहाण

**सोलापूर, दि. ११ ऑक्टोबर-**

माधवनगर येथे रिक्षाला कट मारल्याने एकास मारहाण करण्यात आली. ही मारहाण शुक्रवारी रात्री दहाच्या सुमारास झाली. सागर नागनाथ भागानगरे (वय २९ , रा. गवळी वस्ती, एमआयडीसी सोलापूर) असे मारहाण झालेल्या तरुणाचे नाव आहे. सागर शुक्रवारी रात्री दहाच्या सुमारास माधव नगर येथील ७८६ पिठाची गिरणी येथून जात होता. त्यावेळी त्याचा रिक्षाला कट लागला. यातून लक्ष्मण मस्के व इतर दोन अनोळखी व्यक्तींनी लाथाबुक्यांनी मारहाण केली. अनिकेत मोरे याने रात्री ११.४० वाजता शासकीय रुगणालयात दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.


### इक्बाल फॅशनमधून मोबाईल चोरीस

**सोलापूर, दि. ११ ऑक्टोबर-**

शहरातील इक्बाल फॅशन या दुकानातून पंढरपूरच्या तरूणाचा १ लाख रुपये किंमतीचा मोबाईल चोरट्याने चोरून नेला. याबाबत आदित्य मुकुंद भोसले (वय ३०, रा. पंढरपूर स्टेशन रोड, पंढरपूर) याने दिलेल्या फिर्यादीवरुन



जेलरोड पोलिस ठाण्यात तन्मय सुभाष शिंदे (रा. पंढरपूर स्टेशन रोड, पंढरपूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ७ ऑक्टोबर रोजी रात्री आदित्य व तन्मय हे कपडे खरेदीसाठी इक्बाल फॅशन येथे गेले होते. तन्मय याने आदित्य हा कपडे घालून बघत असताना फोटो काढतो असे आदित्य यास सांगून त्याचा १ लाख रुपये किंमतीची मोबाईल घेऊन चोरून नेला. म्हणून जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस नाईक गायकवाड पुढील तपास करीत आहेत.



### 'वाडीया'मधून हजारांचे साहित्य चोरीला

**सोलापूर, दि. ११ ऑक्टोबर-**

शहरातील वाडीया हॉस्पीटलमधील ६० हजार ५०० रुपयांचे इलेक्ट्रिकल कामाचे साहित्य चोरट्याने चोरून नेले. याबाबत सचिन विजयकुमार देशपांडे (वय ५३, रा. जानकी नगर, जुळे सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वाडीया हॉस्पीटल येथे हॉस्पीटलच्या नुतनीकरणाचे काम सुरु असून त्यासाठी २५ बंडल कॉपर वायर, १० नग कंबाईन, १० ॲम्पीयरचे स्वीच असे साहित्य आणून ठेवलेले होते. ते साहित्य ८ ऑक्टोबर रोजी चोरट्याने चोरून नेल्याची नोंद सदर बझार पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. हवालदार चव्हाण पुढील तपास करीत आहेत.

## गुन्हेगार निलेश गायकवाड दोन वर्षासाठी तडीपार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ ऑक्टोबर-**

सलगर वस्ती पोलिस ठाण्याच्या हद्दीतील सराईत गुन्हेगार निलेश गायकवाड यास पोलिस उपायुक्त विजय कबाडे यांनी सोलापूर व धाराशिव या दोन जिल्ह्यातून दोन वर्षासाठी तडीपार करण्याचे आदेश दिले.



निलेश नागनाथ गायकवाड (वय ३०, रा. सेटलमेंट फ्री कॉलनी नं. ३, सोलापूर) असे तडीपार करण्यात आलेल्याचे नाव आहे. निलेश गायकवाड याच्याविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात सन २०२४ व २०२५ या कालावधीमध्ये चोरी करण्यासारखे गुन्हे दाखल आहेत. त्यामुळे त्याच्या गुन्हेगारी कृत्याला आळा घालण्यासाठी गायकवाड यास तडीपार करण्याबाबतचा प्रस्ताव सदर बझार पोलिसांकडून पोलिस उपायुक्त कबाडे यांच्याकडे पाठविण्यात आला होता. त्यास उपायुक्त कबाडे यांनी मंजुरी देत गायकवाड यास सोलापूर व धाराशिव या दोन जिल्ह्यातून तडीपार करण्याचे आदेश दिले. तडीपारीच्या आदेशानंतर गायकवाड यास मुंबई येथे सोडण्यात आले आहे.

## आश्रमशाळा विद्यार्थ्यांसाठी बंकर बेडची व्यवस्था करा

### सहाय्यक संचालक गणेश सोनटक्के यांनी दिले निर्देश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ ऑक्टोबर-**

इतर मागास व बहुजन कल्याण विभागाच्या अनुदानातून सुरू असलेले शहर- जिल्ह्यातील ९७ आश्रमशाळांमधील निवासी राहणाऱ्या सर्वच विद्यार्थ्यांना बंकर बेडची व्यवस्था करण्याचे निर्देश आश्रम शाळांच्या संस्थाचालकांना इतर मागास विभागाचे सहायक संचालक कार्यालयाच्या वतीने देण्यात आले आहे.

शहर-जिल्ह्यात इतर मागास व बहुजन कल्याण विभागाच्या अंतर्गत ९७ आश्रमशाळा आहेत. या शाळांमध्ये मुक्काम ला राहून शिकणारे विद्यार्थी हे सामान्य कुटुंबातील आहेत. शिवाय शेतकरी, शेतमजूर, ऊसतोड कामगार व भटक्या विमुक्त समाजातील विद्यार्थ्यांची संख्याही लक्षणीय आहे.

यातही निवासी राहणाऱ्यांची संख्याही मोठी आहे. या विद्यार्थ्यांना सध्या रात्री खाली जमिनीवर झोपून शिक्षण घ्यावे लागते. त्यांना येणाऱ्या काळात रात्री झोपण्यासाठी दुबार पद्धतीचे बंकर बेडची व्यवस्था करण्याचे निर्देश सहाय्यक संचालक कार्यालयाच्या वतीने देण्यात आले आहे.

एका बंकर बेडवर दोन विद्यार्थ्यांची सोय होऊ शकते. म्हणूनच संस्थांना निर्देश दिले आहेत. विद्यार्थ्यांसाठी बंकर बेडची सोय केली का नाही, याची पडताळणीसुध्दा केली जाईल.

> शहर-जिल्ह्यात आश्रमशाळा जास्त आहेत. तेथे विद्यार्जन करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ही मोठी असून ती गरीब घरातील आहेत. त्यांना दर्जेदार सुविधा उपलब्ध व्हावेत व गुणवत्तेचे शिक्षण मिळावे, यासाठी सहायक संचालक कार्यालयाच्या वतीने नेहमीच दक्ष राहून काम करणार आहे.
> **- गणेश सोनटक्के, सहायक संचालक,**
> इतर मागास व बहुजन कल्याण विभाग सोलापूर

### डोके दुखून त्रास झालेल्या तरुणाचा मृत्यू

**सोलापूर, दि. ११ ऑक्टोबर-**

डोके दुखून त्रास झालेल्या तरुणाचा उपचारास दाखल केल्यानंतर मृत्यू झाला. तो तरुण दक्षिण सोलापूर तालुकयातील गंगेवाडी येथील स्टोन क्रशर येथील खोलीत झोपला असता त्यास शुक्रवारी रात्री त्रास सुरु झाला होता. मनोजसिंह गौर (वय २४, रा. गंगेवाडी ता. द सोलापूर) असे तरुणाचे नाव आहे. मनोजसिंह गौर हा तरुण गंगेवाडी येथील एमआय या स्टोन क्रशर येथील खोलीत शुक्रवारी रात्री झोपी गेला होता. त्यास रात्री ११.४० च्या सुमारास डोके दुखीचा त्रास होऊ लागला. तसेच त्यास अशक्तपणा जाणवू लागल्याने त्यास शनिवारी मध्यरात्री २.३० वाजता भाऊजी संदिप सिंग याने शासकीय रुग्णालयात दाखल केले. त्याची प्रकती चिंताजनक असल्याचे डॉक्टरांनी सांगितले होते. शनिवारी उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. नोंद सिव्हील पोलीस चौकीत करण्यात आली.

## ट्रकचे चाक अंगावरुन गेल्याने एकाचा मृत्यू

**सोलापूर, दि.११ ऑक्टोबर-**

४० वर्षाच्या अनोळखी व्यक्तीचा जुना तुळजापूर नाका येथे चेह-यावरून ट्रकचे चाक गेल्याने गंभीर जखमी होऊन उपचारापूर्वीच मृत्यू झाला. ही घटना शनिवारी सकाळी घडली.

एमएच १८/बीआय/४८६१ क्रमाकाच्या ट्रकचे चाक अनोळखी ३५ ते ४० वर्षे वयाच्या व्यकतीच्या अंगावर गेले. या अपघातात त्या व्यकतीचा चेहरा चेंदामेंदा झाल्याने त्यास गंभीर जखमी अवस्थेत असताना सहाय्यक पोलीस फौजदार ओव्हळ याने उपचारास दाखल केले. परंतु उपचारापूर्वी ती व्यक्ती मृत पावल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. सायंकाळपर्यंत त्या व्यकतीची ओळख पटली नसल्याचे जोडभावी पोलिसांनी सांगितले. घटनेची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

## विवाहितेचा छळ; सहा जणांवर गुन्हा

**सोलापूर, दि. ११ ऑक्टोबर-**

पैशासाठी विवाहितेच्या छळप्रकरणी पतीसह सहाजणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पुनम विनायक हरणे (वय ३४, रा. शिवगंगा नगर, कुमठा नाका) या विवाहितेच्या फिर्यादीवरुन पती विनायक, सासू बसव्वा, सासरा मारूती, नणंद नेहा मेटकरी, स्वाती नाटेकर, पल्लवी माने यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला.

२०१७ ते १३ एप्रिल २०२५ या कालावधीत पुनम पती विनायकसोबत सासरी नांदण्यास होती. लग्नाचे कर्ज फेडण्यासाठी सतत पैशाची मागणी करून भांडण केले. म्हणन एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



सोलापूर शहरातील उत्तर सदर बाजारपेठेतील बेडर पूलवर रस्त्यावर पडलेले धोकादायक खड्डे. दुसऱ्या छायाचित्रात अशोक चौक परिसरात रस्त्यावर पडलेले धोकादायक खड्डे तर तिसऱ्या छायाचित्रात जेलरोड परिसरातील उखडलेला धोकादायक रस्ता.

## खड्ड्यांच्या विळख्यात रस्ते; जीवघेणा धोका कायम

सोलापूर : शहरातील विविध मुख्य आणि अंतर्गत रस्त्यांवर खड्ड्यांचे साम्राज्य पसरले असून नागरिकांच्या दैनंदिन प्रवासाला धोका निर्माण झाला आहे. अनेक ठिकाणी खोल खड्डे निर्माण झाले असून अपघातांची शक्यता वाढली आहे. प्रशासनाकडून ठोस उपाययोजना न झाल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. रस्त्यांचे तातडीने दुरुस्तीचे काम हाती घेण्याची मागणी जोर धरत आहे. (सर्व छायाचित्रे : केवल तिवारी)

## सामाईक वहिवाटीचा रस्ता बंद केल्याच्या रागातून महिलेस शिवीगाळ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ ऑक्टोबर-**

सामाईक वहिवाटीचा रस्ता बंद केल्याच्या रागातून महिलेस शिवीगाळ करून ठार मारण्याची धमकी देणाऱ्या दोघांविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




याबाबत शांता घनशाम परदेशी (वय ४७, रा. निराळे वस्ती, सोलापूर) या महिलेच्या फिर्यादीवरुन अनिल परदेशी व आशिष अनिलसिंग परदेशी (रा. सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सुराणा मार्केट युनिट ५ येथे शांता परदेशी या २८ सप्टेंबर रोजी दुपारी गेल्या असता आशिष परदेशी याने शांता परदेशी यांच्या मालकीच्या जागेत न विचारता लोखंडी शटर घालून अतिक्रमण केले व सामानाचे नुकसान करून सामाईक वहिवाटीचा रस्ता बंद केला आहे.

याबाबत विचारणा करण्यासाठी आलेल्या शांता परदेशी यांना अनिल परदेशी व आशिष परदेशी यांनी तुला कोठे जायचे आहे ते जा, तुला काय करायचे आहे ते कर, जागा खाली करणार नाही असे म्हणून शिवीगाळ करून ठार मारण्याची धमकी दिली. म्हणून फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार खरात पुढील तपास करीत आहेत.

## सेवासदन शाळेजवळून दुचाकी चोरीस

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ ऑक्टोबर-**

शहरातील मुरारजी पेठेतील सेवासदन शाळेजवळून चोरट्याने दुचाकी चोरून नेली. याबाबत अतुल शाहिर बनसोडे (वय २९, रा. हौसे वस्ती, आमराई, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २ ऑक्टोबर रोजी रात्री आठच्या सुमारास अतुल बनसोडे याने त्याची एमएच १३ एएस ११३० क्रमांकाची दुचाकी ही सेवासदन प्रशालेजवळ हॅन्डल लॉक करून पार्क केली होती. ती २५ हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरट्याने चोरून नेल्याची नोंद पोलिसांकडे करण्यात आली आहे. पोलिस नाईक चव्हाण पुढील तपास करीत आहेत.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी - १२३५

**म्हणोनि थोरपण प-हांचि सांडिजे । व्युत्पत्ति आघवी विसरिजे ।**
**जैं जगा धाकुटें होईजे । तै जवळीक माझी ।।**

जीवाने सत्कार्य करुन पुण्याचा संचय वाढवावा आणि वाढविलेल्या संचयाच्या मोबदल्यात भौतीक सुखाची अपेक्षा न करता आत्मसुखाची अपेक्षा करावी, असे भगवंत सांगत आहेत. ईश्वरस्वरुप होण्यासाठी अभिमान, अहंकार सोडावा लागतो. जगतामध्ये भिन्नता पाहून कार्य केली तर ईश्वर प्राप्ती होण्याचे कारणच नाही. कारण सर्व प्राणीमात्र ईश्वराचा अंश असल्याने प्राणीमात्रात भिन्नता पाहिल्यास ईश्वरातच भिन्नता पाहिल्यासारखे होईल. प्राणीमात्रांची, रंजल्या गांजल्यांची सेवा ही अभिमान सोडून नि:स्वार्थ भावनेने करावी लागते, तेव्हा ती सेवा ईश्वराला आवडते. प्रत्येक देहात तो एकच परमात्मा भरुन उरला असल्याने जीवमात्रांना दु:ख देऊन नको त्या ठिकाणी ईश्वर पाहणा-यांना आत्मसुख, परमात्मसुख मिळण्याचे कारण नाही. माणूस स्वत:ला अनेक कारणामुळे मोठा समजत असतो. या मोठेपणामुळे तो स्वत:ला मी-मी म्हणत असतो.



मी च्या वलयात जगणा-या माणसाला परमात्म्याचे दर्शन होत नाही.. ज्यांच्यात मी असतो त्याच्यात अहंकार, स्वार्थ, गर्व आपोआप उत्पन्न होतात. अहंकार, स्वार्थ, गर्व, मोहाच्या उत्पन्न होण्यामुळे सुख, समाधान, आनंद आपोआप दूर जातात. मोठेपणाच्या, मीपणाच्या तो-यात जगणा-यांना ख-या परमात्म्याची जाणीव होऊ शकत नाही. परमात्म्याची जाणीव करुन घेऊन त्याच्या जवळ जर जायचे असेल तर मी पण सोडून कसे वागावे, हे सांगतांना भगवंत म्हणाले, म्हणोनि थोरपण प-हांचि सांडिजे ।व्युत्पत्ति आघवी विसरिजे । जैं जगा धाकुटें होईजे । तै जवळीक माझी ।। अर्थात, श्रीमंतीचा गर्व, मोठेपणा दूर टाकून दयावा लागतो, सर्व प्रकारची विद्वत्ता जणू विसरुनच जावी लागते. तेव्हा परमात्म्याच्या जवळ जाण्याचा मार्ग सुकर होतो. साधुसंतानी त्यांच्या जीवनात स्वत:कडे मोठेपण घेतले नाही. म्हणूनच त्यांची कीर्ती शेकडो वर्षापासून अजरामर आहे.

सुर्यापुढे चंद्रसुध्दा फिका पडतो, तिथे काजव्याने मी पणा बाळगण्याचे कारण नसते. त्या प्रमाणे आपण मोठ-मोठया ज्ञानीपुढे अल्पसे असतांनाही, मलाच सर्व येते म्हणून मी ची बढाई मारु नये. परमात्मा सर्व प्राणीमात्रात भरुन उरला असलातरीही त्याचा सहजासहजी परीचय माणसाला होत नाही. कारण माणूस स्वत:चाच परिचय ख-या अर्थाने करुन घेत नाही. माणूस खोटया मी पणात जास्त गुरफटत असतो. जोपर्यन्त माणसाला स्वत:चा परीचय होत नाही, तोपर्यन्त परमात्म्याचा परिचय होणे अवघड असते. स्वत:चा परीचय होण्यासाठी माणसाला मीपणाची डोळयावरची पट्टी प्रथम बाजुला सारावी लागते. ही पट्टी माणसाने स्वत:च तयार केली असल्याने व स्वत:च्या मनावर, डोळयावर बांधून घेतली असल्याने त्याला स्वत:ला ती पट्टी हटवणे अवघड नसते. ही पट्टी हटविण्यासाठी त्याची मानसिक तयारी होण्याची व सद्गुरुचे मार्गदर्शन लाभण्याची गरज असते. अभिमानाचा दगड गळयात बांधून आत्मसुखाच्या नदीत पोहता येत नाही. या नाशिवंत देहाला मी-मी म्हणण्याचे कारण नाही. परमात्म्याचा म्हणजे जगाचा, निसर्गाचा परीचय व्हायचा असेल तर अभिमानाची ही खोळ बाजूला सारावीच लागते. ही खोळ सारता येण्यासाठी संतसहवास, संतसाहित्याचे वाचन व आत्मानुभव आवश्यक आहे. जय जय राम कृष्ण हरी।.

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : रविवार | दिनविशेष - चांगला दिवस, बिरदेव यात्रा |
| दि. १२ ऑक्टोबर २०२५ | संत शिवस्वरुपी गुरुचरित्र |
| विक्रम संवत् २०८२ | ....राहू काल.... |
| शके - १९४७ | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| संवत्सर - विश्वावसु | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| मास - अश्विन | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| कृ. षष्ठी (१४.१६) | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| ऋतु - वर्षा | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| नक्षत्र - मृग (१३.३६) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| योग - वरियन (१०.५४) | शनिवार : स. ९ ते १०.३० |
| करण - विष्टि (२५.१५) | |



# बौद्ध चळवळीत आर्थिक सक्षमीकरणावर भर देण्याची गरज

### डॉ. अरुणकुमार इंगळे; वर्षावास समाप्ती, ग्रंथ वाचनाचा समारोप सोहळा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ ऑक्टोबर-**

बौद्ध अनुयायांनी शिक्षण, नैतिक आचरण आणि आर्थिक चळवळ यांचा समन्वय साधला तरच समाजाचा सर्वांगीण विकास शक्य आहे. सामाजिक प्रगतीसाठी आर्थिक सक्षमीकरण महत्त्वाचे आहे. गरीब व झोपडपट्टी भागातील लोकांना कमी व्याजदराने कर्ज उपलब्ध व्हावे यासाठी महिला बचत गटांची निर्मिती केली आहे, असे प्रतिपादन नवयान अर्बन को-ऑप क्रेडिट सोसायटीचे संस्थापक सचिव डॉ. अरुणकुमार इंगळे यांनी केले.

भारतीय बौद्ध महासभा, शहर जिल्हा सोलापूर आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मॉर्निंग ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. आंबेडकर उद्यान येथे वर्षावास समाप्ती व 'प्रश्नोत्तरातून समग्र डॉ. बाबासाहेब आंबेडकर' ग्रंथ वाचन समाप्तीचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. याप्रसंगी ते बोलत होत. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हाध्यक्ष अण्णासाहेब वाघमारे होते. प्रमुख पाहुणे म्हणून सेवानिवृत्त कृषी संचालक आबासाहेब साबळे, माजी नगरसेवक अशोक जानराव, डॉ. ज्योत्स्ना कोरे व डॉ. सुरेश कोरे उपस्थित होते. यावेळी पुरस्कार प्राप्त उपसंपादक किरण बनसोडे, रत्नदीप कांबळे, धम्मरक्षिता कांबळे आणि डॉ.जगन्नाथ शिंगे यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमात आबासाहेब साबळे, अशोक जानराव, निर्मला कांबळे यांनीही मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन नागसेन माने यांनी केले तर आभार शाम शिंगे यांनी मानले.

# जादा तास घेऊन मुलांची गुणवत्ता सुधारा

## आश्रमशाळांना प्रशासनाच्या सूचना

दोन महिन्यांपूर्वी भटक्या जाती व विमुक्त जमाती समितीने जिल्ह्यातील विशिष्ट आश्रमशाळांना भेट देऊन गुणवत्ता व सोईसुविधांची तपासणी केली होती. यावेळी सोईसुविधा गायब तर विद्यार्थ्यांची गुणवत्ता दिसून आली नाही. त्यामुळे समितीने नाराजी व्यक्त करून तीन महिन्यात सुधारणा करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार प्रशासनाकडून कारवाई सुरू आहे.

अभ्यासात मागे असलेल्या आश्रमशाळामधील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी प्रयत्न केले जात आहेत. या मोहिमेत सर्वच आश्रमशाळांनी सहभागी व्हावे व गुणवत्तावाढीसाठी एक पाऊल पुढे टाकावे.
**- गणेश सोनटक्के,** सहायक संचालक, इतर मागास व बहुजन कल्याण विभाग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ ऑक्टोबर-**

शहर-जिल्ह्यात इतर मागास व बहुजन कल्याण विभागांकडून अनुदानित ९७ आश्रम शाळा आहेत. या शाळांतील अभ्यासात कच्च्या असलेल्या विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढण्यासाठी ठोस निर्णय घेण्यात आले आहेत. अभ्यासामध्ये मागे असलेल्या सर्वच आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांची गुणवत्ता सुधारण्यासाठी संस्था व मुख्याध्यापक पातळीवरून शिक्षकांना जादा तास घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.



आश्रमशाळेतील गुणवत्ता घसरत असल्याचे विधान मंडळाच्या भटक्या विमुक्त जाती-जमाती कमिटीने दिलेल्या भेटी दरम्यान दिसून आले होते. तेव्हा या समितीने उघडपणे नाराजी व्यक्त केली. अनेक विद्यार्थी बाराखडीसह गणितातही कच्चे असल्याचे या समितीच्या लक्षात आले. शिवाय, अन्य विषयातही विद्यार्थी मागे असल्याचेही निरीक्षण समितीने नोंदवले होते. त्याची दखल घेत सहाय्यक संचालक कार्यालयाकडून देण्यात आलेल्या भेटीच्या दरम्यानही हीच गोष्ट निदर्शनास आली. म्हणूनच सहाय्यक संचालक प्रशासनाने शिक्षकांनी जादा तास घेण्याची सक्त सूचना दिली आहे. अभ्यासात कच्च्या विद्यार्थ्यांची यादी करून वर्गनिहाय सकाळ सायंकाळच्या सत्रात जादा तास घेण्याचे आदेशही दिले आहेत. जादा तासांच्या व विशिष्ट दिवसानंतर अशा विद्यार्थ्यांची जिल्हा प्रशासनाकडून परीक्षा घेऊन त्यांच्या गुणवत्ता वाढीची पडताळणी केली जाणार आहे.

### सांची बुद्ध वंदना संघातर्फे आज वर्षावासानिमित्त कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ ऑक्टोबर-**

येथील सांची बुद्ध वंदना संघाकडून धनेगाव कॅम्प तालुका केज (जिल्हा बीड) येथे वर्षावासानिमित्त एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. येत्या रविवार, १२ ऑक्टोबर रोजी हा कार्यक्रम होणार आहे. बौद्ध धर्मातील महत्त्वाचा विधी असलेल्या या वर्षावास कार्यक्रमामध्ये सर्व बौद्ध उपासक-उपासिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे आयोजन संघाच्या वतीने करण्यात आले असून सोलापूर आणि परिसरातील सर्व अनुयायांना यात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. बुद्ध वंदना आणि धार्मिक कार्यक्रमांसाठी सर्व तयारी पूर्ण करण्यात आली आहे.



# शेतकऱ्यांना त्रास देवू नका; बँकांना मनसेचा इशारा

### मनसेच्या वतीने खते, बियाणे आणि शेतीपिकांच्या औषधांचे वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ ऑक्टोबर-**

पूरग्रस्त शेतकऱ्यांना हप्ता वसुलीसाठी आत्ता तरी त्रास देऊ नका, अन्यथा हात जोडून नाही तर मनसे स्टाईलने तुम्हाला भोगावे लागेल, असा इशारा मनसे सरचिटणीस मनोज चव्हाण यांनी दिला आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने राज्यातील सर्व बँकांना हा इशारा देण्यात आला आहे.

पूर बाधित उत्तर सोलापूर तालुक्यातील शिवणी येथे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी बाधित शेतकऱ्यांची भेट घेतली. यावेळी त्यांना मनसेच्या वतीने खते, बियाणे आणि शेतीपिकांच्या औषधांचे वाटप करण्यात आले. सोलापूर जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टी आणि सीना नदीला आलेल्या पुरामुळे प्रचंड नुकसान झाले असून खरंच ओला दुष्काळ जाहीर करण्याची परिस्थिती असल्याचं मत मनसे सरचिटणीस मनोज चव्हाण यांनी यावेळी व्यक्त केले.



## वीज कर्मचाऱ्यांच्या संपाला शिवसेना ठाकरे पक्षाचा पाठिंबा

**सोलापूर, दि. ११ ऑक्टोबर-**

येथील वीज वितरण कर्मचाऱ्यांच्या खासगीकरणाविरोधी शिवसेना उपनेत्या संपाला अस्मिता गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना उध्दव ठाकरे पक्षाने पाठिंबा दिला आहे. महानिर्मिती, महाप्तरेषण, महावितरण या तिन्ही बीज कंपन्यांमध्ये सुरू असलेले खासगीकरण, महावितरण कंपनीच्या नफ्यात, टोरंटो, अदानी व इतर खासगी भांडवलदारांना समांतर सहभाग देण्याचा वीज वितरणाचा एकतर्फी निर्णय तसेच पुनर्रचना लागू करणे, वीज कर्मचाऱ्यांना पेन्शन लागू करणे व इतर धोरणात्मक विषयांवर शासनाकडून तोडगा निघत नसल्याने महाराष्ट्र राज्य विद्युत कर्मचारी, अभियंता, अधिकारी कृती समितीच्यावतीने विविध मागण्यांसाठी तीन दिवसीय संप पुकारण्यात आला आहे. महाराष्ट्र राज्य विद्युत कर्मचारी अभियंता अधिकारी कृती समितीला शिवसेना उध्दव ठाकरे पक्षाच्यावतीने उपनेत्या गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाप्रमुख संतोष पाटील यांग्या प्रमुख उपस्थितीत एकमुखी पाठिंबा देण्यात आला. बीज वितरण कृती समितीच्यावतीने पदाधिकारी सचिन कोले, नितीन चव्हाण, उल्हास कानगुडे आदींनी शिवसेना पदाधिकाऱ्यांनी पाठिंबा दिल्याबद्दल आभार मानले. यावेळी शहर संघटिका प्रीती नायर, उपशहर संघटिका जयश्री पाटील, उपजिल्हाप्रमुख खंडू सलगर, उपशहर प्रमुख सुरेश जगताप, विद्यार्थी सेना प्रमुख सहू गायकवाड, आबा सावंत उपस्थित होते.



## उर्दू साहित्य अकादमीकडून सुलतान अखतर विशेष पुरस्काराने सन्मानित

**सोलापूर, दि. ११ ऑक्टोबर-**

महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमी, मुंबईने लघुकथाकार, भारतीय उर्दू विकास फाउंडेशनचे अध्यक्ष, सोशल उर्दू हायस्कूलचे सहाय्यक शिक्षक सुलतान अखतर शेख यांना उर्दूच्या सर्वांगीण प्रचार व प्रसाराठी विशेष पुरस्कार देऊन सन्मानित केले आहे. डोम स्टेडियम, वरळी, मुंबई येथे आयोजित बिहार उर्दूच्या भव्य सुवर्णमहोत्सवी कार्यक्रमात अल्पसंख्याक मंत्रालयाचे सचिव रूपेश जयवंशी आणि आयुक्त प्रतिभा इंगळे, शोएब हाशमी अल्पसंख्याक आयुक्तालय यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

# 'स्वस्थ नारी, सशक्त परिवार' अभियानात ७६ लाख महिलांची तपासणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ ऑक्टोबर-**

१७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या काळात राबविण्यात आलेल्या 'स्वस्थ नारी, सशक्त परिवार' या आरोग्य अभियानाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर आणि राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आलेल्या 'स्वस्थ नारी, सशक्त परिवार' या अभियानांतर्गत २ लाख ३० हजार, ६५३ आरोग्य शिबिरे घेण्यात आली, ज्यामध्ये तीन हजार ४१३ विशेष शिबिरांचा समावेश होता. या शिबिरांमध्ये तब्बल १ कोटी ८ लाख ५९ हजारांहून अधिक नागरिकांची तपासणी करण्यात आली असून, यापैकी ३२ लाख ७१ हजार पुरुष आणि ७५ लाख ८७ हजार महिला लाभार्थी ठरल्या आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'सेवा हाच संकल्प, भारत हीच पहिला प्रेरणा ७५ वर्षे' यानुसार राष्ट्रीय स्तरावर 'स्वस्थ नारी, सशक्त परिवार' हे विशेष अभियान देशात राबविण्यात आले. या अभियानांतर्गत राज्यभरातील जिल्हा रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि महानगरपालिका स्तरावर आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात आले. या शिबिरांमध्ये महिलांच्या असंसर्गजन्य आजार, उच्च रक्तदाब, मधुमेह, कर्करोग, क्षयरोग व रक्तदाब तपासणी, गर्भवती महिलांची तपासणी, बालकांचे लसीकरण, पोषण व मासिक पाळी स्वच्छतेबाबत मार्गदर्शन आणि समुपदेशन करण्यात आले. याशिवाय रक्तदान शिबिरे, निक्षय मित्र नोंदणी मोहीम, आयुष्मान कार्ड वितरण, प्रधानमंत्री मातृ वंदना कार्ड वितरण आणि अंगणवाडी केंद्रांमार्फत पोषण जनजागृती उपक्रम राबविण्यात आले. अभियानाच्या यशस्वीतेसाठी सार्वजनिक आरोग्य विभागासोबत शिक्षण, महिला व बाल विकास, वैद्यकीय शिक्षण, ग्रामविकास व नगरविकास विभाग यांनीही सक्रिय सहभाग नोंदवला.

# अवंती नगर, निराळे वस्ती परिसरातील नाल्यावरील अतिक्रमण हटविले

### जेसीबीच्या सहाय्याने ११ खोके केले निष्काशीत

### महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाची कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ ऑक्टोबर-**

सोलापूर : शहरातील अवंती नगर आणि निराळे वस्ती परिसरातील नाल्यावरील अतिक्रमण आज काढण्यात आले. या परिसरातील नाल्यावर असलेले ११ खोके जेसीबीच्या साह्याने निष्काशित करण्यात आले. इतर साहित्य जप्त करण्यात आले. महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाच्या वतीने ही कारवाई करण्यात आली.

सोलापूर शहरात नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीमध्ये शहरातील नाल्यावरील अतिक्रमणामुळे अनेक घरात पाणी शिरल्याच्या घटना घडल्या होत्या. नाल्यावर अतिक्रमण असल्याने पाण्याचा प्रवाह व्यवस्थित पुढे गेला नाही. त्याचा फटका या परिसरातील नागरिकांना बसला. यामुळे महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी नाल्यावरील अतिक्रमण हटविण्याचे आदेश दिले आहेत. महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक



विभागाच्या वतीने आज शुक्रवारी दोन सत्रात ही मोहीम राबविण्यात आली. सकाळी अवंती नगर येथील नाल्यावरील खोक्यांचे अतिक्रमण काढण्यात आले. या मोहिमेत पाच खोके निष्काशीत करण्यात आले. त्यानंतर दुसऱ्या सत्रात दुपारी निराळे वस्ती येथील नाल्यावरील खोक्यांचे अतिक्रमण हटविण्यात आले. यावेळी सहा लोखंडी खोके जागेवरच निष्काशीत करण्यात आले. ही कारवाई पाहण्यासाठी लोकांनी मोठी गर्दी केली होती. महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार नियंत्रण अधिकारी तपन डंके यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे अधिकारी हेमंतकुमार डोंगरे यांच्या माध्यमातून कनिष्ठ अभियंता सुफियान पठाण, दीपक कुंभार यांच्यासह कर्मचाऱ्यांनी ही कारवाई केली.

# महिला सत्तेची नवी पहाट

सोलापूर जिल्ह्यात राजकारणाच्या मैदानात एक नवे युग सुरू होण्याची चिन्हं दिसत आहेत. महिलाराज येऊ घातले आहे. आजवर जिथे पुरुषप्रधान नेतृत्वाची छाया होती, तिथे आता महिलांनी आपले अस्तित्व ठामपणे अधोरेखित केले आहे. निवडणुकांमधील सक्रिय सहभाग, नेतृत्वक्षमता आणि समाजहिताची जाणीव या सर्व बाबतीत सोलापूर जिल्ह्यातील महिलांनी एक नवा आदर्श निर्माण केला आहे.

राज्यातील नगरपालिकांच्या निवडणुकांसाठी आठ दिवसांपूर्वी नगराध्यक्षपदाची आरक्षण सोडत जाहीर झाली. या सोडतीकडे सर्वांचे लक्ष लागले होते. सोलापूर जिल्ह्यातील नगरपरिषदांवर महिलांचे वर्चस्व राहणार असल्याचे या सोडतीतून स्पष्ट झाले आहे. सोलापूर जिल्ह्यातील एकूण नगरपालिकांपैकी बहुतांश नगरपालिकांचे आरक्षण हे महिलांच्या गटासाठी निश्चित झाले आहे. त्यामुळे जिल्ह्यात महिला नेतृत्वाला मोठा वाव मिळणार आहे. अकलूज नगरपरिषद अनुसूचित जातीच्या महिलेसाठी राखीव झाली आहे. यामुळे या नगरपरिषदेवर महिला नेतृत्व उभे राहणार असून नवीन नेतृत्वाच्या शोधाला चालना मिळणार आहे. मोहोळ नगरपरिषदेचे आरक्षण देखील अनुसूचित जातीच्या महिलांसाठी निश्चित झाले आहे. त्यामुळे मोहोळमध्ये महिला उमेदवारांना राजकारणात प्रवेश करण्याची सुवर्णसंधी मिळणार आहे.



**महिला जगत**
**आरती कुसेकर**
**मो.9763751000**



मैंदर्गी नगरपरिषदेसुद्धा अनुसूचित जातीच्या महिलांसाठी राखीव झाली आहे. त्यामुळे या भागातही महिला नेतृत्वाला बळ मिळणार आहे. याशिवाय पंढरपूर, मंगळवेढा, बार्शी आणि वैराग या चार नगरपरिषदाही सर्वसाधारण महिलांसाठी राखीव ठरल्या आहेत. यामुळे या चारही नगरपरिषदांमध्ये महिलांचा राज येणार आहे. पंढरपूरसारख्या धार्मिक नगरीत नगरपरिषदेचे नेतृत्व महिलांच्या हाती जाणार हे निश्चित झाले आहे. मंगळवेढ्यातही महिला उमेदवारांना उमेदवारीची दारे खुली झाली आहेत. बार्शीसारख्या मोठ्या नगरपरिषदेत महिलांचे वर्चस्व निश्चित झाल्याने राजकीय समीकरणांमध्ये मोठा बदल होणार आहे. वैराग नगरपरिषदेतदेखील महिलांचा डंका वाजणार आहे. सांगोला नगरपालिकेचे आरक्षण ओबीसी गटासाठी झाले आहे. सांगोल्यातून ओबीसी समाजातील उमेदवार उमेदवारी दाखल करणार आहेत. माळिशरस नगरपालिकेसुद्धा ओबीसी वर्गासाठी राखीव झाली आहे. त्यामुळे माळिशरस परिसरात ओबीसी समाजातील उमेदवारांचे नेतृत्व पुढे येणार आहे. दरम्यान, नातेपुते, म्हणून आणि श्रीपुर या तिन्ही नगरपरिषदाही सर्वसाधारण महिलांसाठी राखीव झाल्या आहेत. त्यामुळे या भागात महिलांना राजकारणात पुढाकार घेण्याची संधी मिळणार आहे. या सर्व नगरपरिषदांमध्ये महिलांचे आरक्षण निश्चित झाल्यामुळे जिल्हाभरात महिला उमेदवारांची लाट दिसणार आहे. राजकीय पक्षांनाही आता महिलांना उमेदवारी देण्याची सक्ती होणार आहे. नगरपरिषदेचे नेतृत्व महिलांच्या हाती गेल्यामुळे स्थानिक विकासामध्ये वेगळा दृष्टिकोन दिसेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थेत मोठ्या प्रमाणावर प्रतिनिधित्व मिळणार असल्याने प्रशासन व कारभारात महिलांचा सहभाग वाढणार आहे. राज्यातील अन्य जिल्ह्यांप्रमाणेच सोलापूर जिल्ह्यातही महिला उमेदवारांना मोठी ताकद मिळाली आहे. यामुळे पुढील निवडणुका महिला उमेदवारांच्या दृष्टीने ऐतिहासिक ठरण्याची शक्यता आहे. नगरपालिकांच्या निवडणुका जाहीर झाल्यानंतर आता या सोडतीनुसार उमेदवारी अर्ज दाखल करण्यास उमेदवारांचा ओघ सुरू होणार आहे. सोलापूर जिल्ह्यातील राजकीय समीकरणांमध्ये या आरक्षणामुळे मोठा बदल घडून येणार आहे. सोलापूर लोकसभा मतदारसंघातून अनेक वर्षांनंतर महिला खासदार म्हणून प्रणिती शिंदे निवडून आल्या आहेत. त्यांनी मतदारसंघात प्रचंड जनाधार मिळवून ऐतिहासिक विजय संपादन केला आहे. निवडणुकीनंतर त्यांनी विकासकामांना गती दिली असून, पाणीपुरवठा, शिक्षण आणि आरोग्य या क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली आहे. स्थानिक जनतेत त्यांच्याविषयी समाधानाची भावना असून, त्यांच्या कार्यक्षम नेतृत्वाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

### राजकारणात महिलांची वाढती उपस्थिती

सोलापूर जिल्हा परिषदेपासून ते ग्रामपंचायतीपर्यंत अनेक महिला आता निवडून येत आहेत. काही महिला तर पहिल्यांदाच राजकारणात येऊनही प्रभावी कामगिरी करत आहेत. गावपातळीवर जलसंधारण, शिक्षण, महिला बचतगट, आणि आरोग्य यासारख्या क्षेत्रांत त्यांनी घेतलेल्या पुढाकारामुळे त्यांच्यावरचा विश्वास अधिक दृढ झाला आहे.

### सकारात्मक बदलाची नांदी

महिलांच्या नेतृत्वामुळे सोलापूर जिल्ह्यात लोकशाही अधिक मजबूत होत आहे. पारदर्शकता, कामात सातत्य, आणि लोकसहभाग हे महिलांच्या नेतृत्वाचे ठळक पैलू ठरत आहेत. यातून एक सकारात्मक बदल समाजात रुजत असून, महिलाराज म्हणजे केवळ सत्ता मिळवण्यापुरता प्रयत्न नसून तो एक सामाजिक परिवर्तनाचा प्रवास आहे.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


महत्वाचे...



## दत्त विद्या मंदिर प्रशालेच्या शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षपदी डॉ. क्षीरसागर

**सुस्ते दि.११ ऑक्टोबर-**

श्री दादासाहेब सोमदळे शिक्षण प्रसारक मंडळ पंढरपूर, संचलित पंढरपूर तालुक्यातील सुस्ते येथील श्री दत्त विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाच्या शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी संस्थेचे अध्यक्ष डॉ. मदन क्षीरसागर यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. या निवडीनंतर संस्थेचे जेष्ठ संचालक अनिरुद्ध सालविठ्ठल व दिलीप घाडगे यांच्या हस्ते डॉ. मदन क्षीरसागर यांचा सत्कार करून सन्मान करण्यात आला. निवडीबद्दल संस्थेचे उपाध्यक्ष शिवाजी वाघ, सचिव ॲड वैभव टोमके, सहसचिव अजित नडगिरे खजिनदार सलीम वडगावकर ज्येष्ठ संचालक आप्पासाहेब चोपडे, विजयकुमार माळवदकर सुनिता मोरे यांनी त्यांचे अभिनंदन केले. प्रास्ताविक प्राचार्य अविनाश कटकधोंड यांनी केले. यावेळी पर्यवेक्षक सुरेश कट्टे, लिपिक राजकुमार ढगे, श्रीकांत चंदनशिवे, नागनाथ मैंदर्गी, अमोल हुंगे, उच्च माध्यमिक विभाग प्रमुख राजाराम घोडके उपस्थित होते. आभार राजेंद्र जाधव यांनी मानले.



## ओन्ली समाजसेवा संस्थेकडून मुख्यमंत्री सहाय्यता निधीस ११ हजार सुपुर्द

**बार्शी, दि. ११ ऑक्टोबर-**

महाराष्ट्र राज्यात यावर्षी अतिवृष्टी झाल्यामुळे जिल्ह्यातील व राज्यातील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. शहरी व ग्रामीण भागातील जनजीवन विस्कळीत होऊन मोठ्या प्रमाणात हानी झाली आहे. राज्यावर आलेले संकट पाहता ओन्ली समाजसेवा बहुउद्देशीय संस्था बार्शी यांचेकडून फूल नाही फुलाची पाकळी म्हणून मुख्यमंत्री सहाय्यता निधीस रुपये ११ हजार बार्शी तहसीलदार एफ. आर. शेख यांच्याकडे देण्यात आला. यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राहुल वाणी, अजय तिवारी, नागनाथ सोनवणे, सुनील फल्ले, माणकोजी ताकभाते, संतोष हाडगे, प्रा. चंद्रकांत उलभगत, सायरा मुल्ला, रेखा विधाते, रागिनी झेंडे, अलका हाडगे हे उपस्थित होते. हा निधी संस्थेकडे जमा असलेल्या निधीतून देण्यात आला, असे राहुल वाणी यांनी सांगितले.

## ग्रामदैवत कनकंबादेवी नवरात्रोत्सव सांगता

**करकंब, दि. ११ ऑक्टोबर-**



करकंब गावचे ग्रामदैवत कनकंबा देवीचा छबिना गावातून पारंपारिक वाद्य वाजवीत फटाक्यांच्या आतिशबाजीत कनकंबा चौक, बसस्थानक, म्हसोबा देवस्थान,शुक्रवार पेठ, धाकटी वेस, टिळक चौक, थोरली वेस, सोमवार पेठ येथून वाजत गाजत काढण्यात आला.कनकंबा देवी ट्रस्ट कमिटीचे अध्यक्ष अमरसिंह व उज्वलसिंह देशमुख यांच्या वाड्यामधे पालखीचे विधिवत पूजन करून नवरात्रीची सांगता करण्यात आली. यावेळी अजितसिंह देशमुख, सुरेश देशमुख, वयंकटरमन देशमुख,योगेश देशमुख, संजय देशमुख, नामदेव देशमुख, गोपीनाथ देशमुख,दादा देशमुख, पिंटू देशमुख, गणेश देशमुख, सुनील देशमख, अक्षय देशमुख, उदयसिंह निकम, देविदास काटवटे, पांडुरंग काटवटे, हरी काटवटे, सतीश खारे, रामेश्वर खाडे, विजय जाधव, रामचंद्र सलगर, शिवाजी सलगर, विठ्ठल सलगर, विजयसिंह निकम, अमोल खारे, रणजीत बाबर, राजेंद्र खारे, मिथुन चंदनशिवे, सुधीर मुगदुम, संतोष शिंदे,अजित पांढरे, संजय राऊत, युवराज शेटे, उमेश चौगुले, शंकर सलगर, चैतन्य काटवटे, अरुण खारे, अंकुश खारे, रामा शिंदे, महेश गुजरे, रवी व्यवहारे, कुलकर्णी, हारून मनेरी, चैतन्य बनकर, अविनाश शेटे, प्रीतम ठोंबरे, विजय लोंढे उपस्थित होते.

# बार्शीत नगरपरिषद आणि पंचायत समितीवर येणार महिला राज

**तभा वृत्तसेवा । अरुण बळप**
**बार्शी, दि.११ ऑक्टोबर-**

सोलापूर जिल्ह्यातील महत्वाचा समजला जाणाऱ्या बार्शीतील राजकारण कधी पक्षावर चालले नाही. येथे व्यक्ती केंद्रित राजकारणच आजपर्यंत दिसून आले आहे. गेल्या ३-४ वर्षांपासून रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूका अखेर कोर्टाच्या निर्णयानुसार आता होत असून या निवडणुकांची वाट पाहत असणाऱ्या इच्छुकांनी धावपळ सुरु केली आहे, आपापल्या वॉर्डात, पंचायत समिती गणात तसेच जिल्हा परिषद गटात जोमाने कामाला सुरुवात केली आहे. नुकत्याच पार पडलेल्या आरक्षण सोडतीत बार्शी नगरपरिषदेच्या नगराध्यक्षपदासाठी आणि बार्शी पंचायत समिती सभापतीसाठी महिला सर्वसाधारण आरक्षण जाहीर झालेपासून तालुक्यातील प्रमुख गट असणारे राऊत व सोपल यांनी चाचपणी सुरु केली आहे.




बार्शी नगरपालिकेत सोपल आणि बारबोले गट एकत्रपणे काम करतील. राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे विश्वास बारबोले यांच्या पत्नी निर्मला बारबोले रिंगणात उतरण्याची शक्यता वर्तवली जात आहे तर सोपल यांच्या सुनबाई उज्वला सोपल आणि माजी विरोधी पक्षनेते नागेश अक्कलकोटे यांच्या पत्नी कल्पना अक्कलकोटे यांच्याही नावाची चर्चा आहे तर राऊत गटातून माजी आमदार झाडबुके यांच्या कन्या वर्षा ठोंबरे, मागच्या वेळी सोपल यांच्याकडून नगराध्यक्ष पदाची निवडणूक लढवलेले प्रशांत कथले यांनी निवडणुकीनंतर राऊत गटात जाऊन आपली ताकद त्यांच्या पाठीशी उभी केली. त्यांच्या पत्नी तेजस्विनी कथले यांचेही नांव चर्चेत आहे, यात अजून एक भर म्हणजे अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस महिला विभागाच्या प्रदेश सरचिटणीस सुप्रिया गुंड-पाटील यांनी पदाचा राजीनामा दिल्यानंतर त्या राऊत यांच्या गटात प्रवेश करुन नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीत उतरतील अशी चर्चा सोशल मीडियावर पहायला मिळत आहे. पंचायत समितीचे आरक्षण नुकतेच जाहीर झाल्याने ग्रामीण भागातील बरेच नवे जुने चेहरे आपापल्या गटातून ताकद लावताना दिसत आहेत. परंतु जनता कोणाच्या गळ्यात नगराध्यक्ष आणि सभापती पदाची माळ घालते हे येणारा काळच ठरवेल. मात्र नगरपालिका आणि पंचायत समिती दोन्ही शहरी व ग्रामीण भागाचे प्रमुख सत्ता केंद्र असणाऱ्या ठिकाणी महिला राज येणार हे मात्र नक्की.



## पशुवैद्यकीय शिबिरात ३०० जनावरांची तपासणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ ऑक्टोबर-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील कासेगाव येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत ग्राम पंचायत कासेगाव व पशुवैद्यकीय दवाखाना, उळे यांच्या सहकार्याने लाळ खुरकूत, घटसर्प, रोग प्रतिबंधक लसीकरणाचे आयोजन केले. त्यामध्ये जवळपास ३०० गाय, म्हैस, शेळी वर्गाचे लसीकरण करण्यात आले.

शिबिरामध्ये पशुधन परीक्षक म्हणून धर्मराज कदम उपस्थित होते. शासनाच्या योजना शेतकऱ्यांना राबविण्यासाठी येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी सर्वोतपरी मदत करणार असे सरपंच यशपाल वाडकर यांनी सांगितले. प्रमुख पाहुणे म्हणून तंटामुक्त समितीचे अध्यक्ष संजय पवार, पशुधन विकास अधिकारी व्ही. व्ही. भडंगे उपस्थित होते. शिबिराची सुरुवात हनुमंत जाधव यांच्या हस्ते गोमातेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी उपसरपंच ज्ञानेश्वर रोकडे, संभाजी चौगुले, जालिंदर गायकवाड, राम पाटोळे, श्याम ईटुकडे, महालिंग गायकवाड, सरकार पाटील उपस्थित होते.

## खव्यातील भेसळ रोखण्याची 'सुराज्य अभियान'ची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ ऑक्टोबर-**

दसरा व दीपावली सणात मिठाई, पेढे, बर्फी, गुलाबजामून, कुंदा, बासुंदी यांसारख्या गोड पदार्थांची मोठ्या प्रमाणावर मागणी असते. या पदार्थांचा मुख्य कच्चा माल म्हणजे खवा असून, या काळात त्याची मागणी प्रचंड वाढते. वाढत्या मागणीचा गैरफायदा घेत अनेक ठिकाणी खव्यामध्ये भेसळ केली जाते. ही भेसळ आरोग्यासाठी घातक ठरत असल्याने तातडीने कार्यवाही करण्याची मागणी सुराज्य अभियानाच्या वतीने जिल्हाधिकारी आणि अन्न आणि औषध विभाग यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

निवेदनातील प्रमुख मागण्या : जिल्ह्यातील मिठाई विक्रेते व



कारखान्यांवर अचानक तपासणी मोहीम राबवावी, खवा व गोड पदार्थांचे नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठवून अहवाल सार्वजनिक करावा, भेसळ आढळल्यास संबंधितांवर कडक कायदेशीर कारवाई करून त्यांचे परवाने रद्द करावेत, नागरिकांना सजग करण्यासाठी प्रसारमाध्यमे व पत्रकांद्वारे जनजागृती मोहीम राबवावी, बाजारपेठेत नमुना चाचणी केंद्रे उभारावीत आदी मागण्यांचे निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी अभिजित पाटील यांना देण्यात आले. यावेळी उद्योजक किशोर पुकाळे, सागर बापट आणि सुराज्य अभियानचे दत्तात्रय पिसे उपस्थित होते.

## बार्शीच्या शिवशक्ती बँकेची आर्थिक स्थिती भक्कम

### ठेवीदार, खातेदारांनी अफवांवर विश्वास ठेवू नये : डॉ. यादव यांचे स्पष्टीकरण

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.११ ऑक्टोबर-**

कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या विचाराने सुरु असलेल्या बार्शीतील शिवशक्ती को-ऑप. बँकेचा कारभार सुरळीत आणि भक्कमपणे सुरु आहे. अठरापगड जातीच्या लोकांचे हे कुटुंब असून शिवशक्ती बँक ही मामांच्या कुटुंबातील एक सदस्य आहे. ही बँक कोणत्याही प्रकारच्या अडचणीत नसल्याचे स्पष्टीकरण बँकेचे पालक संचालक डॉ. बी. वाय. यादव यांनी शनिवारी पत्रकार परिषदेत केले.


डॉ. यादव म्हणाले, काही लोकांनी विनाकारण बँकेस वेठीस धरुन बिनबुडाचे आरोप करणे सुरु ठेवले आहे. वैयक्तिक कलहामुळे बँकेवर काही लोक विनाकारण आरोप करत आहेत. तसेच यापूर्वी मी त्यांच्या शंकाचे निरसन करण्याचा प्रयत्न केला परंतु आरोप करणारे ऐकण्याच्या मनस्थितीत नाहीत, हे चुकीचे आहे. सुमारे २०० कोटीच्या ठेवी असलेली आणि सुमारे ९४ कोटी रुपयांची कर्ज वाटप केलेली बँक आहे. खातेदारांच्या ठेवीला कोणताही धक्का पोहोचू देणार नाही, अशी ग्वाही यावेळी डॉ. यादव यांनी दिली. यावेळी चेअरमन डॉ. प्रकाश बुरगुटे, व्हाईस चेअरमन प्रा. आर. एन. मोरे, संचालक अशोक वाघमारे, मुरलीधर चव्हाण, सरव्यवस्थापक भारत उमाटे, गणेश बारंगुळे, शाखाधिकारी विजय शिखरे, समाधान राऊत उपस्थित होते.

## श्री विठ्ठल मंदिर कर्मचाऱ्यातर्फे पुरगस्तांना एक दिवसाचा पगार

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.११ ऑक्टोंबर -**

येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर कर्मचारी संघाच्या वतीने पूरग्रस्त मदतीसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीस एक दिवसाचा पगार देण्यात येणार असल्याची माहिती संघाचे अध्यक्ष सुधीर घोडके यांनी दिली.

श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर कर्मचारी संघाचे अध्यक्ष घोडके यांनी सांगितले की, जिल्ह्यात अलीकडेच आलेल्या आपत्कालीन पूरस्थितीमुळे अनेक नागरिकांचे मोठे नुकसान झाले आहे. या संकटाच्या काळात शासनाकडून मदतीसाठी आवाहन करण्यात आले आहे. त्यामुळे ही संकटकालीन परिस्थिती लक्षात घेता येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती कर्मचारी संघ (संलग्न - भारतीय मजदूर सेना) यांच्या वतीने सर्व कर्मचाऱ्यांचा एक दिवसाचा पगार मुख्यमंत्री सहाय्यता निधीस देण्याचा निर्णय एक्मताने सर्व कर्मचारी यांच्या वतीने घेण्यात आला आहे.



## भाजपाच्या करकंब मंडल उपाध्यक्षपदी अभिजीत घाडगे

**तभा वृतसेवा,**
**सुस्ते, दि. ११ ऑक्टोबर-**

भारतीय जनता पार्टीच्या करकंब मंडल उपाध्यक्षपदी पंढरपूर तालुक्यातील सुस्ते येथील अभिजीत दिलीप घाडगे यांची निवड करण्यात आली. पंढरपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती दिलीप घाडगे यांचे ते चिरंजीव आहेत.

शुक्रवारी दि.१० रोजी पंढरपूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभागृहामध्ये भारतीय जनता पार्टीचे युवा नेते प्रणव परिचारक यांच्या प्रमुख उपस्थितीत भाजपाच्या नुतन पदाधिकाऱ्यांच्या निवडी करण्यात आल्या.यावेळी भाजपा करकंब मंडलच्या उपाध्यक्षपदी अभिजीत घाडगे यांची निवड जाहीर करण्यात आली. त्यानंतर प्रणव परिचारक यांच्या हस्ते अभिजीत घाडगे यांना या निवडीचे पत्र देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती राजुबापू गावडे, माजी उपसभापती लक्ष्मण धनवडे, भारतीय जनता पार्टीचे करकंब मंडलचे तालुकाध्यक्ष हर्षल कदम,तुंगत गावचे माजी सरपंच आगतराव रणदिवे,पंढरपुरचे माजी नगरसेवक कृष्णा वाघमारे,सुस्ते गावचे ग्रामपंचायत सदस्य दत्तात्रय बोबडे,आरपीआयचे तालुका उपाध्यक्ष भैया फरतडे यांच्यासह परिचारक गटाचे व भाजपाचे युवा कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## पूरग्रस्त मदत संकलन परिवारातर्फे पूरग्रस्तांना ३१ लाखांचे साहित्य वाटप

**करकंब, दि. ११ ऑक्टोबर-**

पूरग्रस्त मदत संकलन परिवार पुणे यांचेवतीने मित्रपरिवाराच्या माध्यमातून सोलापूर व धाराशिव जिल्ह्यातील २७ गावांतील सुमारे १६०० पूरग्रस्त कुटुंबांना मदत पोहोचवण्यात आली. खचलेले रस्ते, वाहून गेलेले पूल अशा खडतर परिस्थितीतूनही या टीमने मिळेल त्या वाहनांद्वारे त्या परिसरातील घराघरात जाऊन मदत पोहोच केली.

धाराशिव जिल्ह्यातील वाकडी, भाडगाव, जवळा, बेलगाव, चिंचपूर ढगे, पांढरेवाडी, माणकेश्वर, इडा, लोहारा, अंतरगाव, इट, लाखी, ढगपिंपरी,हावरगाव,पाथर्डी तसेच सोलापूर जिल्ह्यातील खैराव, बोपले, तांदुळवाडी, सुलतानपूर, म्हैसगाव, लव्हे, चिंचगाव टेकडी, नरुटेवस्ती, दारफळ या गावांमध्ये सुमारे ३१ लाख किंमतीचे किराणा कीट्स, ब्लँकेट्स, चटया, पाट्या, बादल्या, शालेय साहित्य आदींचे वाटप करण्यात आले.

## संघ स्थापनेमागचा उद्देश

**मला समजलेला राष्ट्रीय स्वयंसेवक संघ भाग - ३**

**- डॉ. सचिन लादे, पंढरपूर**
**पुणे विभाग सहप्रचार प्रमुख रा.स्व.संघ.**
**मो.क्र.७५८८२१६५२६**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्थापक डॉ. श्री.केशव बळीराम हेडगेवार हे काँग्रेसमध्ये सक्रिय होते व देशाच्या स्वातंत्र्य चळवळीतही सहभागी होते. अनेक प्रसंगी त्यांच्या लक्षात आले, की स्वयंशिस्त - सुसंस्कारित तरुण घडला पाहिजे, परंतु देशाच्या स्वातंत्र्याच्या आंदोलनाच्या कार्यामुळे या गोष्टीकडे काँग्रेसही लक्ष देऊ शकत नव्हती व नेते मंडळीही काही करू शकत नव्हते. दुसरीकडे हिंदू धर्म - संस्कृतीबद्दलचा अभिमान संपत चालला होता, अशा परिस्थितीमध्ये भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर या भारत देशाच्या अखंडतेची व पुनर्वैभव प्राप्त करून देण्याची जबाबदारी कोण घेणार हा प्रश्न डॉक्टरांना भेडसावत होता.

आपल्या भारतभूमीला मातृभूमी मानणारा, पितृभूमी मानणारा, या भूमीमध्ये होऊन गेलेल्या राम - कृष्ण यांना दैवते मानणारा, भगवान गौतम बुद्ध - महावीर या तिर्थंकरांना आदर्श मानणारा, छत्रपती शिवाजी महाराज - महाराणा प्रताप यांना महापुरुष मानणारा केवळ आणि केवळ हिंदू समाजच आहे. या हिंदू समाजाला संघटित करणे व सुसंस्कारित तरुण पिढी उभा करणे हाच यावरचा उपाय आहे हे लक्षात घेऊन डॉ.हेडगेवार यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना केली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ स्थापन करण्यामागचा उद्देश संघाच्या प्रार्थनेमध्येच आला आहे. भारत देशाला परमवैभवाला (महासत्ता) घेऊन जाणे हाच संघाचा उद्देश आहे. या राष्ट्राचे भले व्हावे असं वाटणार्यांचं संघटन करणे आणि राष्ट्रहितामध्येच माझं हित आहे अशी भावना असणाऱ्या सुसंस्कृत पिढी निर्माण करणे व यातून राष्ट्राला परमवैभवाकडे नेणे हाच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा स्थापनेमागचा उद्देश आहे.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हा राजकीय पक्ष अथवा संघटना म्हणून स्थापन झालेला नव्हता, त्यामुळे कोणत्याही राजकीय उद्देशासाठी संघाने स्वातंत्र्यपूर्व काळात अथवा स्वातंत्र्यानंतरच्या काळातही काम केलेले नाही. आम्ही जाती निर्मूलन करण्यासाठी अथवा जातीअंताचे कार्य करण्यासाठी स्थापन झालो आहोत असेही संघाने कधीही म्हटलेले नाही. हिंदू समाजाचे संघटन करणे हा अंतिम उद्देश असल्यामुळे हा उद्देश सफल होणे यातच जातीयता - अस्पृश्यता निर्मूलन होणे हे निश्चितच होते. परंतु केवळ हा उद्देश ठेवून संघ स्थापन झालेला नाही. सामाजिक सुधारणा घडवून आणणे हा देखील उद्देश संघाने कधीही ठेवलेला नव्हता. हिंदू समाज संघटित झाला की अनेक प्रश्न आपोआप सुटतील हे संघ निर्मात्यांना माहीत होते, त्यामुळेच सामाजिक सुधारणा करण्याचा उद्देश समोर ठेवण्याऐवजी हिंदू समाज संघटित व सुसंस्कारित बनविला तर अशा सुधारणा सहजासहजी घडून येऊ शकतील हे देखील संघ निर्मात्यांनी आपल्या चिंतनातून जाणले होते म्हणूनच अशा सामाजिक सुधारणांना उद्देश मानून संघ स्थापन झालेला नव्हता. या देशाला परमवैभवाला नेण्याचे कार्य सुसंस्कारित व सुसंघटित हिंदू समाजच करू शकतो याचा विचार करून अशा समाजाच्या निर्मितीसाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना डॉ.केशव बळीराम हेडगेवार यांनी केली व या उद्देशावरच गेल्या शंभर वर्षांपासून संघ कार्य करताना दिसतो आहे.

# द्राक्ष बागायतदारांच्या हितासाठी शासन कटिबद्ध

## पालकमंत्री जयकुमार गोरे; लक्ष्मी सोपान बाजार समितीमध्ये बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ११ ऑक्टोबर-**

इतर पिकांसाठी जसे शासनाकडून मदत दिली जाते, त्याचप्रमाणे द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांनाही विशेष मदत देण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. द्राक्ष फळ पिकाच्या पंचनामा प्रक्रियेसाठी योग्य निकष निश्चित करुन अडचणी दूर केल्या जातील, अशी ग्वाही पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिली.

नुकत्याच झालेल्या अतिवृष्टी व पूर परिस्थितीमुळे द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांना मोठ्या नुकसानीला सामोरे जावे लागले आहे. या पार्श्वभूमीवर बार्शीतील लक्ष्मी सोपान बाजार समिती येथे आज पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या अध्यक्षतेखाली द्राक्ष बागायतदार संघासोबत महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत द्राक्ष बागांमधील नुकसान मूल्यांकन (पंचनामा) प्रक्रियेसंबंधी निकष नसल्याच्या मुद्द्यावर सविस्तर चर्चा



झाली.

बैठकीला माजी आमदार राजेंद्र राऊत, माजी नगराध्यक्ष असिफ तांबोळी, माजी नगराध्यक्ष रमेश पाटील, माजी नगरसेवक विलास रेणके, उद्योजक महावीर कदम, उद्योजक प्रशांत कथले उपस्थित होते.

पालकमंत्री गोरे म्हणाले, बार्शीतील द्राक्ष बागायतदारांनी हा विषय उचलून धरला नसता तर संपूर्ण महाराष्ट्रातील द्राक्ष उत्पादकांना न्याय मिळाला नसता. शासन शेतकऱ्यांच्या बाजूने भक्कमपणे उभे आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पूरग्रस्तांना सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले असून, शेतकऱ्यांना अधिकची आर्थिक मदत कशी मिळवता येईल यासाठी ते प्रयत्नशील आहेत. तसेच बार्शी बाजार समितीच्या निवडणुका पुढील दोन आठवड्यांत घेण्यासाठी प्रयत्न सुरु असल्याची माहितीही त्यांनी दिली. माजी आमदार राऊत व द्राक्ष बागायत संघाचे अध्यक्ष कापसे यांनी आपले विचार व्यक्त केले. तालुका कृषी अधिकारी संतोष कोयले यांनी यावेळी माहिती देताना सांगितले की, प्रधानमंत्री पीक विमा योजना (झचऋइध) अंतर्गत द्राक्ष पिकासाठी प्रति हेक्टर विमा हप्ता १९,००० रुपये असून, विमा संरक्षित रक्कम ३,८०,००० रुपये प्रति हेक्टर आहे. विमा भरण्याची अंतिम मुदत १५ ऑक्टोबर असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. मात्र, द्राक्ष बागायतदार संघाने हा हप्ता कमी करण्याची मागणी पालकमंत्र्यांकडे केली आहे. या बैठकीमुळे द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांमध्ये आशेचे वातावरण निर्माण झाले असून, शासनाच्या मदतीमुळे त्यांना दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे. सोलापूर जिल्हा हा महाराष्ट्रातील प्रमुख द्राक्ष उत्पादक भाग असून, येथील शेतकरी अतिवृष्टी, पूर आणि बाजारभावातील चढ-उतार यासारख्या समस्यांना तोंड देत आहेत. पालकमंत्र्यांच्या या प्रयत्नांमुळे राज्यातील इतर द्राक्ष उत्पादक भागांनाही फायदा होण्याची शक्यता आहे.

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## महिनाभर बंद पडलेली एसटी बससेवा पुन्हा सुरु



**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ११ ऑक्टोबर-**

अक्कलकोट ते बोरगाव मार्गे घोळसगाव बस सेवा अखेर १ महिन्यानंतर सुरवात झाली १० सप्टेंबर रोजी पडलेल्या जोरदार पावसामुळे रस्ता खराब झाल्याने एसटी बोरगावपर्यंत येत होती. ती आता घोळसगावपर्यंत येत आहे.

घोळसगावच्या नागरिकांना रस्ता खराब झाल्याने १ महिना बस बंद असल्याने त्रास झाला. वागदरी मार्गे ओढयाच्या पली कडे किरनाळी पर्यंत चालत जाऊन ग्रामस्थांना चोकाना जावे लागत होते. घोळसगाव बोरगाव मधील डांबरीचा रस्ता वाहून गेल्यामुळे बोरगाव पर्यंतच बस येते एसटी बस येण्यासारखे रस्ता कायम स्वरूपी दुरुस्त होणे गरजेचे आहे. एसटी बससेवा अखेर कालपासून बोरगाव मार्गे घोळसगाव बससेवा सुरवात झाली आहे. एसटी बसप्रवास सुरू होण्यासाठी सरपंच राजशेखर किवडे, पत्रकार बंधू यांच्या पाठपुराव्याला यश आले.



## महत्त्वाचे



### वळसंगचे सपोनि अनिल सनगल्ले यांना निरोप तर नूतन सपोनि राहूल डोंगरे यांचे स्वागत

**वळसंग ११ ऑक्टोबर-**

वळसंग (ता. दक्षिण सोलापूर) येथील सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल सनगल्ले यांची बदली झाल्याने त्यांचा निरोप समारंभ तर नव्याने पदभार स्वीकारलेले सहाय्यक पोलीस निरीक्षक राहुल डोंगरे यांचा स्वागत समारंभ उपविभागीय अधिकारी विलास यामावार यांच्या उपस्थितीत वळसंग पोलीस ठाण्यात संपन्न झाला. ठाण्याच्या हद्दीत ऑक्सी पार्क, ओपन जिम, रनिंग ट्रॅक, चिल्ड्रन पार्क अशा अनेक गोष्टींची जोपासन केलेले व स्वच्छ, शिस्त, कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी यशस्वी झालेल्या अनिल सनगल्ले यांचे गुणगौरव करण्यात आले. सोलापूर मुख्यालयाला बदली झाले असून पदोन्नती लवकर मिळावी असे शुभेच्छा देण्यात आले. वळसंग ठाण्याला नव्याने पदभार स्वीकारलेले राहुल डोंगरे यांचे सत्कार करून स्वागत करण्यात आले. सनगल्ले यांनी केलेले कामाचे वर्णन करून त्या परंपरा व जबाबदारी पूर्ण करण्याची हमी यावेळी बोलताना डोंगरे यांनी दिले. डोंगरे यांना वाटचालीस शुभेच्छा सनगल्ले त्यांच्याकडून देण्यात आले. उपविभागीय अधिकारी अक्कलकोट विभाग विलास यामावार, सरपंच जगदीश अंटद, उपसरपंच समीर कटरे, माजी तंटामुक्त अध्यक्ष बुडन कटरे, ग्रामपंचायत सदस्य मलकप्पा कोडले, श्रीशैल धुसणगी, शालम आमलीचुंगे, अनिल बर्वे, बसवराज कोंडे आदी मान्यवर उपस्थित होते.



### सोजर कॉलेज ऑफ फार्मसीत परीक्षा तयारीची कार्यशाळा

**बार्शी, ११ ऑक्टोबर-**

खांडवी (ता.बार्शी) येथील सोजर कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये बी.फार्मसी तृतीय व अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी तीन दिवसीय जीपॅट - नायपर - ड्रग इन्स्पेक्टर परीक्षेसाठी तयारी कार्यशाळेचे नुकतेच आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा परीक्षांविषयी आत्मविश्वास निर्माण करून त्यांना योग्य दिशेने मार्गदर्शन करणे हा कार्यशाळेचा उद्देश होता. कार्यशाळेत सचिन जाधव यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन करत अभ्यासाचे नियोजन, सातत्य आणि सकारात्मक दृष्टीकोन यांचे महत्त्व सांगितले. या कार्यशाळेला प्राचार्य डॉ. सुजित करपे यांचे मोलाचे मार्गदर्शन व प्रोत्साहन लाभले. कार्यक्रमाचे उत्कृष्ट संयोजन अखलाख शेख यांनी केले. या यशस्वी उपक्रमाबद्दल संस्थाअध्यक्ष अरुण बारबोले, सचिवा कल्पना बारबोले, तसेच प्राचार्य डॉ. सुजित करपे यांनी सचिन जाधव यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. आभार डॉ. देसाई व शिवाजी पाटील यांनी केले.



### हिंगुलांबिका देवीच्या वर्धापन दिनानिमित्त रक्तदान शिबीर

**सोलापूर, ११ ऑक्टोबर-**

श्री हिंगुलांबिका देवीच्या १२८ व्या वर्धापन दिनानिमित्त हिंगलाज प्रीमियर लीगच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. यावेळी ९५ हून अधिक रक्तदात्यांनी रक्तदान केले. याप्रसंगी हिंगुलांबिका मंदिर ट्रस्टचे विश्वस्त दत्तात्रय पुकाळे, श्रीकांत अंबुरे, समाजातील प्रमुख सदस्य साई क्षीरसागर, सूर्यकांत खामितकर, क्षीरसागर, भावसार व्हिजन सेंट्रलचे अश्विन डोईजोडे, अमोल खामितकर, भावसार युवक आघाडीचे अध्यक्ष व मनसे विद्यार्थी सेनेचे जिल्हाध्यक्ष श्री अभिषेक रंपुरे, नवनिर्माण सेनेचे विनायक महिंद्रकर उपस्थित होते. शिबिर यशस्वी करण्यासाठी हिंगलाज प्रीमियर लीगचे आशिष कटारे, प्रतीक पुकाळे, आनंद खमीतकर, मयूर बासुतकर, नवीन तापसे, दर्शन ढगे, सुमित पिसे, स्वप्नील म्हेत्रेस्कर आदींनी परिश्रम घेतले.

### पैशाच्या कारणावरून तरूणास मारहाण

**सोलापूर, ११ ऑक्टोबर-**

पैशाच्या कारणावरून तरूणास मारहाण करून जातीवाचक शिवीगाळ करणाऱ्याविरुद्ध सोलापूर तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गोवर्धन लालू डोलारे (वय ३२, रा. भोगाव) याच्या फिर्यादीवरून हमु रामचंद्र गुडे (वय ४०, रा. भोगाव) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ९ ऑक्टोबर रोजी सकाळी साडेआठच्या सुमारास भोगाव गावातील राम घोडके यांच्या सोहम किराणा दुकानातून सामान घेण्यासाठी गोवर्धन डोलारे थांबला होता. त्याठिकाणी गावातील हमु गुडे हा आला. त्याने डोलारे यास कामातील राहिलेले माझे पैसे दे असे म्हणाला. त्यावेळी डोलारे याने गुडे यास पैसे परत देतो असे सांगितल्यावर गुडे याने डोलारे यास शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. डोलारे यास जातीवाचक शिवीगाळ करून दगडाने डोलारे याच्या कपाळावर मारला. त्यामुळे डोलारे याच्या कपाळावर जखम झाली. त्यामुळे याबाबत सोलापूर तालुका पोलिस ठाण्यात अॅट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिस उपविभागीय अधिकारी देवळेकर पुढील तपास करीत आहेत.

# पुरस्कार नको, विकास हवा

- मंद्रूपच्या नागरिकांकडून ग्राम पंचायतीच्या पुरस्कारावर नाराजी

- पुरस्कारामुळे स्टंटबाजी सुरू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ ऑक्टोबर-**

मंद्रूप ग्रामपंचायतीला नुकतेच हरीत महाराष्ट्र अभियान अंतर्गत वृक्षलागवडीच्या उल्लेखनीय कार्याबद्दल हरीत यशोगाथा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. पुरस्कार मिळूनही गावाचा विकास होत नसल्याने नागरिकांमधून आता पुरस्काराला विरोध होत आहे. ग्रामपंचायतीला यापूर्वी माझी वसुंधरेचे दोन तसेच प्रधानमंत्री आवास योजना शिवाय इतर अनेक जिल्हाअंतर्गत पुरस्कार मिळाले आहेत.



मात्र त्या पुरस्काराच्या रक्कमेतून गावाचा विकास होताना दिसून येत नाही. त्यामुळे गावाच्या विकासावर परिणाम होत असल्याने नागरिकांमधून शासनाच्या पुरस्काराला विरोध होत आहे. शिवाय या पुरस्काराचे मोठ्या प्रमाणात स्टंटबाजी करून राजकारण करण्यात येत असल्यानेच पुरस्कार नको, विकास हवा म्हणत नागरिकांकडून पुरस्काराला विरोध होत आहे.

माजी सरपंच कै. कलावती खंदारे यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामपंचायतीने माझी वसुंधरा अभियानात उत्कृष्ट काम केल्यामुळे राज्य शासनाकडून पावणे दोन कोटीचे दोन पुरस्कार मिळाले आहेत. या काळात ग्रामपंचायतीला अनेक पुरस्कार मिळाली आहेत. माझी वसुंधरातीलच भाग असणाऱ्या विभागाकडून हरीत यशोगाथा पुरस्कार जाहीर झाला आहे. पृथ्वी, वायू, जल, आकाश व अग्नी याअंतर्गत वृक्षारोपण व त्यांचे संगोपन केल्याबद्दल हरीत यशोगाथा पुरस्कार जाहीर झाले असून मुंबईत १४ नोव्हेंबर रोजी मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार वितरण होणार आहे.

#### पुरस्कारापेक्षा विकास महत्वाचा

मंद्रूप ग्रामपंचायतीला दहापेक्षा अधिक पुरस्कार मिळाली आहेत. यामुळे निश्चितच गावाच्या वैभवात भर पडला आहे. मात्र गावात अस्वच्छता, पाणीटंचाई, दुर्गंधी, व्यापारी गाळे, रस्ते यासारख्या समस्या भेडसावत आहेत. याकडे दुर्लक्ष करून ऑनलाईन माहितीद्वारे पुरस्कार मिळविण्याचे काम सुरू आहे. त्यामुळे गावाच्या विकासासाठी निधी येताना अडचणी येत आहेत. म्हणून शासनाकडून पुरस्कार देण्यापेक्षा विकासासाठी निधी देण्याची गरज आहे.

**- सचिन फडतरे,**
तालुकाध्यक्ष, बहुजन हक्क अभियान सामाजिक संघटना

#### गावात समस्यांना ऊत

गावात व हद्दवाढ भागात विविध समस्या आहेत. पावसाळ्यात साचलेल्या पाण्यामुळे दुर्गंधी पसरली असून ग्रामपंचायत व प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे. नागरीक समस्यांना वैतागले आहेत. सर्वच भागात पाणीटंचाई सुरू आहे. याकडे दुर्लक्ष करून पुरस्कारचे गाजावाजा करण्यात येत आहे. त्यामुळे शासनानी पुरस्कार देण्यापेक्षा विकासनिधी देणे गरजेचे आहे. ग्रामपंचायतीने पुरस्काराच्या नादी न लागता नागरीकांच्या सम स्या सोडविण्यास प्राधान्य द्यावे.

**- जावीद आवटे,**
तालुकाध्यक्ष, अखिल भारतीय किसान सभा, द.सोलापूर.

#### आमच्या काळातील विकासाचे श्रेय

ग्रामपंचायतीवर भाजपुरस्कृत सत्ता असताना कै. कलावती खंदारे यांच्या काळात माझी वसुंधरा अभियानात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल शासनाकडून दोन पुरस्कार मिळाली आहेत. त्या पुरस्काराचे भाग असणाऱ्या संस्थेकडून वृक्षारोपण व पर्यावरण क्षेत्रातील कामाची दखल घेऊन हरीत यशोगाथा पुरस्कार जाहीर झाला आहे. विरोधकानी पुरस्काराचे श्रेय घेणे चुकीचे आहे.

**- मळसिध्द मुगळे, जिल्हा उपाध्यक्ष, भाजपा**

#### हरीत यशोगाथा पुरस्कार

ग्रामपंचायतीकडून माझी वसुंधरा अभियानातील पर्यावरण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल वृक्षारोपण व त्यांच्या संगोपनाच्या कामाची दखल घेऊन शासनाकडून हरीत यशोगाथा पुरस्कार जाहीर झाला आहे. सध्या माझी वसुंधरा अभियानाच्या निधीम धून वृक्षलागवड सुरू आहे. मुंबईत १४ नोव्हेंबरला पुरस्कार वितरण होणार आहे. मंद्रूप ग्रामपंचायतीकडून पर्यावरण रक्षणाचे काम सुरू आहे.

**- दादा कोरे, पॅनलप्रमुख, मंद्रुप ग्रामपंचायत**

## पूर्व वैमनस्यातून तरूणास लोखंडी हत्याराने मारहाण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ ऑक्टोबर-**

पूर्व वैमनस्यातून तरुणास लोखंडी हत्याराने मारहाण करणाऱ्या चौघांविरुध्द विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत विशाल रेवणप्पा भैरामडगी (वय २४, रा. शिवलिंग नगर, एमआयडीसी, सोलापूर) याने दिलेल्या फिर्यादीवरून मयुर काळे, सोनू राठोड, अल्तमेश मनियार, प्रथमेश थोरात (रा. सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

९ ऑक्टोबर रोजी दुपारी विशाल भैरामडगी हा सिंधु विहार येथे झाडाच्या कट्ट्यावर फोन पहात बसला होता. त्यावेळी मागील भांडणाचा राग मनात धरून मयुर काळे व त्याच्या साथीदारांनी मिळून विशाल यास शिवीगाळ करून हाताने व लाथाबुक्क्याने मारहाण करून जखमी केले. तसेच मयुर काळे याने त्याच्या हातातील लोखंडी हत्याराने विशाल याच्या हाताच्या अंगठ्याजवळ मारून त्यास जखमी केले. म्हणून विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल कण्यात आला आहे. हवालदा गायकवाड पुढील तपास करीत आहेत.

## पदाधिकाऱ्यांनी निवडणुकीत संधीचे सोने करावे

खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांचे प्रतिपादन



**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ११ ऑक्टोबर-**

आपल्या पक्षाचे शरदचंद्र पवार यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेसचे पदाधिकारी म्हणून काम करण्यासाठी संधी दिली आहे, याचा फायदा घेऊन पदाधिकाऱ्यांनी आदरणीय विजयदादा व ज्येष्ठ नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली येत्या जिल्हा परिषद, पंचायत समिती व नगर पालिकांच्या निवडणुकीत लोकसभेसारखी किमया करून संधीचे सोने करावे, असे आवाहन राष्ट्रवादीचे माढयाचे खा. धैर्यशील मोहिते-पाटील यांनी केले.

येथील शिवरत्न बंगल्यावर शुक्रवारी सायंकाळी जिल्हातील सर्व तालुका अध्यक्षांच्या निवडी करून त्यांना राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते माजी मंत्री लक्ष्मण ढोबळे, सोलापूर जिल्हाध्यक्ष वसंतराव देशमुख, कार्याध्यक्ष रवी पाटील, महिला जिल्हा अध्यक्षा सुवर्णा शिवपुरे, युवती जिल्हाध्यक्ष विनंती कुलकर्णी यांच्या हस्ते निवडीचे पत्र देण्यात आले. त्यावेळी मोहिते-पाटील बोलत होते.

राष्ट्रवादीकॉंग्रेसचे नूतन तालुका अध्यक्ष माळशिरस देविदास ढोपे, सांगोला- दत्तात्रय सावंत, माढा बाळासाहेब पाटील, अक्कलकोट बंदेनवाज कोरबू, करमाळा, अमरजीत साळुंखे, दक्षिण सोलापूर दत्तात्रय घोडके, मोहोळ विनायकुमार पाटील, पंढरपूर अतुल चव्हाण, मंगळवेढा पांडुरंग चौघुले, बार्शी महेश चव्हाण, विद्यार्थी जिल्हाध्यक्षपदी सागर पडवळ, उपाध्यक्षपदी कदम, सचिवपदी अक्षय शिंदे, अकलूज शहर अध्यक्षपदी सुरेश गंभीरे, मंगळवेढा शहर अध्यक्षपदी चंद्रशेखर कोंडुभैरी यांच्या निवडी करण्यात आल्या.

रवी पाटील यांनी प्रास्ताविक, दत्तात्रय सावंत यांनी आभार मानले.

## शहरात सोमवारपासून रुक्मिणी दिवाळी महोत्सव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ ऑक्टोबर-**

उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत सोलापूर जिल्ह्यातील स्वयंसहायता समूह उत्कृष्ट उत्पादने तयार करीत आहेत. दिवाळी सणानिमित्त मोठ्या प्रमाणात भेटवस्तू व इतर साहित्य आदान प्रदान केल्या जातात.

फटाके वगळता बचत गटांनी उत्पादित केलेला सुकामेवा, हस्तकला साहित्य, फराळाचे पदार्थ, पणत्या, आकाश कंदील इ.वस्तू व साहित्य जिल्ह्यातील अनेक स्वयंसहायता समूह बनवीत आहेत. त्या उत्पादनांना बाजारपेठ मिळण्यासाठी सोलापूर जिल्हा परिषद आवारात त्यांचे प्रदर्शन व विक्रीसाठी 'रुक्मिणी दिवाळी महोत्सव-२०२५' चे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी दिली.

दिनांक १३ ते १४ ऑक्टोबर दरम्यान सकाळी दहा ते सायंकाळी सहा वाजे पर्यंत जिल्हा परिषदेच्या आवारात सदर महोत्सव आयोजित करण्यात येणार आहे. या दिवाळी महोत्सव अंतर्गत सोलापूर जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील एकूण २५ स्वयंसहायता समूह यांनी उत्पादित केलेल्या उत्पादनाची विक्री व प्रदर्शन करण्यासाठी स्टॉलची उभारणी करण्यात येणार आहे. सदर दिवाळी महोत्सव राबवण्याबाबतचा उद्देश महिला स्वयंसहायता गटाच्या उत्पादनांना व्यासपीठ व बाजारपेठ उपलब्ध करून देणे हा आहे. तसेच सोलापूर शहरातील व परिसरातील नागरिकांना दिवाळी अनुषंगिक पदार्थ व साहित्य कमी भावात व चांगल्या दर्जाचे उपलब्ध होणार आहे. तरी जिल्ह्यातील नागरिकांनी सदर'रुक्मिणी दिवाळी फराळ महोत्सवास भेट देवून सदरच्या वस्तू खरेदी करून बचत गटातील महिलांचा उत्साह वाढवावा असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी केले.

यावेळी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक चंद्रशेखर जगताप, उमेदचे जिल्हा अभियान व्यवस्थापक सचिन चवरे, लेखाधिकारी शुभांगी देशपांडे, जिल्हा व्यवस्थापक संतोष डोंबे, राहुल जाधव, मीनाक्षी मडीवळी, दयानंद सरवळे, अनिता माने,शितल म्हता उपस्थित होते.

## मानसिक तणावातून तरुणीने खाल्ल्या ६० गोळ्या

**सोलापूर, दि. ११ ऑक्टोबर-**

मानसिक तणावातून तरुणीने ५० ते ६० गोळ्या खाल्ल्याचा प्रकार उघडकीस आला. हा प्रकार शुक्रवारी दुपारी ३.३० च्या सुमारास घडला. आसमा अल्लाबक्ष शेख (वय ३५ ) असे मुलीचे नाव आहे.

आसमा ही शुक्रवारी दुपारच्या सुमारास (कंकुबाई हॉस्पीटल) अर्थात उत्तर तहसिल कार्यालयाजवळील एका हॉस्पीटल जवळ होती. तिथे तिने मानसिक तणाव आल्याने ५० ते ६० गोळ्या खाल्ल्या. त्यामध्ये तिला त्रास होऊ लागल्याने शनिवारी सकाळी ११.४० वाजता बहिण रुबिया यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

# आकर्षक पणत्यांनी पंढरपुरात सजला कुंभारवाडा



- आली दिवाळी करा तयारी
- मातीचे रेडिमेड किल्ले अन् विविध प्राण्यांच्या मूर्त्या

**तभा वृत्तसेवा । महेश भंडारकवठेकर**
**पंढरपूर, दि.११ ऑक्टोबर-**

दिपावली म्हणजेच प्रकाशाचा उत्सव अवघ्या आठ ते दहा दिवसांवर आल्यामुळे येथील नवीन कुंभारवाड्यात पणत्या तसेच बालगोपाळांसाठी आकर्षण असलेले छत्रपती शिवाजीमहाराज, किल्ले, मावळ्यांच्या मुर्ती विक्रीसाठी सज्ज झालेले आहेत.

या वर्षी कच्चा माल महाग झाल्याने अशा पणत्या, किल्ले आणि मावळ्यांच्या मुर्तींच्या किंमती मध्ये देखील वाढ झाल्याचे येथील कुंभारवाड्यातील कारागिरांनी सांगितले. येत्या आठ ते दहा दिवसांवर वर्षभरातील सर्वात मोठा सण म्हणून ओळखला जाणारा दिवाळीचा सण येवुन ठेपलेला आहे. दिवाळीच्या सणा मध्ये अंधकार जावून हजारो प्रकाशाने घरे उजळण्यासाठी विविध प्रकारच्या पणत्यांना नागरिकांकडून मोठी मागणी असते, त्यामुळे येथील कुंभार वाड्यात सध्या पणत्या बनविण्याचे काम पूर्ण झाले असून त्यांची जोमाने घाऊक व्यापाऱ्यांना विक्री केली जात आहे. गणेश विसर्जन झाल्यानंतर सर्रास कुंभार वाड्यातील कुंभारांच्या घरांमधुन पणत्या बनविण्याच्या कामास प्रारंभ केला जातो. आधुनिक फॅन्सी पध्दतीच्या पणत्यामुळे पारंपारिक पध्दतीने बनविल्या जाणाऱ्या मातीच्या पणत्याची मागणी कमी झालेली आहे. सध्या पारंपारिक पध्दतीच्या पणत्या बनविण्यासाठी योग्य दर्जाची माती मिळत नाही. जर माती मिळाली तर त्याचा चिखल करुन तो तुडवावा लागतो, मेहनतीच्या मानाने नागरिकांतून पारंपरिक पध्दतीच्या पणत्यांना विशेष मागणी येत नसल्याने तयार केलेला माल तसाच पडून राहतो. दरम्यान राजस्थानातील लाल माती पासून बनविलेल्या रेडिमेड पणत्या आणण्याकडे येथील कारागिरांचा देखील कल आहे. रेडीमेड पणत्या आणून त्याला रंगरंगोटी करुन त्याची आकर्षकता वाढवून मगच त्याची विक्री करण्यात येते अशी माहिती येथील नवीन कुंभारवाड्यातील कारागिरांनी दिली.

#### किल्ल्यांच्या प्रतिकृतींना वाढती मागणी

मागील काही वर्षांपासून दिवाळीच्या सुट्टी मध्ये बालगोपालांकडून किल्ल्याच्या प्रतिकृती साकारण्याचा कल वाढलेला आहे. या किल्ल्यांवर वातावरण निर्मिती करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज, त्यांचे मावळे, तोफा, हत्ती, घोडे, वाघ, सिंह अशा माती पासून बनविलेल्या मुर्तींना चांगली मागणी असते. या बरोबरच कुस्ती खेळणारे पैलवान, पारावरील मारुती आदींच्या देखील मूर्ती कुंभार वाड्यातून सध्या विक्रीसाठी उपलब्ध होवु लागल्या आहेत.

गणपती, महालक्ष्मींच्या सणानंतर मधल्या काळात दिवाळीच्या सणासाठी चार पैसे मिळावेत म्हणून पणत्या, किल्ले, मावळे तयार करण्याचे काम केले जाते. सध्या फॅन्सी पणत्यांना मागणी असल्यामुळे पारंपारिक मातीच्या पणत्यांना ग्राहकांकडून फारसा प्रतिसाद मिळत नाही.

**- रमेश कुंभार, कारागिर**

कुंभारवाड्यातील कुंभारांनी तयार केलेल्या पणत्या, किल्ले मावळे अशा वस्तु आम्ही ठोक भावात विकत घेवुन त्याची हातगाड्यांवर शहरातून फिरुन किंवा बाजारपेठेत एका ठिकाणी बसुन विक्री करण्याचे काम करतो. या व्यवसायामुळे दिवाळीचा सण साजरा करण्यासाठी चार पैसे उपलब्ध होतात,

**- रामहरी कांबळे, विक्रेता**

लहानमुलांना किल्ल्यांची मोठी आवड असते. त्यामुळे दिवाळीच्या सुटीत किल्ला बनविण्या पेक्षा आम्ही रेडिमेड किल्लाच आणणे पसंत करतो, सध्या रेडीमेड तयार केलेल मावळे, शिवाजी, विविध प्रकारचे प्राणी आदी वस्तु मिळतात. मुलांची देखील सुटीत हौस होते.

**- रोहिणी जोशी, ग्राहक**